# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com | एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, ■ शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# राज्यात २० जि.प.,२११ पंचायत समिती निवडणुकींचा मार्ग मोकळा

## ■ प्रचाराचा धुरळा उडणार ■ सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** यंदाच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात झालेल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ समितींच्या निवडणुका झाल्यानंतर उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार? असा प्रश्न अनेकांना पडला होता. याबाबत आता एक मोठी माहिती समोर आली आहे. ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेऊ शकता, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (२९ ऑक्टोबर) दिला आहे. अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात. ज्या निवडणुका अद्याप बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असेही न्यायालयाने नमूद केले आहे.



### विभागनिहाय प्रलंबित जि. प. च्या निवडणुका

१) कोकण, पालघर, ठाणे
२) उत्तर महाराष्ट्र- नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव,अहिल्यानगर
३) मराठवाडा- बीड, जालना, नांदेड, हिंगोली
४) विदर्भ- अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. याआधीही महाराष्ट्रातील २२ जिल्हा परिषद आणि २२६ पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलता येणार नाहीत, अशी भूमिका न्यायालयाने घेतली होती. २०२५ च्या मे महिन्यात न्यायालयाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. त्यावेळी, बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास परवानगी दिली होती. पण, काही ठिकाणी आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक होत असल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने पुन्हा कायदेशीर पेच निर्माण झाला होता.

न्यायालयाच्या आदेशानुसार, १२ जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. आता २२ जिल्हा परिषदा आणि २२६ पंचायत समित्यांच्या निवडणुका बाकी आहेत, असे वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालच्या निदर्शनास आणून दिले. तुम्ही अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुढे ढकलत आहात. पण, ओबीसींसाठी किती टक्के आरक्षण असावे? हा मुख्य प्रश्न अजूनही निकाली निघायचा आहे. मी केवळ इतकीच विनंती करते की, राज्य निवडणूक आयोगामार्फत याआधी राबवल्या गेलेल्या प्रक्रियेप्रमाणेच उर्वरित निवडणुकाही पूर्ण केल्या जाव्यात. सर्वोच्च न्यायालयाच्या सध्याच्या आदेशांनुसार या निवडणुका सुरू राहू शकतात. तसेच, त्यानंतर तुम्ही सुनावणीसाठी कोणतीही तारीख निश्चित करू शकता. ५० टक्क्यांच्या आरक्षणाचा मुद्दा या प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या अधीन असणार आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी? अशी विचारणा केली. सॉलिसिटर जनरल यांनी कोणाला तरी यावर आक्षेप असू शकतो? असे नमूद करण्यात आले. यावर सरन्यायाधीश म्हणाले की, आम्ही आधीच असा आदेश दिला आहे की, अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात. ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात. पण, त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असणार आहेत. त्यामुळे आता उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. आता राज्य निवडणूक आयोग निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर करतो? मतदानाची प्रक्रिया कशी आखली जाते? याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# आत्महत्या करणा-या शेतक-याच्या अंत्यविधीला जाऊ नये - आ.संजय गायकवाड

**बुलडाणा / प्रतिनिधी-** बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या वादग्रस्त वक्तव्यांची मालिका सुरुच ठेवलीये. आता शेतकरी आत्महत्येवरुन ते बरळलेले पाहायला मिळालेत. शेतकरी आत्महत्यांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. शेतक-यांनी आत्महत्या करण्याऐवजी आपल्या अडचणी आमदार, खासदार आणि सरकारला सांगाव्यात, जेणेकरुन त्यातून मार्ग काढता येतील. तसेच आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या अंत्यविधीलाही जाऊ नये, असे वक्तव्य त्यांनी केले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.



दोन दिवसांपूर्वी माध्यमांच्या प्रतिनिधींनी संजय गायकवाड यांना वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या शेतक-यांबाबतच्या वक्तव्यावर प्रश्न विचारला होता. प्रकाश आंबेडकर यांनी शेतक-यांना नालायक म्हटल्याच्या वक्तव्याबाबत त्यांना विचारण्यात आले. यावर उत्तर देताना गायकवाड यांनी शेतकरी आत्महत्या का करतात? असा प्रश्न उपस्थित केला. शेतक-यांनी आत्महत्या करण्याऐवजी आपल्या भागातील आमदार आणि खासदारांना अडचणी सांगाव्यात. त्यातून त्यांच्या समस्यांवर तोडगा काढता येऊ शकतो, असं त्यांनी म्हटलं. शेतक-याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आत्महत्येचा निर्णय घेण्यापूर्वी शेतक-यांनी आपल्या कुटुंबाचा विचार करावा, असंही गायकवाड म्हणाले.

संजय गायकवाड पुढे बोलताना म्हणाले, आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या अंत्यविधीला देखील जाऊ नये. मी तर असं सांगेन की, आत्महत्या करणा-या शेतक-याच्या अंत्यविधीला देखील जाऊ नये. जेव्हा आपले शरीर एखादा प्राणी खाईल तेव्हा कसे वाटेल, हे त्यांना समजेल. त्यानंतर शेतकरी आत्महत्या करणार नाहीत गायकवाड यांनी प्रकाश आंबेडकर यांचं भाषण ऐकल्याचंही सांगितलं. अनेकदा रागाच्या भरात वक्तव्य केल जाते. शेतक-यांनी आत्महत्या करण्याऐवजी सरकारला पत्र लिहून आपल्या समस्या सांगाव्यात. तसेच आमदार आणि खासदारांनाही आपल्या अडचणींची माहिती द्यावी, जेणेकरून सर्वजण मिळून त्यांना मदत करू शकतील , असंही त्यांनी स्पष्ट केलं. शेतकरी आत्महत्या करून



आपल्या मुलांना एक प्रकारे शिक्षा देतात. शेतकरी पत्नीबरोबर सात फेरे घेऊन सात जन्म एकत्र राहण्याचं वचन देतो. मात्र मध्येच आत्महत्या करून जीवन संपवतो, असंही त्यांनी सांगितलं. संजय गायकवाड हे शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार असून बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. यापूर्वीही ते आपल्या वक्तव्यांमुळे चर्चेत आले आहेत. त्यांच्या विधानांमुळे पक्षालाही अडचणींचा सामना करावा लागलाय. यावेळी शेतकरी आत्महत्यांबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे त्यांची भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे.

# फटाक्यांवर पूर्ण बंदीस सुप्रीम कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणा-या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठी टिप्पणी केली. न्यायालय फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाही. मात्र, याबाबत एक संतुलित आदेश पारित केला जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.



सणांच्या काळात लोकांच्या उत्साहावर किंवा आनंदावर गदा आणण्याची न्यायालयाची मुळीच इच्छा नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने फटाक्यांचे नियम मोडणा-यांवर आणि अवैध विक्री करणा-यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. फटाके आणि प्रदूषणाबाबत लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक अनोखा सल्ला दिला. दरवर्षी या विषयावर आदेश जारी करावे लागण्यावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले की, हा विषय आता न्यायालयासाठी केवळ एक शैक्षणिक मुद्दा बनला आहे. न्यायालयाच्या आदेशांचे पालन कमी आणि उल्लंघनच जास्त होते, असे न्यायाधीशांनी मान्य केले. केवळ बंदी घालून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकत नाही, त्यामुळे केवळ कागदी आदेशांपेक्षा कठोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.सुनावणीदरम्यान दिल्ली सरकारने न्यायालयात आपले स्पष्टीकरण सादर करताना म्हटले की, सरकार वायू प्रदूषण रोखण्यासाठी अत्यंत गंभीर आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी दिल्लीत लवकरच बाहेरून येणा-या बीएस-६ वाहनांवर बंदी घालणे, सरकारी कार्यालयांच्या वेळेत बदल करणे आणि स्मॉग गन्सचा मोठ्या प्रमाणावर वापर करणे यांसारखी कडक पावले उचलली जात आहेत.➩(पान २ वर)

# जमिनीत पुरलेल्या ३ निळ्या ड्रममध्ये ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल

**प्रयागराज/वृत्तसंस्था :** निळ्या ड्रमचा उल्लेख होताच लोकांच्या मनात भीती निर्माण होते. मेरठमधील मुस्कानच्या निळ्या ड्रमशी संबंधित प्रकरणाबद्दल जवळपास सर्वांनाच माहिती आहे. मुस्कानने पतीची हत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह निळ्या ड्रममध्ये ठेवला होता. तेव्हापासून निळा ड्रम हा गुन्ह्याचे प्रतीक बनला आहे. आता प्रयागराजमध्येही पोलिसांना एक निळा ड्रम सापडला आहे. मात्र, यावेळी निळ्या ड्रममध्ये मृतदेह नव्हे, तर नोटांची बंडले आढळली आहेत.नवाबगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बरईपूर गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांनी एका घरावर छापा टाकून जमिनीखाली पुरलेले तीन निळे ड्रम जप्त केले. हे ड्रम उघडलले असता त्यामध्ये ५००-५०० रुपयांच्या नोटांची शेकडो बंडले भरलेली दिसून आली. निळ्या ड्रममध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात नोटा सापडल्याने परिसरात खळबळ➩(पान २ वर)



# गोहत्या प्रकरणात कोर्टाकडून वेद आणि मनुस्मृतीचा उल्लेख

**गांधीनगर /वृत्तसंस्था :** गुजरातमधील गांधीनगर येथील सत्र न्यायालयाने गोहत्या प्रकरणात तीन मुस्लिम आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या निकालात न्यायालयाने हिंदू धर्मातील वेद आणि मनुस्मृती या ग्रंथांचा उल्लेख करत गायींचे महत्त्व स्पष्ट केले. सध्या या प्रकरणाची देशभर चर्चा सुरू आहे. गांधीनगर येथील सत्र न्यायालयाने सोमवारी हा निकाल दिला असून निकालाच्या सुरुवातीच्या चार पानांमध्ये न्यायालयाने गायींचे महत्त्व आणि हिंदू धर्मातील त्यांचे स्थान याविषयी भाष्य केले. यासाठी न्यायालयाने वेद आणि मनुस्मृतीतील संदर्भांचा उल्लेख केला. गायीला विश्वाची माता मानले जाते आणि तिच्यात ३३ कोटी देवतांचा वास असल्याची धार्मिक मान्यता आहे असे न्यायालयाने नमूद केले. मनुस्मृतीचा उल्लेख करताना गायीला केवळ एक प्राणी न मानता धर्माशी संबंधित महत्त्वाचे स्थान असल्याचेही सांगण्यात आले.या प्रकरणातील वसीम कुरेशी, मोहम्मद रफिक कुरेशी आणि असफाक बहेलिम या तिघांना गायीचे धार्मिक महत्त्व माहीत असूनही त्यांनी निर्दयपणे गोहत्या केल्याचे न्यायालयाने म्हटले. कायद्यानुसार शिक्षा न झाल्यास भविष्यात गायींचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले आहे.




**मांस विक्रीसाठी गोहत्या केल्याचा आरोप-** न्यायालयात सादर झालेल्या माहितीनुसार, हे तिघे आरोपी कमी किमतीत जुन्या किंवा दूध न देणा-या गायी खरेदी करत होते. त्यानंतर त्यांची कत्तल करून मांस विक्रीचा व्यवसाय केला जात होता. पोलिसांनी मांस विक्रीची तयारी सुरू असताना आरोपींना पकडले. या कारवाईत सुमारे २७७ किलो गोमांस जप्त करण्यात आले. या प्रकरणात गुजरात प्राणी संरक्षण कायद्यातील सुधारित तरतुदी आणि प्राण्यांना क्रूरतेपासून संरक्षण देणा-या कायद्यासह इतर कलमांखाली आरोपींना दोषी ठरवण्यात आले. न्यायालयाने तिघांनाही जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तसेच प्रत्येक आरोपीला तीन लाख रुपयांचा दंड ठोठावला.

# सरकारची आणखी एका योजनेला कात्री

## २५ कोटींपेक्षा कमी खर्च झालेले प्रकल्प बंद

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्र सरकारने सरकारी खर्चांचा आढावा घेतल्यानंतर २५ कोटी रुपयांपेक्षा कमी खर्च झालेल्या योजनांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा परिणाम महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीवरही झाला असून, राज्य तिजोरीवरील अनावश्यक आर्थिक भार कमी करण्यासाठी निरुपयोगी प्रकल्पांमध्ये कपात करण्याचा महाराष्ट्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. या धोरणांतर्गत, २५ कोटी रुपयांपेक्षा कमी खर्च झालेले प्रकल्प बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून सरकारी योजनांवरील खर्चाचा आढावा घेण्यात आला. गेल्या ३ आर्थिक वर्षांत ज्या योजनांवर २५ कोटी रुपयांपेक्षा कमी प्रत्यक्ष खर्च झाला, अशा योजनांचा आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. याच प्रक्रियेत महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीच्या खर्चाचाही विचार करण्यात आला. त्यानंतर या प्राधिकरणाला दिले जाणारे सरकारी अनुदान ➩(पान २ वर)



# ७० टक्के लोकांनी महायुतीला नाकारले

## अब्दुल सत्तारांनी दिला धोक्याचा इशारा

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी** नुकत्याच झालेल्या शिक्षक-पदवीधर विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचा ३-२ अशी पिछेहाट झाली. यामुळं महायुती अंतर्गत तुतू-मैमै सुरु झाली आहे. याचपार्श्वभूमीवर औरंगाबाद पदवीधर निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराविरोधात सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेतलेले शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी महायुतीला आरसा दाखवला आहे. मराठवाड्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या विजयात आपला खारीचा वाटा असल्याचे त्यांनी म्हटले असून ७० टक्के महाराष्ट्रानं महायुतीला नाकारले असें सांगत हा धोक्याचा इशारा असल्याचंही म्हटलं आहे. माध्यमांशी संवाद साधताना सत्तार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. भाजपच्या टीकेला उत्तर दिलं तसंच महायुतीला भविष्यात कुठल्या परिणामांना समोरे जावे लागू शकते हे देखील त्यांनी सांगितले आहे. त्याचबरोबर महायुतीतल्या प्रत्येक पक्षानं या निवडणुकीनंतर आत्मपरिक्षण करण्याची गरज असल्याचं सांगताना राष्ट्रवादी काँग्रेसने तर सखोल परीक्षण करणे गरजेचे असल्याचं म्हटलं आहे. त्याचबरोबर भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांच्यावरही त्यांनी शेलक्या शब्दांत टीका केली.



सत्तार म्हणाले, मराठवाड्यात जे झालंय त्या विजयात माझा खारीचा वाटा आहे, प्रत्येकाला त्यावेळी मी जागृत करण्याचं काम केलं की महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सतीश चव्हाण हा माणूस प्रत्येकासाठी कसा घातक आहे, का आहे. गेली १८ वर्षे आम्ही त्यांच्यासाठी मतं मागितली पण त्यानंतरही त्याचं रुप पाहिल्यानंतर अनेक लोकांमध्ये नाराजी होती, पण तरीही त्यांच्या पक्षानं त्यांना उमेदवारी दिली. पण आम्ही त्यांच्याविरोधत थेटपणए उतरलो, कुठेही लपून-छपून प्रचार केला नाही. त्यामुळं आज आपण पाहिलं की, १८ वर्षांचा त्यांचं साम्राज्य संपलं. आमचा प्रत्येक मतदारानं ईश्वर, अल्लाह, भगवानला साक्षी ठेवून मतदान केलं. यासाठी केलं की सतीश चव्हाणांनी १८ वर्षांत कोणतंही काम केलं नव्हतं त्याचं त्यांना फळ मिळालं आहे.

**बन आणि त्यांची भणभण माहिती नाही-** माझ्यावर टीका करणारे भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन आणि त्यांची भणभण मला माहिती नाही मी त्यांना जवळून पाहिलेलं नाही. टीव्हीवरच मी पाहिलंय. पहिल्या विधानपरिषदेला मी युतीचा धर्म पाळला, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शिरसाटांना निवडून आणण्यासाठी मला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं, मी त्यांच्या आदेशाचं पालन केलं, त्यामुळं भाजपचा उमेदवार निवडून आला. त्यामुळं कादाचित बन यांना याची माहिती नसेल, त्यामुळं ➩(पान २ वर)

# फडणवीस, ठाकरे बंधूंमध्ये गुप्तगू

**मुंबई /प्रतिनिधी-** मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस आणि ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे आज एकाच मंचावर आले. 'महाराष्ट्राच्या हास्यरेषा' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त या नेत्यांची विशेष उपस्थिती लाभली. विविध निवडणुकांनंतर आता प्रथमच हे तीन नेते एकत्र आल्याने



ते काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावेळी नेत्यांनी मिश्किल टोलेबाजी करीत कार्यक्रमात रंगत आणली. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस आणि ठाकरे बंधूंमध्ये बंददाराआड गुप्तगू झाल्याने चर्चेला उधाण आले आहे. ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी संपादित महाराष्ट्राच्या हास्यरेषा या मराठी व्यंगचित्रकलेचा १०० वर्षांचा प्रवास उलगडणा-या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे तिन्ही➩(पान २ वर)

# देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट वीजपुरवठा; महावितरणचे यश



**अमरावती/ मुंबई प्रतिनिधी-** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या सौरऊर्जानिर्मिती योजनेत निर्माण झालेली अतिरिक्त वीज तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी मोठ्या वीज मागणीच्या वेळी वापरण्यासाठी महावितरणने १००० मेगावॅट अवरचा टप्पा गाठला आहे. देशात प्रथमच विकेंद्रित स्वरुपात बॅटरीचा वापर करून इतका मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करण्यात येत असून राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे वाढलेल्या वीजमागणीच्या काळात हा वीजपुरवठा अत्यंत उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेमचेंजर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज कृषीपंपांना देण्यात येते. अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी कमाल वीज मागणीच्या वेळी देण्यासाठी महावितरणने सुरु केलेल्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) योजनेत ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता नुकतीच कार्यान्वित करण्यात आली➩(पान २ वर)




# कीर्तनकारांनी सामाजिक विषयाला चालना दिली पाहिजे- प्रकाश महाराज वाघ

## गुरुकुंजात किर्तन संमेलनाचा थाटात समारोप व पुरस्कार वितरण



**गुरुकुंज मोझरी/ प्रतिनिधीः-** सद्या समाजात काय चालू आहे व कशाची गरज आहे या बाबीचा अभ्यास करून त्या समस्या कीर्तनकारांनी ठळकपणे मांडल्या पाहिजे, असे प्रतिपादन कीर्तन संमेलनाच्या समारोपीय अध्यक्षीय भाषणात प्रकाश महाराज वाघ यांनी केले. यावेळी प्रमुख उपस्थिती उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू, माजी सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, मुकुंदराव निस्ताने, रमेश ढवळे, अरविंद काळमेघ, माधुरी ढवळे, अन्ना महाराज शिरवाळकर, डॉ.प्रशांत ठाकरे, पौर्णिमा सवाई, मानकर स्वामी इत्यादी उपस्थित होते.

वाघ महाराज पुढे म्हणाले की, राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा विचार व वारकरी संप्रदायाचा विचार आता एक झाला असून दोन्ही विचारात एकच तत्व मांडले आहे. कीर्तनकारांनी समाजात त्रुटीमुक्त विचार समाजाला सांगणे महत्वाचे आहे. त्यामुळे समाजात आपोआपच प्रचार होईल नाहीतर समाजात विकृती निर्माण होते. राष्ट्रपती भवनात संत तुकडोजी महाराजांनी 'हे दिनबंधू ! सुनो हमारी। किसान का कब भला करें।' हे भजन म्हणून सर्वांना अचंबित केले होते. त्याबाबत त्यांना विचारले असता हेच भजन तुम्ही राष्ट्रपती भवनात का म्हटले? तेव्हा तुकडोजी महाराज म्हणाले होते की, शेतकऱ्यांनी जर शेतीत शेतमाल पिकविणे बंद केले तर माझी खंजिरी आपोआपच बंद होऊन जाईल. याचाच अर्थ संपूर्ण अर्थचक्र शेतीवरच अवलंबून आहे हे आता यंदाच्या दुष्काळामुळे आपणास सुद्धा माहित झाले.

समाजातील अंधकार दूर करण्यासाठी 'गुरुदेव ऐसी हो दया जग का अंधेरा दूर हो' या मागणीच्या माध्यमातून राष्ट्रसंतांचा मानवतावादी विचार माहित होते आणि हाच मानवतावादी विचार कीर्तनकारांनी समाजापर्यंत नेला पाहिजे. यावेळी ह.भ.प.सचिन पवार, अॅड. कैलास चव्हाण, ह.भ.प.संदीप गिहे यांनी संबोधित करून कीर्तनकारांनी कीर्तन करतांना कोणत्या चुका करू नये याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. रमेश ढवळे यांनी हे कीर्तन संमेलन आणखी यशस्वी होण्यासाठी व्यासपीठावरून संयोजकांना काही सूचना केल्या. समारोपीय कीर्तन संमेलनाचे संयोजन अमोल बांबल यांनी केले.

**राज्यातील कीर्तनकारांचा सन्मान-**

राज्यातील विविध भागातून आलेल्या कीर्तनकारांनी आपली कीर्तनाची उत्कृष्ट कला सादर केल्याबद्दल त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार प्राप्त कीर्तनकार गौरव महाराज चांगुले (बीड) यांना ज्ञानदीप पुरस्कार, कृष्णा शिरसाट (अहिल्यानगर) यांना अमृत पुरस्कार, निलेश लोनगाडगे (आळंदी) यांना सुवर्ण पुरस्कार, शिवज्ञानंद दराडे (हिंगोली) यांना रौप्य पुरस्कार, सुप्रियाताई बंडगर (संभाजीनगर) यांना भरारी पुरस्कार, अभिषेक भुसे (नागपूर) यांना प्रेरणा पुरस्कार, अनिल बोदडे (बुलढाणा) यांना अक्षरदीप पुरस्कार, अभिजीत बेलुरकर (वरखेड) यांना प्रविण पुरस्कार, ज्योतीताई बिडगर (मनमाड) यांना सुजन पुरस्कार, राम चांदने (बुलढाणा) यांना प्रोत्साहन पुरस्कार देण्यात येवून प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

### वाठोडा शुक्लेश्वर येथे समता तरुण मंडळाचा आदर्श उपक्रम

# आगीत घर गमावलेल्या गवई परिवारास धान्याची मदत



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवदुर्गा उत्सवाच्या निमित्ताने वाठोडा शुक्लेश्वर येथील 'समता तरुण उत्साही बहुउद्देशीय मंडळाने' सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचे दर्शन घडवले आहे. उत्सवासाठी जमा झालेल्या वर्गणीतून मंडळातील तरुणांनी आगीच्या दुर्दैवी दुर्घटनेत घर गमावलेल्या निराधार गवई परिवाराला जीवनावश्यक धान्याची मदत केली. सणाचा आनंद केवळ स्वतःपुरता न ठेवता संकटात सापडलेल्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्याचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

सुमारे दीड महिन्यापूर्वी वाठोडा शुक्लेश्वर येथील निराधार महिला भगिनी राजकन्या गवई यांचे घर दुर्दैवी आगीत पूर्णतः जळून खाक झाले होते. या दुःखद प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांनी गवई परिवाराची भेट घेऊन आर्थिक मदत केली होती. तसेच या कुटुंबाच्या मदतीसाठी सर्व सेवाभावी नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत समता तरुण उत्साही बहुउद्देशीय मंडळाने दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रकाश साबळे यांच्या शुभहस्ते गवई परिवारास गहू, तांदूळ व इतर आवश्यक धान्याची मदत प्रदान केली. उत्सव केवळ आनंदाचा नसतो, तर तो समाजातील गरजूंच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याची संधीही असतो. याच विचारातून तरुणांनी उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे. यावेळी शेखर अवघड,राजेश अंभोरे,कुणाल केवतकर,शुभम बेलोकार, अक्षय सरोदे, राधेश्याम बहादुरे,गणेशराव कडू, पत्रकार गजानन खोपे तसेच समता तरुण उत्साही बहुउद्देशीय मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जी एच रायसोनी विद्यापीठात 'साक्ष्य' फोरमची स्थापना



**अमरावती/प्रतिनिधीः-** जी एच रायसोनी विद्यापीठाच्या फॉरेन्सिक सायन्स विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी 'साक्ष्य' फोरमची औपचारिक स्थापना केली. या समारंभास विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, शिक्षकवर्ग तसेच बॅचलर ऑफ फॉरेन्सिक सायन्सचे सुमारे १२० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थी नेतृत्वाला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर स्वागत भाषणात 'साक्ष्य' फोरमच्या महत्त्वावर प्रकाश टाकण्यात आला. 'साक्ष्य' या शब्दाचा अर्थ पुरावा असा असून तो फॉरेन्सिक विज्ञानाच्या मूलभूत तत्त्वांचे प्रतिबिंब आहे. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता, सामूहिक कार्य, जबाबदारीची जाणीव वाढवणे तसेच विभागाच्या शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांत सक्रिय सहभाग वाढवणे यासाठी हा फोरम स्थापन करण्यात आला आहे. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याचे माध्यमही हा फोरम बनेल, असे नमूद करण्यात आले.

यावेळी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, परीक्षा नियंत्रक डॉ. विनायक डकरे आणि फॉरेन्सिक सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. मंगेश ढोरे उपस्थित होते. शिक्षकांनी या मान्यवरांचे स्वागत व सन्मान केला. विद्यापीठ नेतृत्वाने शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थी सहभागावर दिलेल्या भराला अतिथींनी गौरवले.

फोरमच्या पदाधिकाऱ्यांची निवड पारदर्शक पद्धतीने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी बॅलट बॉक्स पद्धतीने मतदान केले. सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारांचे विभागाने पॅनल मुलाखत घेतली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष म्हणून श्रेया बागडे, उपाध्यक्ष म्हणून श्रुष्टी कांबळे आणि कोषाध्यक्ष म्हणून अनुष्का मंगर यांचा समावेश आहे. इतर निवडून आलेल्या सदस्यांमध्ये समिक्षा लोहारे, सुरश्री उरकुले, अथर्व पाटील, रोशनी इंगळे, दिव्या पटेल आणि डिंपल बजाज यांचा समावेश आहे.

नवनिर्वाचित प्रतिनिधींना मंचावर बोलावून मान्यवर अतिथी व शिक्षकांनी त्यांचा सन्मान केला. त्यांना आपल्या जबाबदाऱ्या निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. मंगेश ढोरे यांनी निवडून आलेल्या सदस्यांना शपथ दिली. सदस्यांनी औपचारिकरित्या आपली कर्तव्ये स्वीकारत विद्यार्थ्यांच्या हितासाठी व विभागाच्या विकासासाठी कार्य करण्याचे संकल्प केले.

# जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन आणि कागदविरहित

**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या परिपत्रकानुसार जात प्रमाणपत्र पडताळणीची कार्यप्रणाली नव्याने विकसित करण्यात आली आहे. आता ही पूर्ण प्रक्रिया अद्ययावत संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन आणि कागदविरहित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य जया राऊत यांनी दिली आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन झाल्यामुळे अर्जदार, पालक किंवा अभ्यागतांना अमरावती जिल्हा कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची कोणतीही आवश्यकता नाही. अर्जदारांना आता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा अर्जाची हार्डकॉपी समितीकडे प्रत्यक्ष सादर करावी लागणार नाही. अर्ज किंवा पडताळणी प्रक्रियेबाबत काही तांत्रिक माहिती, मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास, बार्टी मुख्यालय पुणे येथील मदत कक्षाशी संपर्क साधता येणार आहे. संपर्कासाठी दूरध्वनी क्र. ०२०-२६३३३३३९ तर व्हाट्सअप क्र. ९४०४९९९४५२ आणि ईमेल helpdesk@barti.in उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे अर्जदारांचा वेळ आणि श्रम वाचणार असून संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### फटाक्यांवर पूर्ण बंदीस

ग्रीन फटाकेही प्रदूषणमुक्त नाहीत

कोर्टाच्या मदतीसाठी नियुक्त केलेल्या अमायकस क्यूरी यांनी न्यायालयात सांगितले की, फटाक्यांमुळे अत्यंत सूक्ष्म असा पार्टिक्युलेट मॅटर बाहेर पडतो. यातील पीएम २.५ सारखे सूक्ष्म कण थेट मानवी फुफ्फुसात आणि रक्ताद्वारे शरीराच्या विविध अवयवांमध्ये पोहोचून गंभीर आजार निर्माण करू शकतात.

जनजागृतीसाठी विराट कोहलीची मदत घ्या

नवीन पिढी आधीपासूनच फटाके आणि प्रदूषणाबाबत ब-यापैकी जागरूक आहे. मात्र, फटाक्यांमुळे होणा-या प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी विराट कोहलीसारख्या लोकप्रिय सेलिब्रिटींचा वापर केला गेला पाहिजे, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने केली आहे.

### जमिनीत पुरलेल्या ३ निळया

उडाली. हे संपूर्ण प्रकरण असे आहे की बरई रामनगर गावात बुधवारी संध्याकाळी उशिरा मुंबई पोलिस आणि प्रयागराज पोलिसांच्या संयुक्त पथकाने राजेश यादव आणि राकेश यादव ऊर्फ महाकाल यांच्या घराला घेराव घालून झडती मोहीम सुरू केली. घरातील एका खोलीची जमीन खोदून पोलिसांनी तीन निळे ड्रम जप्त केले. ड्रम उघडल्यावर त्यामध्ये ५००-५०० रुपयांच्या नोटांची बंडले भरलेली असल्याचे आढळले. जप्त करण्यात आलेली रक्कम चार ते पाच कोटी रुपये असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात पोलिसांनी गावातील चार जणांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू केली आहे. या घटनेची माहिती मिळताच एडीसीपी पुष्कर वर्मा यांच्यासह इतर अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. सध्या या प्रकरणाबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मुंबई पोलिस एका गुन्हेगारी प्रकरणातील आरोपी राकेश यादव याला अटक करण्यासाठी आणि मुद्देमाल जप्त करण्यासाठी प्रयागराजमधील नवाबगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बरई रामनगर गावात आले होते.

### सरकारची आणखी एका

थांबवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी ही राज्यातील किनारपट्टीच्या पर्यावरणाच्या संरक्षणासाठी महत्त्वाची यंत्रणा आहे. समुद्रकिना-यालगतच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण, किनारपट्टी व्यवस्थापन आराखड्यांची अंमलबजावणी आणि किनारी नियमन क्षेत्रातील विकासकामांवर देखरेख ठेवणे, ही तिची प्रमुख कामे आहेत. तसेच पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारींची चौकशी करण्याची जबाबदारीही या प्राधिकरणाकडे आहे.

कांदळवनांच्या संरक्षणावर काय परिणाम होणार?

समुद्रकिना-यावरील कांदळवने म्हणजेच मॅन्ग्रोव्ह पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. ही वने किनारपट्टीचे नैसर्गिक संरक्षण करतात. अनेक जलचर आणि पक्ष्यांना अधिवास उपलब्ध करून देण्यासही त्यांची मदत होते. त्यामुळे किनारपट्टीवरील पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी या भागांचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.

### ७० टक्के लोकांनी महायुतीला

माझ्याविरोधात बोलण्याचा त्यांना अधिकार नाही. कारण त्यांच्या पक्षाच्या उमेदवाराला मी स्वत: निवडून आणला आहे.

**राष्ट्रवादीनं सखोल आत्मपरिक्षण करावे-** तसंच महायुतीतील लोक जेव्हा अधिकृतपणे विरोध करु लागतात तेव्हा त्यामागची कारण शोधणं गरजेचं आहे. त्यामुळं आत्मपरीक्षण करणंही गरजेचं आहे. मी पाच वेळेचा आमदार आहे, ४० वर्षापासून राजकारण करतो आहे. अनेकवेळी मी राज्याच्या जबाबदा-या सांभाळल्या आहेत. पण माझ्यासारख्या कार्यकर्त्यांवर ही वेळ का येते याचा आत्मपरीक्षण व्हावं असं वाटतं त्यांनी भाजपच्या लोकांनी त्यांच्या पक्षाला, आमच्या पक्षानं आम्हाला विचारावं आणि राष्ट्रवादीनं तर याची पूर्ण चौकशी करुन असं का घडतंय याचा अभ्यास करणं गरजेचं आहे, असा सल्लाही त्यांनी दिला.

### फडणवीस, ठाकरे बंधूंमध्ये

दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आले. ग्रंथाली प्रकाशनाच्या वतीने आयोजित हा प्रकाशन सोहळा दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात पार पडला. या सार्वजनिक कार्यक्रमाच्या औपचारिक सुरुवातीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात बंद दाराआड चर्चा पार पडली. राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही प्रमुख नेत्यांमध्ये बंद दाराआड नेमकी काय चर्चा झाली, याबाबत राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

या तिन्ही नेत्यांच्या बंद दाराआड झालेल्या चर्चेला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील टोरेंट पॉवर प्रकल्पाच्या मुद्यावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नुकतीच राज्य सरकारवर जोरदार टीका केली होती. त्याचसोबत ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर प्रकरणात उद्धव ठाकरे यांची शिवसेना अत्यंत आक्रमक झाली आहे. तसेच विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन जागांवर तर महायुतीने दोन विजय मिळवला. यावरून महायुतीत शिवसेना आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू असतानाच हे गुप्तगू झाल्याने या चर्चेला विशेष महत्त्व आहे.

**दोन्ही ठाकरे बंधूंनी मला काम करू द्यावे-** या कार्यक्रमात टोलेबाजीने रंगत आणली. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी राज ठाकरे बोलावले तर मुख्यमंत्री येतात, असा उल्लेख केला. त्यावर राज ठाकरे यांनी याच्यापुढे मी बोलवत जाईन आणि ते येत जातील. पण २०२९ पर्यंत मुख्यमंत्र्यांना ठेवा म्हणजे झाले, असा शेलार यांना मिश्किल टोला लगावला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी मी राजकारणात काम करायला तयार आहे. परंतु दोन्ही ठाकरे बंधूंनी मला काम करू द्यावे, असा टोला लगावत कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली.

### देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट

आहे. त्यातून दोन तास वीजपुरवठा होणार असल्याने १००० मेगावॅट अवर इतकी बीईएसएस क्षमता उपलब्ध झाली आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या बॅटरी स्टोरेज योजनेतून सर्वच वीजग्राहकांना लाभ होत आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाला असून त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत. परिणामी विजेची उच्चांकी मागणी होत आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा पुरेसा व किफायतशीर दरात वीजपुरवठा होत आहे. सायंकाळी सौरऊर्जेचा पुरवठा बंद झाल्यानंतर वीज पुरवठा करण्यासाठी अधिक दराने वीज विकत घ्यावी लागते. अशा स्थितीत महावितरणच्या पुढाकाराने सुरू झालेल्या १००० मेगावॅट अवर क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पामुळे दिलासा मिळू लागला आहे.

महावितरणने एकूण ७५० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी साठवणूक प्रकल्प उभारण्याची योजना सुरू केली असून त्यातून दोन तासांसाठी प्रत्येकी ७५० मेगावॅट अर्थात एकूण १५०० मेगावॅट अवर वीज उपलब्ध होईल. त्यापैकी १००० मेगावॅट अवरचे काम पूर्ण झाले आहे. ऊर्वरित काम डिसेंबरअखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. याखेरीज ४००० मेगावॅट अवर क्षमतेचे प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे सायंकाळी उच्चांकी मागणीच्या वेळी हमखास वीज उपलब्ध होणे आणि बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर दरात उपलब्धता असे दोन लाभ आहेत. आगामी उन्हाळ्यात या योजनेचा सर्वाधिक लाभ होईल.

देशातील पहिली वीज कंपनी

देशातील वीज वितरण कंपन्यांमध्ये १००० मेगावॅट अवर इतक्या क्षमतेचे विकेंद्रित वितरण जाळ्याशी संलग्न असलेले बॅटरी स्टोरेज प्रकल्प सुरू करणारी महावितरण ही पहिली वीज वितरण कंपनी आहे. राज्यात एकूण ५० ठिकाणी प्रत्येकी १० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी स्टोरेज प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम हा नवीकरण ऊर्जा (रिन्युएबल एनर्जी) क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याद्वारे नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून तयार झालेली वीज साठविणे आणि ती वीज सर्वाधिक मागणीच्या वेळी वापरणे शक्य झाले आहे.

### अमरावतीतून बेपत्ता दोन

त्यात दोन्ही विद्यार्थिनी राजकमल चौकातून एकत्र जाताना दिसून आल्या. या महत्त्वपूर्ण धाग्याच्या आधारे पोलिसांनी त्यांच्या पुढील प्रवासाचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान दोन्ही विद्यार्थिनी अमरावतीहून बडनेरा रेल्वे स्थानकावर गेल्याचे आणि तेथून अकोला मार्गे मध्य प्रदेशात पोहोचल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासावर भर देत त्यांच्या हालचालींचा मागोवा घेतला. सायबर सेलच्या मदतीने मोबाइल लोकेशनसह उपलब्ध तांत्रिक माहितीचे विश्लेषण करण्यात आले. विद्यार्थिनींचे लोकेशन मध्य प्रदेशात असल्याची माहिती मिळाल्यानंतर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने स्थानिक पोलिसांशी समन्वय साधला. त्यानंतर दोन्ही विद्यार्थिनींना सुखरूप ताब्यात घेण्यात आले. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या शोधमोहिमेला यामुळे यश मिळाले. दोन्ही विद्यार्थिनींना अमरावतीत आणल्यानंतर नियमानुसार त्यांचे जबाब नोंदविण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक समुपदेशनही केले जाणार आहे. त्यांनी घर सोडण्यामागील कारण काय होते, त्या मध्य प्रदेशात कशा पोहोचल्या आणि या प्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास त्यांच्या जबाबानंतर स्पष्ट होणार आहे.

### महावितरणच्या पाहणीत उघड

करा' अशी धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या जबानी अहवालावरून रहिमापूर पोलिसांनी दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता एन.सी.आर. क्र. ०३२०/२०२६ नोंदविला असून, भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) २०२३ चे कलम ३५१(२) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.रब्बी हंगामाच्या तोंडावर पाण्यासाठी शेतकऱ्यांची होणारी धडपड आणि त्यातून निर्माण होणारे वाद हे गंभीर वळण घेत असल्याने महावितरण आणि पोलिस प्रशासनासमोर नवीन आव्हान उभे राहिले आहे. पुढील तपास रहिमापूर पोलीस करीत आहेत.

### अखेर कालव्यात वाहून

दिसताच एकच धावपळ निर्माण झाली.घटनेनंतर तिवसा तहसीलदार, पोलीस स्टेशन यासह जिल्हाधिकारी येथे रेस्क्यू टीम ला याबाबत माहिती देण्यात आली असता बुधवारी सकाळपासून शेतकऱ्याचा मृतदेह शोधण्याची मोहीम घटनास्थळापासून काही किलोमीटर अंतरापर्यत सुरू झाली मात्र कुठेही आढळून न आल्याने पुन्हा आज २९ ऑक्टोबर रोजी सकाळी रेस्क्यू टीमने शोध मोहीम राबविली. अखेर आज सायंकाळी धामणगाव रेल्वे तालुक्यातील अशोकनगरजवळ कॅनॉलच्या पाण्यात त्यांचा मृतदेह आढळुन आला.

### अमरावतीत ३ नोव्हेंबर रोजी

कंपनीमध्ये उमेदवारांना १२० पेक्षा अधीक जागांची संधी मिळणार आहे.

या भरती प्रक्रियेद्वारे इनसाइड सेल्स असोसिएट, इनसाइड सेल्स टीम लीडर, इनसाइड सेल्स मॅनेजर या पदाच्या १२० पेक्षा जास्त जागा भरल्या जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवार पदवीधर असणे आवश्यक असून एम.बी.ए. पदवी धारकाला प्राधान्य असेल किंवा उमेदवार पदव्युत्तर पदवी धारक असावा. उमेदवाराकडे उत्तम संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे. तसेच इंग्रजी, हिंदी आणि मराठी या भाषांचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. इच्छुक उमेदवारांनी ३ नोव्हेंबर रोजी स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट साईझ फोटो आणि सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह (व छायांकित प्रतींसह) केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. याबाबत काही अडचण किंवा अधिक माहिती माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ / ८३०८९५६२३६ / ७६२०५६०१२५ / ८६०५६५४०२५ वर तसेच amravatirojgar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.

### डिजिटल अरेस्टचा धाक,शेतकऱ्याची

झाल्याचे सांगून आरोपींनी शेतकऱ्यावर मानसिक दबाव निर्माण केला. या प्रकरणी शेतकरी रुपेश गणेशराव पाटणे (वय ४०, रा. भोंडपुरा, राजुरा बाजार, ता. वरुड) यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध वरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २० ते २६ ऑक्टोबरदरम्यान ही घटना घडली. या कालावधीत दोन वेगवेगळ्या मोबाइल क्रमांकांवरून अज्ञात व्यक्तींनी रुपेश पाटणे यांच्याशी संपर्क साधला. मुंबईत त्यांच्या नावाशी संबंधित एका मोबाइल क्रमांकावरून अश्लील व्हिडिओ आणि संदेश पाठविण्यात आल्याच्या तक्रारी असल्याचे आरोपींनी सांगितले. यानंतर आरोपींनी पाटणे यांच्या आधारकार्डचा वापर मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणात झाल्याचे सांगत सीबीआय चौकशी आणि कायदेशीर कारवाईची भीती दाखविली. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण करून आरोपींनी ऑनलाइन पद्धतीने एकूण ८ लाख ५० हजार रुपये उकळल्याची तक्रार आहे. या प्रकरणाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ग्रामीण सायबर सेलने पाठविलेल्या ई-झिरो अहवालाच्या आधारे वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

### आज गुरुकुंज आश्रमात लाखो

वतीने भावपूर्ण मौन श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित केला असून या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाला लाखो गुरुदेवभक्त उपस्थित राहून आपल्या गुरुमाऊलीला श्रद्धांजली अर्पण करणार आहे.

या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात सर्वधर्माच्या प्रार्थना, सामुदायिक प्रार्थना तसेच सध्या जगात अनेक ठिकाणी युद्ध, हिंसाचार व धर्मवाद सुरू आहे. त्यामुळे जगात सुख व शांती निर्माण व्हावी याकरिता विश्व शांततेसाठी संकल्प सुद्धा केल्या जाणार आहे.

आपल्या गुरुमाऊलीला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध ठिकाणाहून दिंडी, पालख्यासह लाखो भाविक गुरुकुंजात दाखल झाले आहे. श्रद्धांजलीचा कार्यक्रम ३.३० वाजतापासून सुरू होत असला तरी दुपारी २ वाजता पासूनच मुख्य मंडपात भाविक दाखल होतात.

### अॅड.निलेश हेलोंडे पाटील यांची

दुग्ध व्यवसाय अधिकारी मोर्शी उपस्थित होते.दौऱ्या दरम्यान त्यांनी संस्थेच्या दूध उत्पादक सदस्यांसोबत चर्चा करून दूध उत्पादन वाढीसाठी येणाऱ्या समस्यांबाबत माहिती जाणून घेतली. पशुसंवर्धन विभागामार्फत परिसरातील पशुपालकांसाठी प्रशिक्षण आयोजित करून त्यामध्ये मुख्यत्वे मुरघास तंत्रज्ञान व पशुसंवर्धन खात्याच्या विविध योजना याबाबत पशुपालकांना अवगत करण्याबाबत आवश्यक निर्देश दिले. उमेदमार्फत प्रशिक्षण आयोजित करून त्यामध्ये दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तंत्रज्ञान पशुपालकांना महिला बचत गटातील सदस्यांना प्रशिक्षित करण्याचे निर्देश पंचायत समिती अधिकाऱ्यांना दिले. संस्थेचे सभासद सुशांत भोकरे,चैतन्य देशमुख, अंकेश कडू,संकेत देशमुख,सचिन भोकरे तसेच गावातील पशुपालक उपस्थित होते.

### थकबाकीदार मालमत्तांवर कारवाई

एकूण थकबाकी ३ लाख ६७ हजार ४६७ रुपये इतकी आहे.

महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या या मोहिमेत झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, क्षेत्रीय अधिकारी प्रवीण ठाकरे तसेच C-७ चे कर लिपिक राज डेंडूले, आकाश चौधरी, सिध्दांत गाडे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत संबंधित मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत थकबाकी वसुलीसाठी ही कारवाई करण्यात आली असून, नागरिकांनी आपल्याकडील मालमत्ता कर वेळेत भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### वाघाडी प्रकल्पग्रस्तांना जमिन

यांनी याबाबतची दखल घेत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांना दिल्या असून शेतकऱ्यांना सात दिवसाच्या आत सानूग्रह अनुदान वितरित करण्याचे निश्चित करण्यात आले.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# नाना पटोले–बाबाराव खडसे भेटीचे राजकीय संकेत काय? चर्चांना वेग!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील बाबाराव पाटील खडसे हे शरदचंद्र पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. तद्वतच ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे विद्यमान प्रदेशउपाध्यक्ष असून नुकतीच अकोला येथे काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि बाबाराव पाटील खडसे यांची भेट झाली आहे. मात्र या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. 'त्या' भेटीमागील चर्चेचा नेमका धागा काय ? सदिच्छा भेट की आगामी राजकीय समीकरणांची नांदी? अशा प्रश्नार्थक चर्चा होत असल्याचं प्रकर्षाने जाणवत आहे.

राजकारणात काही भेटी केवळ सदिच्छा व्यक्त करण्यापुरत्या मर्यादित असतात. तर, काही भेटीच्या निमित्ताने नव्या चर्चांना आपोआप सुरुवात होते. महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) पक्षाचे विद्यमान प्रदेशउपाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांची नुकतीच



महत्त्वपूर्ण भेट झाली.यावेळी अकोल्याचे अमानकर साहेब यांची सुद्धा उपस्थिती होती. सदर भेट राजकीय चर्चेचा विषय ठरत असून, या भेटीत पटोले आणि खडसे पाटील यांच्यात झालेल्या गुफ्तगू संवादाने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे.परिणामी सदर भेटीकडे केवळ औपचारिक भेट म्हणून पाहायचे, की त्यातून काही राजकीय संवादाचे नवे दालन खुले होणार याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार ) हे महाविकास आघाडीतील महत्वाचे घटक पक्ष आहेत. दोन्ही पक्षांमधील समन्वय, परस्पर संवाद तद्वतच स्थानिक पातळीवरील राजकीय - सामाजिक संबंधांना अशा भेटीमुळे आपसुकच महत्व प्राप्त होते. म्हणूनच बाबारावजी पाटील खडसे यांच्यासारख्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची नाना पटोले यांच्याशी झालेली भेट राजकीय पार्श्वभूमीवर लक्षवेधी मानली जात आहे. मात्र ही भेट केवळ सदिच्छापुरती मर्यादीत होती की भविष्यातील सुसंवादाची एखादी महत्त्वाची सुरुवात ? याचे उत्तर येणारा काळच देईल. सध्यातरी या दोन नेत्यांच्या भेटीने चर्चांना नवा विषय दिला असून, पुढील घडामोडींकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे.

> राजकारणात संवादाची दारे खुली ठेवून, दोन मित्र पक्षातील परस्पर संबंध अधिक दृढ व्हावेत! जेणेकरून जनहिताच्या प्रश्नांवर एकत्रित आणि प्रभावी भूमिका घेता येईल. यासाठी ही सदिच्छा भेट होती. महाविकास आघाडीसाठी राजकीय संवादाच्या दृष्टीने या भेटीकडे सर्वांनी सकारात्मक दृष्टीने पाहावे..!
>
> **बाबाराव पाटील खडसे**
> ( प्रदेशउपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश)

# पथनाट्यातून भ्रष्टाचारावर प्रहार; लाचलुचपतविरोधी जनजागृती

## लाचेची मागणी झाल्यास तक्रार करण्याचे आवाहन; बसस्थानक, तहसील परिसरात मोहीम



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शासकीय कामासाठी लाचेची मागणी होत असेल, तर गप्प न बसता तक्रार करा, असा संदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांच्यावतीने मूर्तिजापूर शहरात देण्यात आला. बसस्थानक आणि तहसील परिसरात राबविण्यात आलेल्या जनजागृती मोहिमेत पथनाट्याच्या माध्यमातून भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करण्यात आली.

शासकीय कार्यालयातील कामे करून घेण्यासाठी लाच देणे किंवा स्वीकारणे हा कायद्याने गुन्हा आहे. असे असतानाही काही ठिकाणी लाचेची मागणी केली जाते. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहून भ्रष्टाचाराविरोधात पुढाकार घ्यावा, असे आवाहन या मोहिमेद्वारे करण्यात आले.

मूर्तिजापूर बसस्थानक परिसरात अकोला येथील नाट्यकर्मी युवा मंचच्या वतीने पथनाट्य सादर करण्यात आले. या माध्यमातून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईची माहिती देतानाच लाचेची मागणी झाल्यास नागरिकांनी कशा प्रकारे तक्रार करावी, याबाबत संदेश देण्यात आला.

अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक मिलिंदकुमार बहाकर यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता जनजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे. कोणत्याही शासकीय कामासाठी लाचेची मागणी झाल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले.

# राज्यस्तरीय मुले व मुली सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धेचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याद्वारा आयोजित राज्यस्तरीय चौदा वर्षा आतील मुले व मुली सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धेचे आयोजन मलकापूर तालुका क्रीडा संकुल येथे दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आले होते यामध्ये माउंट कार्मेल वाशिम येथील सार्थक दिगंबर मुंदे १४ वर्षातील मुलांमध्ये राज्यस्तरावर कांस्यपदक पटकावून जिल्ह्याचे व शाळेचे नाव उंचावले आहे त्याबद्दल त्याला शाळेचे मुख्याध्यापक फादर फीलीप एका मुख्याध्यापिका रणवीर कोर ओबेराय तसेच शाळेचे कर्मचारी वर्ग यांनी त्याची अभिनंदन केले व जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण क्रीडा अधिकारी मारुती सोनकांबळे राज्य किती मार्गदर्शक किशोर बोंडे व राज्य क्रीडा मार्गदर्शक बॉक्सिंग अक्षय टेंभुर्णीकर यांनी सुद्धा त्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचाली करता पोषण केले.

# मेडशीतील हनुमान वाडीत आग लागून दोन घरे जळून खाक !

■ प्रतिनिधी | मेडशी ■

मालेगाव तालुक्यातील मेडशी येथील हनुमानवाडी परिसरात २८ ऑक्टोबर रोजी सकाळी दीड ते दोन वाजताच्या सुमारास दोन घरांना अचानक आग लागली. या भीषण आगीत घरातील साहित्य पूर्णपणे जळून खाक झाल्याने एकूण २ लाख ६२ हजारांचे नुकसान झाले. त्यामुळे दोन्ही कुटुंबे उघड्यावर आली आहेत. घटनेचा पंचनामा तलाठी केशव अवचार यांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मेडशी येथील हनुमानवाडीत रात्रीच्या शांततेत अचानक लागलेल्या या आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केले.या दुर्घटनेत बबन बळीराम देवकर आणि सुरेश मोतीराम



शिंदे यांच्या घरातील अन्नधान्य, भांडी-कुंडी, कपडे, दोन सायकली आणि दैनंदिन निवाऱ्याचे सर्व साहित्य जळून खाक झाले आहे. यामध्ये सुरेश देवकर यांच्या घराला आग लागल्याचे समजताच परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.दुष्काळी परिस्थितीत डोक्यावरचे छत गेल्याने दोन्ही कुटुंबांवर मोठे संकट ओढवले आहे. प्रशासनाने पंचनामा करून पीडित कुटुंबांना निवारा, आर्थिक मदत, जीवनावश्यक वस्तू व पुनर्वसनाची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### वन्यजीव सप्ताह विशेष चित्रकला स्पर्धेत विद्याभारतीची उत्तुंग भरारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वन्यजीव सप्ताहानिमित्त वनविभागाद्वारे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा वन विभागातर्फे गौरव वन्यजीव सप्ताहानिमित्त वाशिम वन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा वन विभागातर्फे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेमध्ये इयत्ता ७ वीतील श्रद्धा गणेश इंगळे प्रथम क्रमांक मिळवला. तर द्वितीय क्रमांक इयत्ता ५ वीतील आराध्या संदीप नागे हिने तर तृतीय क्रमांक इयत्ता ६ वीतील मोहित विनोद पोपळघट याने पटकावला.

# अवैध पाणी उपशावर नियंत्रणासाठी गावागावांत विशेष सभा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून आगामी ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. तसेच जलाशयांमधील अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले आहेत. या अनुषंगाने जलाशयांवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये विशेष सभांचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार दुष्काळाची पहिली कळ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आणि पिण्याच्या पाण्याचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे.

जलाशयांमधून रात्रीच्या वेळी ट्रॅक्टरवर डिझेल पंप किंवा मोटार लावून अवैधरीत्या पाणी उपसा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन अवैध उपसा रोखण्यासाठी दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. ग्रामस्तरीय पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, आपदा मित्र, जलसुरक्षक आणि स्वयंसेवकांच्या सहकार्याने जलस्रोतांवर नियमित देखरेख व गस्त घालण्यात येणार आहे.

विशेष सभांमध्ये जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच लघु पाटबंधारे विभागाचे अभियंते सहभागी होणार आहेत. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ तसेच संबंधित शासन निर्णयांच्या अनुषंगाने या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सभांमध्ये गावातील उपलब्ध जलस्रोत, जलसाठ्याची सद्यस्थिती आणि पाणी किती काळ पुरेल, याचा आढावा घेण्यात येणार आहे. आगामी पावसाळ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन, अवैध पाणी उपशाबाबत तक्रार करण्यासाठी महावितरण, पोलीस, पाटबंधारे व पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देणे, तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जनजागृती करण्यावर भर दिला जाणार आहे. याशिवाय नाला खोलीकरण, गाळ काढणे यांसारख्या सार्वजनिक कामांचा आणि चारा लागवडीच्या नियोजनाचाही आढावा घेतला जाणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, जलसाठ्यांमधील अवैध पाणी उपसा आढळल्यास प्रशासनाला माहिती द्यावी.

# जिल्ह्यात अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना जारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, जलसाठ्यांमध्येही पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यासह अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी जिल्हा परिषद वाशिमच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने कठोर निर्देश जारी केले आहेत. ग्रामस्तरीय पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, जलसुरक्षक आणि पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असून, त्यांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

जिल्ह्यातील जलाशय, धरणे, तलाव आणि बंधाऱ्यांमधून अनधिकृतरीत्या पाणी उपसा होत असल्याचे आढळल्यास उपशासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करून सक्षम अधिकारी व नियुक्त पथकाला तातडीने कळविण्यात यावे. संबंधित दोषींवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. अवैध उपसा रोखण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी, पोलीस, जलसंपदा आणि महसूल विभागाशी समन्वय साधण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नळ पाणीपुरवठा योजनांच्या विहिरी व विंधन विहिरींच्या परिसरात पाणी उपलब्धतेवर विपरीत परिणाम करणाऱ्या नवीन विहिरी किंवा कूपनलिका घेण्यास प्रतिबंध करण्यासह सार्वजनिक विहिरी, हातपंप आणि सामुदायिक जलस्रोतांमधून अनधिकृत पाणी उपसा होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

### पाणीगळती रोखण्यासह काटकसरीच्या वापरावर भर

पाणीपुरवठा योजनेच्या वितरण वाहिन्या, नळ जोडण्या, व्हॉल्व्ह आणि जलकुंभांमधील गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. घरगुती नळ जोडण्यांना तोट्या बसविणे बंधनकारक करण्यात आले असून, वारंवार सूचना देऊनही पाण्याचा अपव्यय सुरू राहिल्यास नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. सार्वजनिक नळ, स्टँडपोस्ट, व्हॉल्व्ह आणि जलकुंभांची नियमित पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, असेही सूचित करण्यात आले आहे. उपलब्ध जलसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करून गावातील सर्व वाड्या-वस्त्यांना समान व न्याय्य पद्धतीने पाणी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. उपलब्ध पाण्याचा वापर प्रामुख्याने पिण्यासाठी आणि घरगुती गरजांसाठीच करावा. बागकाम, वाहने धुणे आणि रस्ते धुणे यांसारख्या कामांसाठी पाण्याचा वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामसभा, बैठका, दवंडी आणि सूचना फलकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

### टंचाईच्या संभाव्य परिस्थितीसाठी पूर्वनियोजन

गावातील विहिरी आणि अन्य जलस्रोतांच्या पाणीपातळीची नियमित पाहणी करावी. पाणीपातळी कमी झाल्यास किंवा जलस्रोत आटल्यास संबंधित उपविभागाला तातडीने कळवावे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पर्यायी जलस्रोत आणि आवश्यक उपाययोजनांचे आगाऊ नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. अवैध पाणी उपसा, पाणीगळती आणि टंचाईसंदर्भात नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद ठेवून त्यावरील कार्यवाही अद्ययावत करावी, तसेच ग्रामपंचायत, ग्रामसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय राखावा, असे निर्देश आहेत. पाणीपुरवठ्यातील अडचणी, जलस्रोतांची स्थिती आणि करण्यात आलेल्या उपाययोजनांचा नियमित आढावा घेऊन वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपविभागीय अभियंते, सरपंच, प्रशासक आणि ग्रामसेवकांना सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण करणे आणि पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून प्रशासनाच्या उपाययोजनांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### कुत्रीम बुद्धिमत्ता ही सृष्टीसाठी घातक - विजय तांबे

**अकोला :** आज संपुर्ण विश्वात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कुत्रीम बुद्धिमत्ता ने धुमाकूळ घातला आहे. या संदर्भात जगात दोन मताचे प्रवाह निर्माण झाले आहेत. एआयच्या अतिरेकामुळे या क्षेत्रातील अनेक संशोधकानी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. एआयचा भस्मासुर संपूर्ण सृष्टी समाप्त करेल काय अशी शंका आता निर्माण होत आहे. या एआय वर चिंतन होने आता काळाची गरज झाली.

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर दर्यापूर**
यू. एन. पाटील यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर दर्यापूर, दर्यापुर, अमरावती.

प्रोसेस क्र. २६८९/२०२६ दिनांक - २७/१०/२०२६

जातीने हजर राहण्याबाबत समन्स (आज्ञावली ५, नियम ३)

छकुली उर्फ अर्चना योगेश राऊत वि. योगेश अनिलराव राऊत पुढिल तारिख : ०७-१२-२०२६

**प्रति,**
**योगेश अनिलराव राऊत** रा.नानोरी, ह.मु. माधापुरी मुर्तिजापूर ता.मूर्तिजापूर जिल्हा अकोला

ज्याअर्थी छकुली उर्फ अर्चना योगेश राऊत यांनी तुमच्याविरुध्द बद्दल दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे ०७-१२-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी. आज २७-१०-२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर दर्यापूर**

# डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाचा पातूरमध्ये जल्लोष

## आयुर्वेद महाविद्यालयात फटाक्यांची आतषबाजी; लाडू वाटून आनंदोत्सव

■ प्रतिनिधी | पातूर ■

महाराष्ट्र विधान परिषदेच्या मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत श्री धनेश्वरी मानव विकास मंडळाचे सचिव डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी पहिल्याच निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय मिळविल्याच्या आनंदात पातूर येथील डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयात जल्लोष करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी, लाडू वाटप आणि उत्स्फूर्त घोषणांनी महाविद्यालयाचा परिसर दुमदुमून गेला.



डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी महाराष्ट्रासह छत्तीसगड आणि गोवा या तीन राज्यांत विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाचा विस्तार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वैद्यकीय, आयुर्वेद, होमिओपॅथी, नर्सिंग, फिजिओथेरपी आणि फार्मसीसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ते कार्यरत आहेत. त्यांच्या विजयामुळे मंडळाच्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या विजयोत्सवाला महाविद्यालयाचे संचालक डॉ. साजिद आर. शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. अभय भुस्कडे, धनंजय मिश्रा, मोहम्मद फारुख भाई, रमेश पोहरे, फरानामी, निखिल ऊपरवाट, रामदास शेगोकार, प्रशांत निकम, प्रशांत लोटे, शरद अवचार, पारूबाई यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि रुग्णालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> **शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा**
>
> डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाबद्दल अभिनंदन करताना संचालक डॉ. साजिद आर. शेख म्हणाले की, हा विजय शिक्षण, विकास आणि युवा नेतृत्वावर जनतेने दाखविलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. तीन राज्यांत शैक्षणिक क्षेत्राचा विस्तार करणाऱ्या डॉ. पाटील यांना विधान परिषदेच्या माध्यमातून जनसेवेची व्यापक संधी मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वातून शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांना न्याय मिळेल आणि विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पहिल्याच प्रयत्नात मिळविलेल्या या यशामुळे डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पातूर येथील आयुर्वेद महाविद्यालयातील विजयोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३२ ■ शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रेशन दुकानदाराची मनमानी! गरिबांच्या धान्यावर दुकानदाराची मर्जी

## सायं.५ ते ७ दुकान सुरू; लाभार्थ्यांशी उद्धट वर्तनाचा आरोप

### तहसीलदारांनी कारवाई करावी

**सेलू । जनमाध्यम :** दुष्काळाने आधीच कंबरडे मोडले, त्यात रेशन दुकानदाराच्या मनमानीचा फटका चाणकी (कोपरा), येथील रेशन दुकानाच्या कारभाराबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रेशन दुकानदार ऋषी नागदेवते हे मनमानी पद्धतीने दुकान चालवत असून, लाभार्थ्यांना धान्य मिळवण्यासाठी वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित दुकानदार सायंकाळी ५ वाजता दुकान उघडतो आणि अवघ्या दोन तासांत, म्हणजेच ७ वाजता दुकान बंद करतो. त्यामुळे दिवसभरातील कामे आटोपून रेशन घेण्यासाठी येणाऱ्या महिला आणि नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. धान्य उपलब्ध असतानाही कधी मशीन बंद असल्याचे, तर कधी अन्य कारणे सांगून लाभार्थ्यांना परत पाठवले



जात असल्याची तक्रार आहे.

'तुम्हाला रेशन द्यायला मला पगार मिळतो का' अशा शब्दांत दुकानदार लाभार्थ्यांशी उद्धटपणे बोलत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. गरजू नागरिकांना सन्मानाने धान्य मिळण्याऐवजी अपमान सहन करावा लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

आधीच दुष्काळसदृश परिस्थितीमुळे गावातील नागरिक आर्थिक संकटात आहेत. अशा वेळी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अडवणूक त्यांच्यासाठी अधिक त्रासदायक ठरत आहे.

या प्रकरणाची सेलूच्या तहसीलदारांनी तातडीने चौकशी करावी, दुकानाच्या वेळा आणि धान्य वितरणाची तपासणी करावी तसेच आरोपांत तथ्य आढळल्यास संबंधित दुकानदारावर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मानच्या २३ व्या हप्त्याचे आज वितरण

## १,२९,४४४ शेतकऱ्यांच्या खात्यात २५ कोटी ८८ लाख जमा होणार




**वर्धा जनमाध्यम :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीतील २४ व्या हप्त्याचे वितरण पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात बनासकांठा, गुजरात येथून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ३० ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देशातील लाभार्थी शेतक-यांना ऑगस्ट ते नोव्हेंबरचा २४ व्या हप्त्यातील देय लाभ जिल्ह्यातील एकूण १,२९,४४४ लाभार्थी शेतक-यांच्या बँक खात्यात एकूण २५ कोटी ८८ लाख ८८ हजार रक्कम रुपये बनासकांठा, गुजरात येथून ऑनलाईन समारंभामध्ये वितरीत होणार आहे. योजनेच्या २५ व्या हप्त्यापासून शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आलेले असून शेतकरी ओळखपत्र नसलेल्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा २५ व्या हप्त्यापासून लाभ अदा केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

या समारंभाचे थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा, ग्रामपंचायतस्तरावरून तसेच तालुक्यातील गावोगावी कृषि विभागामार्फत मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक यांनी आयोजन केले आहे. लाभ वितरण समारंभामध्ये http://pmindiawebcast.nic.in या लिंकव्दारे जास्तीत जास्त शेतक-यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर यांनी केले आहे.

# सेवाग्राम पुलावर वाहतुकीचा खोळंबा

## बंद पडलेला ट्रक बाजूला करण्यास चालकाची टाळाटाळ; रुग्णवाहिकाही अडकल्या

**वर्धा । जनमाध्यम :** सेवाग्रामकडे जाणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलावर बंद पडलेल्या ट्रकमुळे गुरुवारी वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला. सकाळपासून पुलावर उभा असलेला ट्रक क्रेनच्या साहाय्याने बाजूला करण्याची गरज असतानाही ट्रकचालक ट्रक हटविण्यास तयार नसल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी संपूर्ण पूल वाहतूक कोंडीत अडकला. सायंकाळी या कोंडीचा फटका अनेक वाहनचालकांना बसला, तर सेवाग्राम रुग्णालयाकडे रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकाही अडकून पडल्या.

सकाळपासून ट्रक बंद पडलेला असतानाही तो बाजूला करण्याबाबत निर्णय न झाल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला. पुलाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.



सायंकाळच्या गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिकच बिकट झाली. रुग्णवाहिकांना मार्ग मिळत नसल्याने रुग्णांच्या उपचारासाठी विलंब होण्याची भीती निर्माण झाली.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अखेर वाहतूक पोलिसांनी हस्तक्षेप करून रात्री आठ वाजता वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले.

# भरधाव दुचाकीची मोपेडला धडक; दोघी जखमी

**वर्धा :** बाजारातून मोपेडने घरी परतणाऱ्या दोन तरुणींना भरधाव दुचाकीने धडक दिल्याची घटना जेल रोडवरील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रवेशद्वारासमोर घडली. या अपघातात दोन्ही तरुणी जखमी झाल्या असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रामरावजी अमारे यांच्या तक्रारीनुसार, त्यांची मुलगी प्रियांका आणि तिची मैत्रीण प्रियांका मरोदे या दोघी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी होंडा ॲक्टिव्हा मोपेडने बाजारात गेल्या होत्या. खरेदी आटोपून घरी परतत असताना आदित्य मेडिकल ते जेल रोडवरील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रवेशद्वारादरम्यान समोरून आलेल्या मेटॅलिक रंगाच्या होंडा शाइन १२५ दुचाकीने त्यांच्या मोपेडला धडक दिली.

धडकेमुळे दोघी रस्त्यावर पडल्या. त्यात प्रियांका हिच्या चेहऱ्याला दुखापत झाली, तर मनगटाजवळ सूज आली. तिच्या मैत्रिणीलाही डोक्याला मार लागून रक्तस्राव झाला. अपघाताची माहिती मिळताच कुटुंबीयांनी रुग्णालयात धाव घेतली.

तक्रारीनुसार, दुचाकीचालकाने भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# आर्वीत २१०० कोटींची गुंतवणूक; वानखेडेंच्या पाठपुराव्याला यश

## वरुण बेव्हरेजेसचा १२५ एकरांवर प्रकल्प; ३२०० रोजगारांच्या संधी

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी विधानसभा मतदारसंघात औद्योगिक विकासाच्या दृष्टीने मोठी घडामोड घडली आहे. वरुण बेव्हरेजेस लिमिटेडच्या माध्यमातून आर्वी एमआयडीसीमध्ये तब्बल २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागासोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार सुमित वानखेडे यांनी निवडणुकीत दिलेल्या रोजगारनिर्मितीच्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

आर्वी एमआयडीसीतील १२५ एकर जागेवर अत्याधुनिक



अन्नप्रक्रिया आणि एफएमसीजी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. येथे शीतपेये, पॅकेज्ड पाणी, फळांचे रस, स्नॅक्स आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन होणार आहे.

या प्रकल्पातून ५५० हून अधिक प्रत्यक्ष आणि एकूण ३२०० हून अधिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्थानिक युवकांसह शेतकरी, दूध उत्पादक आणि वाहतूक व्यावसायिकांनाही याचा लाभ अपेक्षित आहे.

या गुंतवणुकीसाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल आमदार वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग सचिव अनबलगन आणि एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह यांचे आभार मानले. आता घोषणेचे प्रत्यक्ष रोजगारात रूपांतर कधी होते, याकडे आर्वीकरांचे लक्ष लागले आहे.

# चौकशीच्या आश्वासनाने आत्मदहनाचा निर्णय मागे

## सेलू ठाणेदारांवरील तक्रारीची आयजी कार्यालयाकडून दखल; निष्पक्ष चौकशीची मागणी

**वर्धा / जनमाध्यम :** सेलूचे ठाणेदार वाघोडे यांच्याविरोधात केलेल्या तक्रारीची नागपूर परिक्षेत्राच्या आयजी कार्यालयाकडून दखल घेण्यात आली असून, सखोल चौकशीचे आदेश दिल्याची माहिती मिळाल्यानंतर पत्रकार मंगेश चोरे यांनी आत्मदहनाचा निर्णय मागे घेतला आहे.

ठाणेदार वाघोडे यांच्या कथित भ्रष्टाचारासह बेकायदेशीर प्रकारांबाबत बातम्या प्रकाशित केल्यानंतर चोरे यांनी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र, कारवाई होत नसल्याने त्यांनी ३१ तारखेला वर्धा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. यासंदर्भात त्यांनी नागपूरचे आयजी संदीप पाटील यांची भेट घेऊन निवेदनही दिले होते.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सेलू ठाणेदारांविरोधातील तक्रारीची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे आयजी कार्यालयाकडून कळविण्यात आले. त्यानंतर सावंगीचे पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांनी चोरे यांना आत्मदहनाऐवजी कायदेशीर मार्गाने न्याय मिळविण्याचा सल्ला दिला.

चौकशी सुरू झाल्याने आपण समाधानी असल्याचे चोरे यांनी सांगितले. तसेच वर्धा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

# दुष्काळाने शेतकरी उद्ध्वस्त, सरकार मात्र सुस्त

## जाममध्ये रास्तारोकोतून शेतकऱ्यांचा एल्गार, एक लाखांची मदत द्या, सक्तीची वसुली थांबवा

### प्रभा राव विचार मंचाचे आंदोलन, कापसाला १५ हजार, सोयाबीनला १० हजार रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याची मागणी

**हिंगणघाट जनमाध्यम :** अपुरा पाऊस, हातातून गेलेले पीक आणि डोक्यावर कर्जाचा डोंगर, अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून समुद्रपूर तालुक्यातील जाम येथे २९ ऑक्टोबरला रस्तारोको आंदोलन करण्यात आले. प्रभा राव विचार मंचाच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना एक लाख रुपयांची तातडीची मदत द्या, कर्जवसुलीची सक्ती थांबवा आणि शेतमालाला योग्य भाव द्या, अशा



मागण्यांसाठी सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

यंदाच्या अपुऱ्या पावसामुळे शेतीचे अर्थकारण कोलमडले असताना शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकरी आर्थिक संकटात असताना सरकारने केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस निर्णय घ्यावेत, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

कापसाला प्रतिक्विंटल १५ हजार, तर सोयाबीनला १० हजार रुपये भाव द्यावा. कर्जमाफीची रक्कम तातडीने बँक खात्यांत जमा करून पुढील हंगामासाठी नव्याने पीककर्ज उपलब्ध करावे. पीकविमा योजना लागू करावी, शेतातील सौरऊर्जा योजना रद्द करून पूर्वीप्रमाणे वीजपुरवठा करावा, तसेच खासगी सावकार आणि फायनान्स कंपन्यांची सक्तीची वसुली रोखावी, अशा मागण्या करण्यात आल्या. रासायनिक खतांच्या दरांबाबत दिलासा देण्यासह खतांसाठीची ऑनलाइन नोंदणी बंद करण्याची मागणीही करण्यात आली. आंदोलनामुळे जाम येथील वाहतूक काही काळ ठप्प झाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सुमारे ३६ आंदोलनकर्त्यांना स्थानबद्ध केले. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

प्रवीण उपासे, डॉ. रामकृष्ण खुजे, गुणवंता कोठेकार, रामा वाघ, प्रशांत गहुकार, विजय तडस, मनीष साहू, निखिल श्रीवास, प्रवीण पणत, गजानन बोरेकर, सुरेश अराडे, अमित मांडवकर, महेश नागापुरे, पुरुषोत्तम भगत, प्रशांत वढूले, वामन बावणे, प्रशांत फोफारे, दिलीप डंभारे, मिलिंद डफ, कमलाकर देशमुख, बालू ठाकरे, पप्पू साठोणे, विशाल काळे, नूतन राठोड, नाना मानकर, तानबा वैद्य, श्याम उईके, अवी बंगाले, बंटी शेंडे, विनोद डंभारे आणि प्रीतम शिंदे आदी सहभागी झाले.

# रुग्णालयाचा कारभार रामभरोसे; कर्मचाऱ्यांच्या वेतनावर सरकारी ग्रहण

## कंत्राटी कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांचे वेतन थकीत

### आष्टी ग्रामीण रुग्णालयात अधीक्षकांचा ठणठणाट

**आष्टी शहीद जनमाध्यम :** ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्यसेवा देण्याची जबाबदारी असलेल्या आष्टी ग्रामीण रुग्णालयाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पूर्णवेळ वैद्यकीय अधीक्षक नाहीत, प्रशासकीय जबाबदारी दुसऱ्या रुग्णालयातील अधिकाऱ्यांकडे आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांपासून वेतन थकीत, अशी परिस्थिती समोर आली आहे. आरोग्य व्यवस्थेतील या अनागोंदीचा फटका अखेर कर्मचाऱ्यांना आणि पर्यायाने रुग्णालयाच्या कामकाजाला बसण्याची भीती व्यक्त होत आहे.



आष्टी ग्रामीण रुग्णालयाचा अतिरिक्त पदभार कारंजा घाडगे येथील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. दोन ठिकाणच्या जबाबदाऱ्या सांभाळताना आष्टीतील समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर केला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महत्त्वाचे असलेल्या या रुग्णालयात प्रशासकीय देखरेख आणि तक्रारींच्या निवारणासाठी पूर्णवेळ अधिकारी असणे आवश्यक असताना अतिरिक्त पदभाराची व्यवस्था कितपत प्रभावी ठरते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रुग्णालयातील कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांचे वेतन थकीत असल्याचे सांगण्यात येत आहे. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना वेतनच मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्नच प्रलंबित राहत असेल, तर संबंधित यंत्रणा नेमकी करते काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांची अधिकृत भूमिका समजू शकली नाही.

वेतन तातडीने द्या, पूर्णवेळ अधीक्षक नियुक्त करा आणि वरिष्ठ स्तरावरून रुग्णालयाच्या कारभाराची चौकशी करा, अशी मागणी होत आहे. आरोग्य विभाग या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन ठोस कारवाई करणार की कर्मचाऱ्यांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे राज्यस्तरीय संमेलन १ नोव्हेंबरला सेवाग्राममध्ये

**वर्धा जनमाध्यम :** राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक संघाचे राज्यस्तरीय संमेलन रविवार, १ नोव्हेंबर रोजी सेवाग्राम येथे आयोजित करण्यात आले आहे. राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून, अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस राहणार आहेत.

संमेलनाला भाजप शिक्षक आघाडीचे पूर्व विदर्भ अध्यक्ष अनिल शिवणकर, संघाचे राज्याध्यक्ष सुभाष जिरवणकर यांच्यासह राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात राज्य व राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यासह मंत्रालयात बैठक आयोजित करून शिक्षकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सेवाग्राम येथील नई तालीम, शांती भवन परिसरात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संमेलन होईल. महात्मा गांधी यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सेवाग्राममध्ये होणाऱ्या या संमेलनाला विशेष महत्त्व आहे. राज्यातील पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनशक्ती व एकजूट दाखवावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर, देवेंद्र गाठे, डॉ. गिरीष वैद्य, धर्मेंद्र अंबादे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्यांवर रामनगर पोलिसांचा दणका

## आयटीआय टेकडी, स्वावलंबी ग्राउंड परिसरात आठ प्रतिबंधात्मक कारवाया

**वर्धा जनमाध्यम :** सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा करून शांततेचा भंग करणाऱ्यांविरुद्ध रामनगर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी आयटीआय टेकडी व स्वावलंबी ग्राउंड परिसरात पोलिसांनी आठ प्रतिबंधात्मक कारवाया केल्या.

रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांकडून नियमित गस्त घालण्यात येत आहे. या गस्तीदरम्यान सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा करून शांततेला बाधा पोहोचविणारे इसम आढळून आले. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अन्वये कारवाई करण्यात आली.

सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना त्रास देणे, विनाकारण गोंधळ घालणे आणि शांततेचा भंग करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी सतर्कता वाढविली आहे. स्वावलंबी ग्राउंड, तुकडोजी ग्राउंड, ऑक्सिजन पार्क आणि हनुमान टेकडीसह निर्जनस्थळांवरही नियमित गस्त व प्रतिबंधात्मक कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी शांतता व शिस्त राखावी, कायद्याचे पालन करावे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन रामनगर पोलिसांनी केले आहे.


**नावात बदल**

माझे पूर्वी PARAVINBANU SK. MUSTAPHA असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील PARVIN ABDULALIM नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता:-सातपुते लेआऊट स्नेहल नगर वर्धा ४४२००१

**CHANGE IN NAME**

I, Mira Khond spouse of Late Khond Haribhau Dhond resident of Khond Layout, Deoli, Near Bus Stop, Deoli, Digdoh Road - 442101, Maharashtra, India have changed my Name from Mira Khond to Meera Haribhau Khond vide Affidavit dated 29/10/2026_(Place-Deoli)

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHAMMED ZINOFER असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील ZEENOFER MOHAMMAD AFSAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHM JENOFAR MOHM APSAR असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील NOFER MOHAMMAD AFSAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MOHAMMAD SUFIYAN AFSAR असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील MOHAMMAD SUFIYAN MOHAMMAD AFSAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी ZEENOFER FIRDOUS SAYYED AFZAL असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील ZEENOFER MOHAMMAD AFSAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी MUSKAN असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील ZEENOFER MOHAMMAD AFSAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: हनुमान नगर वॉर्ड नं १३ बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विधानपरिषद निवडणुकीत कमळ रुसले, बुकीही फसले

## सट्टेबाजारात १०० कोटींची गेमबाजी, निकालानंतर बुकींना मोठा फटका




**नागपूर/प्रतिनिधी-** विधान परिषद निवडणूकीच्या निकालात कमळ रुसल्याने अनेक बुकी फसले. नागपूर पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीच्या निमित्ताने खुललेल्या सट्टेबाजाराने यावेळी दोन वेळा उलटफेर केला. शेवटी सुमारे १०० कोटींची लगवाडी खयवाडी करून घेणाऱ्या बुकींना पदवीधर मतदारांनी जोरदार (आर्थिक) फटका दिला.

मध्य भारतातील सट्टेबाजारांचे सर्वात मोठे सेंटर म्हणून नागपूरचा बुकी बाजार देशभरातील सट्टेबाजारांत ओळखला जातो. येथे छोटे मोठे ५०० पेक्षा जास्त बुकी असून अनेक बडे बुकी थेट दुबईशी कनेक्ट आहेत. येथील अनेक बुकी गोव्यातून खयवाडी करतात. तर अनेक जण विदर्भासह बाहेरही सट्ट्याची लाईन देतात. विश्वचषक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांवर नागपूरच्या बुकी बाजारात शेकडो कोटींची खयवाडी-लगवाडी होते. लोकसभा, विधानसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणूकांच्या निमित्तानेही मोठा सट्टा लागतो. नेहमीप्रमाणे नागपूर पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीच्या निमित्तानेही बुकींनी मोठी सट्टेबाजी केली होती. प्रारंभीचा रेट खोलताना बुकींनी काँग्रेस उमेदवाराच्या बाजूने (फेवरेट) ९०-१५०चा रेट दिला होता. १७ ऑक्टोबरपासून मात्र भाजपा फेवरेट ८०-९० असा रेट आला.

२३ ऑक्टोबरला परत भाजपा उमेदवाराची बाजू भक्कम असल्याचे सांगून बुकी बाजाराने सुधाकर कोहळे यांचा अनुक्रमे ६० तर अभिजित वंजारी यांचा ८० पैसे तर २५ ऑक्टोबरला कोहळे ५५ आणि वंजारी ६० पैसे असा रेट दिला. अशा प्रकारे वारंवार भाजपाच्या विजयाचा दर देणाऱ्या बुकींनी २७ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून दुकान गुंडाळले. संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, यावेळीपर्यंत ९५ ते १०० कोटी रुपयांपर्यंतची सट्टेबाजी नागपूरच्या बुकीबाजारात झाली होती. २८ ऑक्टोबरला मोजके बुकी वंजारी फेवर रेट देऊन खयवाडी करू लागले. बुधवारी रात्रीपासून काँग्रेस उमेदवारांच्या विजयाचे संकेत मिळाल्यामुळे अनेक बुकी नॉट रिचेबल झाले.कराळेंमुळे अनेकांची बल्लेबल्ले

या निवडणूकीच्या बाजारात बुकींनी तिसऱ्या क्रमांकाची मते घेणारे नितेश कराळे अर्थात कराळे मास्तरांना प्रारंभी बेदखल केले होते. त्यामुळे निकालापूर्वी त्यांच्यावर कुणीही लगवाडी, खयवाडी केली नाही. मात्र, पहिल्या फेरीची मतमोजणी सुरू झाल्यानंतर विशिष्ट मतांच्या टप्प्यासाठी कराळे मास्तरांवर लगवाडी करणारांचे ७० पैशांपेक्षा जास्त रेट काही बुकींनी दिले. त्यावरही चांगली लगवाडी झाली आणि कराळे मास्तरांच्या बाजूने पैसे लावणाऱ्या सट्टेबाजांची दिवाळी झाली.

---

# विरार येथे बंद फ्लॅटमध्ये आढळले तीन बहीण-भावांचे मृतदेह

**मुंबई:** विरार (पश्चिम) येथील 'ग्लोबल सिटी' परिसरात एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये तीन अविवाहित बहीण-भावांचे मृतदेह आढळले आहेत. त्यांनी विष प्राशन करून जीवन संपवले असावे, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तत्पूर्वी त्यांनी गुजराती भाषेत एक व्हिडिओ रेकॉर्ड केला असून, त्यात आपल्या आजारपणाची व हलाखीच्या परिस्थितीची व्यथा मांडल्याचे तपासात समोर आले आहे.कुमार मेहता (५०), दिपेश मेहता (५२) आणि खेवना मेहता (४८) अशी मृत बहीण-भावांची नावे आहेत. हे तिघेही विरार (पश्चिम) येथील ग्लोबल सिटी परिसरातील 'गार्डन एव्हेन्यू' इमारतीच्या 'डी' विंगमधील फ्लॅट क्रमांक १२०३ मध्ये राहत होते. गुरुवारी या बंद फ्लॅटमधून प्रचंड दुर्गंधी येत असल्याचे लक्षात आल्यावर स्थानिक रहिवाशांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच बोळिंज पोलिसांनी गुरुवारी पहाटे २.३० च्या सुमारास घटनास्थळी धाव घेतली. फ्लॅटचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, तिघांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. बोळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांचा मृत्यू साधारण ३ ते ४ दिवसांपूर्वी झाला असावा. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, हे कुटुंब २०२५ पासून या घरात भाड्याने राहत होते. तीन भावंडांपैकी एकजण अर्धांगवायूने ग्रस्त होता, तर दुसरा भाऊ कर्करोगावर उपचार घेत होता. आजारपणाच्या वाढत्या खर्चामुळे आणि उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट कोसळले होते. आत्महत्येपूर्वी रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओमध्ये त्यांनी आपल्या आजारपणाचा आणि आर्थिक विवंचनेचा उल्लेख केला आहे. पोलिसांनी मृत भावंडांच्या दुस-या बहिणीशी संपर्क साधला असता, तिघांनाही पैशांची प्रचंड चणचण भासत होती आणि त्यांनी तिच्याकडेही आर्थिक मदतीची मागणी केली होती, असे तिने सांगितले. याप्रकरणी बोळिंज पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

# प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरण : मीनाक्षी शिंदेंनी दिला पदाचा राजीनामा

**ठाणे / प्रतिनिधी-**ठाण्यातील ठाकरेंच्या शिवसेनेचे विभाग प्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची २९ सप्टेंबर रोजी हत्या करण्यात आली होती. काही अज्ञातांनी त्यांच्यावर गोळीबार केला. तसेच, कोयत्याने वार करत निर्घुण हत्या केली. पूर्णेकर कुटुंबीयांनी या प्रकरणात माजी महापौर आणि शिवसेनेच्या महिला नेत्या मीनाक्षी शिंदे तसेच त्यांचे पती राजेंद्र शिंदे हे मुख्य सूत्रधार असल्याचे गंभीर आरोप केले.या घटनेला गुरुवारी ( २९ ऑक्टोबर) तब्बल १ महिना झाला. यावरून सध्या ठाण्यात मोठा वाद सुरु आहे. ठाकरेंची शिवसेना आणि शिंदेंच्या शिवसेना हे दोघेही एकमेकांसमोर आले आहेत. अशामध्ये गुरुवारी मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मीनाक्षी शिंदे यांनी शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे सुपूर्द केला आहे. 'गेल्या काही दिवसांपासून समाजमाध्यमांवर तसेच पक्षपातळीवर माझ्याबाबत सुरू असलेले आरोप-प्रत्यारोप व सर्वपक्षीय एकत्रित येऊन माझ्यावर विविध आरोप करत पक्ष नेतृत्वास अर्थात मुख्य नेते व पालकमंत्री म्हणून आपणास वेठीस धरण्याचे जे षडयंत्र चालू आहे हे पाहून माझ्या मनाला प्रचंड वेदना होत आहेत. मी आजवर संपूर्ण निष्ठेने पक्षाचे काम केले. पक्षाला किंवा आपणांस कधीही मान खाली घालावी लागेल, असे कोणतेही कृत्य केले नाही. तरीही, ज्या प्रकरणांशी माझा काहीही संबंध नाही, त्यामध्ये माझे नाव जोडून आपल्यावर आणि पक्षावर दबाव निर्माण केला जात आहे, हे पाहून मन व्यथित होते.' अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. 'ज्या नेतृत्वाचा सन्मान जपण्यासाठी मी आजवर काम केले, त्याच नेतृत्वाच्या बदनामीचे कारण माझ्यामुळे व्हावे, ही कल्पनाही मला सहन होत नाही. माझी निष्ठा आणि माझ्या कार्याची पावती आरोपांच्या माध्यमातून दिली जात असल्याची भावना मनाला बोचत आहे. म्हणूनच, मी ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री शिंदेंकडे सुपूर्द करीत आहे. हा निर्णय नाराजीतून नव्हे, तर आपल्या नेतृत्वाचा सन्मान आणि पक्षाची प्रतिष्ठा जपण्यासाठी घेतला आहे. असे म्हणत मीनाक्षी शिंदेंनी राजीनामा दिला आहे. २९ सप्टेंबरला ठाण्याच्या मानपाडा भागातील कार्यालयात प्रदीप पूर्णेकर यांची हत्या करण्यात आली आहे. यानंतर, पोलिसांनी या प्रकरणात सुभाष शिंदे उर्फ पप्या, निखिल यादव उर्फ शूटर, नितेश पवार, संतोष कनोजिया आणि अमित सिंह या पाच जणांना अटक केली आहे. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.



# देशातील १८ राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान विभागाने गुरुवारी १८ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे ताशी ९५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. समुद्रात उंच लाटा उसळण्याची आणि परिस्थिती बिघडण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. गुरुवारपर्यंत मासेमारीवर बंदी घालण्यात आली असून, समुद्रात असलेल्या मच्छीमारांना परतण्याचे निर्देश दिले आहेत. डोंगराळ भागांत दरडी कोसळण्याचा धोकाही व्यक्त करण्यात आला आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान, झारखंड, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, आसाम, त्रिपुरा, नागालँड आणि मिझोराम या राज्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राजधानी दिल्लीत वादळी वाऱ्यांसह मेघगर्जना आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. वाऱ्यांचा वेग ताशी ३० ते ४० किलोमीटर राहू शकतो. राजस्थानच्या जोधपूर, कोटा, बिकानेर, अजमेर, उदयपूर, भीलवाडा, अलवर, भरतपूर आणि सीकर येथे हलक्या पावसाचा अंदाज आहे. झारखंड खूंटी, सिमडेगा, गुमला, लोहरदगा, बोकारो, सरायकेला-खरसावां तसेच पूर्व आणि पश्चिम सिंहभूम जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पश्चिम बंगालमधील कोलकाता प्रादेशिक हवामान केंद्राने दक्षिण २४ परगणा, पूर्व आणि पश्चिम मेदिनीपूर, उत्तर परगणा, हावडा, हुगळी, झारग्राम, दार्जिलिंग, कालिम्पोंग, अलीपुरद्वार आणि जलपाईगुडी जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.



# आता रेल्वेत चार्जिंग नाही !

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वे आता प्रत्येक कोचमध्ये देण्यात येणाऱ्या चार्जिंग पॉईंट सुविधेबाबत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोबाईल, लॅपटॉप चार्जिंग सुविधेपासून वंचित राहवे लागू शकते, असे म्हटले जात आहे. ट्रेनला आग लागण्याच्या आणि पॉवर बँक स्फोटांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वेने सर्व डब्यांमधील मोबाईल चार्जिंग पॉईंट्स रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हा नियम लागू करण्यात आला आहे. रेल्वेमध्ये आगीच्या घटना टाळण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे बोर्डाने एक मोठे पाऊल उचलले आहे. रेल्वे बोर्डाने सर्व विभागीय रेल्वेला या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या नियमाचे पालन करण्यात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. दक्षिण पूर्व रेल्वेच्या एका डब्यात घडलेल्या घटनेनंतर रेल्वे बोर्डाने हे निर्देश जारी केले आहेत. रात्रीच्या वेळी चार्जिंग पॉईंट्स बंद केले जात नसल्याचे वृत्त होते. चार्जिंग सुरू असताना एका प्रवाशाच्या पॉवर बँकचा स्फोट झाला आणि त्यातून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडला. दरम्यान, या घटनेनंतर रेल्वेने चार्जिंग पॉईंट बंद करण्याच्या नियमांची अंमलबजावणी अधिक कडक केली आहे. या संदर्भात रेल्वे बोर्डातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे विशेष कार्य अधिकारी शोभित गुप्ता यांनी सर्व विभागीय रेल्वेच्या प्रधान मुख्य यांत्रिक अभियंत्यांना एक पत्र जारी केले आहे.

---

# शरियतच्या दृष्टीने गुन्हेगार...!

## केदारनाथ दर्शन अन् शिवभक्तीमुळे अभिनेत्री सारा अली खानविरोधात मौलानाचा फतवा

**मुंबई/ प्रतिनिधी-** बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान, तिच्या धार्मिक दौऱ्यांमुळे आणि केदारनाथ दर्शनामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.



मुस्लीम कुटुंबात जन्मलेली असूनही हिंदू धर्मावर श्रद्धा ठेवणारी आणि केदारनाथसह उज्जैन महाकालचे दर्शन घेणारी सारा अली खान स्वतःला शिवभक्त मानते. तिचे वडील सैफ अली खान मुस्लीम आहेत, तरी आई अमृता सिंह हिंदू आहे. आई हिंदू असल्याने तिचा लहानपणापासूनच पूजा-पाठ आणि हिंदू धर्माकडे ओढा राहिला आहे. मात्र आता, तिच्या या शिवभक्तीवर ऑल इंडिया मुस्लीम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना मुफ्ती शहाबुद्दीन रझवी बरेलवी यांनी आक्षेप घेतला आहे. एवढेच नाही, तर तिच्याविरोधात फतवाही जारी केला आहे.काही मुस्लीम तरुणांनी प्रश्न विचारल्याचे सांगत मौलाना मुफ्ती शहाबुद्दीन रझवी म्हणाले, 'इस्लामी शरियतनुसार कोणत्याही मुस्लीम व्यक्तीने दुसऱ्या धर्माच्या धार्मिक स्थळांवर जाऊन तेथील पूजा-पद्धतीचा अवलंब करणे अथवा मूर्तीपूजा करणे धार्मिक व्याख्येनुसार अस्वीकार्य आहे. सारा अली खानने केदारनाथ मंदिरात जाऊन पूजा-अर्चा केल्याचा संदर्भ देत त्यांनी हे कृत्य शरियतच्या नजरेत गंभीर गुन्हा, बेकायदेशीर आणि 'हराम' असल्याचे म्हटले आहे. मौलानांनी अभिनेत्रीला या कृत्याबद्दल पश्चात्ताप करून अल्लाहकडे मनापासून माफी मागण्याचा सल्लाही दिला आहे. महत्वाचे म्हणजे, हा फतवा मौलानांची धार्मिक व्याख्या आणि मत दर्शवतो. याकडे न्यायालयाचा निर्णय अथवा कायदेशीर शिक्षा म्हणून बघितले जाऊ शकत नाही, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नऊ परीक्षांसंदर्भात चौकशी-तुकाराम मुंढे

## व्यक्ती, परीक्षार्थी व विद्यार्थ्यांना १६ नोव्हेंबरपर्यंत निवेदन सादर करण्याचे आवाहन



**मुंबई/ प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमधील प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटण्याच्या कथित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे. यासंदर्भात व्यक्ती, परीक्षार्थी, विद्यार्थी तसेच संबंधित संस्थांनी आपली निवेदने १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावीत, असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे.

आयोगामार्फत औषध निरीक्षक परीक्षा गट-ब, २०२५; महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२५; महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा, २०२५; महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा, २०२४; अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा, २०२३; महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ आणि महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ या नऊ परीक्षांशी संबंधित प्रकरणांची चौकशी करण्यात येणार आहे.

**निवेदनासोबत कागदपत्रे जोडणे आवश्यक-** यासंदर्भात परीक्षार्थी, विद्यार्थी आणि अन्य व्यक्तींनी आपली निवेदने मराठी किंवा इंग्रजी भाषेत सादर करावीत. निवेदनासोबत वैध ओळखपत्राची प्रत तसेच कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. निवेदने आणि संबंधित कागदपत्रे आयोगाच्या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यालयाचा पत्ता : अन्न व औषध प्रशासन भवन, दालन क्र.२०१, दुसरी मजला, बीकेसी वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१. तसेच निवेदनाची एक प्रत complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या ई-मेलवरही पाठविता येईल. चौकशी आयोगाकडे प्राप्त झालेली निवेदने, प्रतिज्ञापत्रे आणि संबंधित कागदपत्रे गोपनीय ठेवण्यात येणार आहेत. निवेदनांची छाननी करून संबंधित व्यक्तीला आयोगासमोर साक्षीदार संदर्भात निर्णय अधिकार आयोगाकडे राहणार असल्याचेही महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगाचे सदस्य सचिव मुंढे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

---

# नक्षलमुक्त गोंदिया जिल्ह्याचा राष्ट्रीय गौरव!

## 'राष्ट्रीय एकता दिना'निमित्त गोंदियातील ५० नागरिकांचे प्रतिनिधी मंडळ गुजरातमधील एकता नगर येथे रवाना

**गोंदिया/ प्रतिनिधी-** 'नक्षलवादाच्या छायेतून विकासाच्या मुख्य प्रवाहाकडे वाटचाल करणाऱ्या गोंदिया जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर सन्मानाची संधी मिळाली असून, स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या भव्य राष्ट्रीय एकता दिन सोहळ्यात गोंदियातील ५० नागरिक सहभागी होणार आहेत.

भारताचे लोहपुरुष आणि देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी गुजरात राज्यातील एकता नगर, केवडिया येथे भव्य 'राष्ट्रीय एकता दिन' समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व जपण्याचा संदेश देणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र शासनाच्या विशेष उपक्रमांतर्गत पूर्वी नक्षलग्रस्त असलेल्या जिल्ह्यांतील नागरिकांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमधून प्रत्येकी ५० नागरिकांचे प्रतिनिधी मंडळ गुजरात येथे आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील ५० नागरिकांचा समावेश असून, या प्रतिनिधी मंडळाच्या सहभागामुळे जिल्ह्याच्या नक्षलमुक्तीच्या प्रवासाला आणि शांतता, विकास व राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. गोंदिया जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या समन्वयातून प्रतिनिधी मंडळाच्या गुजरात दौऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रतिनिधी मंडळातील पहिल्या टप्प्यात २७ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस निरीक्षक प्रमोद भातनाते, नक्षल सेल, गोंदिया यांच्यासोबत ३ नागरिकांना एकता नगर, गुजरात येथे पाठविण्यात आले. या नागरिकांचा २ दिवसांचा गुजरात दर्शनाचा कार्यक्रम सुरू आहे. त्यानंतर दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे आणि दीपक तरवडे यांच्या समवेत उर्वरित ४७ नागरिकांना गुजरात येथे रवाना करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया दिनेश शुक्ला यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रवासाला सुरुवात करण्यात आली. अशा प्रकारे गोंदिया जिल्ह्यातून एकूण ५० नागरिकांचे प्रतिनिधी मंडळ या ऐतिहासिक राष्ट्रीय एकता दिन सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

एकेकाळी नक्षलवादाच्या प्रभावामुळे भीती, असुरक्षितता आणि विकासातील अडथळ्यांना सामोरे जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्याने आज शांतता, सुरक्षितता आणि प्रगतीच्या दिशेने महत्वपूर्ण वाटचाल केली आहे. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासनाच्या नक्षलवाद निर्मूलनासाठीच्या सुरक्षा, विकास आणि पुनर्वसनविषयक सर्वसमावेशक उपाययोजनांमुळे जिल्ह्यात सकारात्मक परिवर्तन घडून आले आहे.

# शेतकरी चंद्रकांत शिंदे हत्या प्रकरण , तिघांना अटक; मुख्य आरोपीचा शोध सुरू

**नांदेड :** माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या अपहरणानंतर हत्या केल्याच्या प्रकरणाने नांदेड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात वजिराबाद पोलिसांनी तिघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके रवाना झाली असून, लवकरच त्याला जेरबंद करण्यात येईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी दिली. या प्रकरणात वजिराबाद पोलिसांनी जयकुमार ऊर्फ शेरा गायकवाड, आमेर शेख आणि इम्रान खान यांना अटक केली आहे.या तिघांना न्यायालयात हजर केले असता त्यांची २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. मुख्य आरोपीचा माग काढण्यासाठी वजिराबाद पोलीस ठाण्याची दोन पथके तसेच स्थानिक गुन्हे शाखेची पथके तपासात सक्रिय झाली आहेत. मुख्य आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांकडून शोधमोहीम तीव्र करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाला आणखी एक वळण मिळाले आहे. मुदखेड पोलिसांनी दत्ता गायकवाड यांच्या फिर्यादीवरून अपहरण करून मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित घटनांची व्याप्ती वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या गुन्ह्याच्या अनुषंगानेही तपासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**'के.एफ. एंटरप्रायजेस'चीही पडताळणी-** या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर 'के.एफ. एंटरप्रायजेस' या नावाचीही चर्चा सुरू झाली आहे. संबंधित संस्था आणि प्रकरणात चर्चेत आलेली संस्था एकच आहे का, याची पडताळणी पोलिसांकडून सुरू असल्याचे वृत्त आहे. या संस्थेचा प्रकरणाशी नेमका काय संबंध आहे, हे तपासातून स्पष्ट होणार आहे. शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या अपहरण व हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीची अटक, मुदखेडमध्ये दाखल झालेल्या स्वतंत्र गुन्ह्याचा तपास आणि संस्थेच्या संबंधांबाबतची पडताळणी या सर्व बाबींकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

# 'सणासुदीचे दिवस सुरू, व्यापाऱ्यांच्या कमाईवर पाणी नका फेरू'; आंदोलनावरून राहुल गांधींना आवाहन

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -** संविधान आणि लोकशाहीचे रक्षण करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी दि. १ नोव्हेंबर रोजी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या 'चलो दिल्ली रामलीला मार्च'मध्ये सहभागी व्हावे. 'व्होट चोरी' रोखण्यासाठी आणि लोकशाही वाचवण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे. पोलिसांच्या कारवाईची किंवा लाठ्यांची भीती बाळगू नका, असे आवाहन लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केले आहे. काँग्रेस आणि विरोधकांच्या या आंदोलनाला दिल्लीतील व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे. सणासुदीचा काळ आहे, व्यापाऱ्यांचे कमाईचे दिवस आहेत. त्यावर पाणी फिरवू नका, असे व्यापारी संघटनांचे म्हणणे आहे. सदर बाजार बारी मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष



परमजीत सिंग पम्मा यांनी सांगितले की, 'मोहब्बत की दुकान'च्या नावाखाली आमच्या दुकानांची तोडफोड करू नये, अशी मागणी संघटनेने केली. या संदर्भातील फलक घेऊन व्यापाऱ्यांनी राहुल गांधींना रॅली पुढे ढकलण्याचे आवाहन केले. दिवाळी आणि इतर सणांच्या आसपासचा काळ व्यवसायासाठी महत्त्वाचा असतो. या काळात मोठ्या संख्येने ग्राहक खरेदीसाठी दिल्लीच्या बाजारपेठांमध्ये येतात. मोठ्या रॅलीमुळे वाहतुकीत व्यत्यय येऊन वाहतूक कोंडी होण्याचा आणि ग्राहकांना गैरसोय होण्याचा धोका आहे. याचा व्यवसायावर थेट परिणाम होऊ शकतो, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

परमजीत सिंग पम्मा यांनी राहुल गांधींना आवाहन केले की, प्रेमाचा संदेश द्या, पण व्यापाऱ्यांच्या उपजीविकेला आणि व्यवसायाला धक्का लावून नव्हे. व्यापारी वर्षभर सणांची वाट पाहतात. ग्राहकांची वर्दळ आणि वाहतूक सुरळीत असणे आवश्यक आहे. अन्यथा, बाजारात पोहोचण्यास येणाऱ्या अडचणींचा व्यवसायावर विपरीत परिणाम होऊ शकतो. व्यापारी कोणत्याही आंदोलनाला विरोध करत नाहीत. बाजारपेठा सुरळीतपणे चालाव्यात. जनतेला कोणताही त्रास होऊ नये, एवढीच त्यांची इच्छा आहे. व्यापाऱ्यांच्या भावना आणि सणाचे महत्त्व लक्षात घेऊन, १ नोव्हेंबरची रॅली पुढे ढकलण्याचा विचार करावा, अशी विनंती त्यांनी राहुल गांधींना केली आहे. दरम्यान, लोकशाहीत प्रत्येकाला आपली मते व्यक्त करण्याचा आणि कार्यक्रम आयोजित करण्याचा अधिकार आहे, परंतु व्यापाऱ्यांची उपजीविका, सामान्य नागरिकांची सोय आणि बाजारपेठेतील सुव्यवस्था यांचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. या महत्त्वाच्या सणासुदीच्या काळात, ग्राहकांच्या येण्या-जाण्यात अडथळा निर्माण होईल आणि त्यांना आर्थिक नुकसान पोहोचेल, असे कोणतेही पाऊल उचलू नये, असे आवाहन व्यापाऱ्यांनी एकमताने केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## साखरेचे अर्थकारण

उत्पादनात झालेली घट, सणासुदीची मागणी, इथेनॉलनिर्मितीकडे वळलेला उसाचा साठा व व्यापाऱ्यांकडून झालेली साठेबाजी यामुळे सध्या देशात साखरेचे दर आकाशाला भिडले आहेत. केंद्र सरकारने साखरेचे दर नियंत्रणात राहावे, यासाठी दहा लाख टन कच्च्या साखरेच्या आयातीस परवानगी दिली आहे; पण अद्याप तेवढी आयात झालेली नाही, त्यामुळे साखरेचे दर सध्या तरी चढेच राहण्याची शक्यता आहे.सध्या देशात साखरेचे दर आकाशाला भिडले आहेत. जनतेला साखरेच्या इतक्या उच्च दरांची सवय नाही. त्यात तोंडावर देशातील सर्वात मोठा सण दिवाळी आहे. वर्षभरात साखरेचा सर्वाधिक वापर या काळात होतो. सध्या किरकोळ साखरेचे दर प्रतीनुसार ६० ते ८० रुपये प्रतिकिलोवर गेले आहेत. गेल्या वर्षी हेच दर ४० ते ४५ रुपये प्रतिकिलो होते.इतकेच नव्हे तर जुलै २०२६ मध्ये साखरेचे दर ४८ रुपये प्रतिकिलो होते. अवघ्या तीन महिन्यांत ते ६० रुपये प्रतिकिलोच्या दरम्यान गेले आहेत. पुढील काळातही या स्थितीत अजिबात सुधारणा होण्याची चिन्हे नाहीत. काही तज्ज्ञांच्या मते हे दर शंभरी पार होण्याची भीती आहे. कारण दुष्काळामुळे यंदा महाराष्ट्रात ऊस लागवडीत ७० टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. केंद्र सरकारने कालच देशात शंभर टक्के इथेनॉलमिश्रित इंधनाच्या वापराला परवानगी दिली आहे. त्यामुळे अमेरिका व ब्राझीलप्रमाणे आपल्या देशातही ई-१९९ इंधनावर वाहने धावू शकतील. अर्थात, त्यासाठी खास डिझाइनची इंजिन असणारी वाहने लागतील. ती तयार करण्याचा मार्ग या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. इथेनॉल प्रमुख्याने ऊस व मका यापासून तयार होते. आतापर्यंत इथेनॉलनिर्मिती हा साखर कारखान्यांच्या उपपदार्थ निर्मितीचा उद्योग होता. जर त्यातून अधिक उत्पन्न मिळाले, तर उपलब्ध ऊस मोठ्या प्रमाणात इथेनॉलच्या निर्मितीकडे वळून त्याचा परिणाम साखरेच्या उत्पादनावर व पर्यायाने दरांवर होण्याची भीती आहे.साखर उद्योग हा देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक ही साखर उत्पादनातील प्रमुख राज्ये आहेत. या उद्योगावर लाखो ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोडणी मजूर, साखर कारखान्यांतील कामगार, वाहतूकदार आणि ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था अवलंबून आहे. साखरेचे दर वाढले, तर ग्राहकांवर आणि खाद्यपदार्थ उत्पादकांवर परिणाम होतो. दर कमी राहिले, तर साखर कारखान्यांच्या उत्पन्नावर, शेतकऱ्यांच्या ऊसबिलांवर आणि कारखान्यांच्या आर्थिक स्थैर्यावर होऊ शकतो. २०२६-२७च्या हंगामाचा विचार करताना २०२६-२७ मध्ये देशातील साखरेचे उत्पादन २९५ लाख टन होण्याचा अंदाज आहे. २०२५-२६ मध्ये हे उत्पादन ३०६ लाख टन होते. देशांतर्गत मागणीच २८५ ते २९० लाख टनांची आहे. उत्पादनाच्या अंदाजामध्ये घट होण्यामागे यंदा पावसाची कमतरता, उसाची कमी उपलब्धता, साखर उतारा आणि इथेनॉलनिर्मितीसाठी कारखान्यांनी वळवलेला ऊस, ही प्रमुख कारणे आहेत. या वर्षी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील काही भागांमध्ये पावसाच्या तुटीमुळे उसाच्या वाढीवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कारण ऊस तुलनेने जास्त पाणी लागणारे पीक आहे. सिंचनासाठी पाणी कमी पडल्यास उत्पादन घटण्याची दाट शक्यता असते. प्रतिटन उसापासून किती साखर तयार होते, यावर कारखान्याचे अर्थकारण अवलंबून असते. ऊस उत्पादन घटण्याबरोबरच साखर उताराही कमी झाल्यास कारखान्यांना दुहेरी फटका बसतो. उत्पादन २९५ लाख टनांपर्यंत घसरले, तर देशांतर्गत मागणीच्या तुलनेत अतिरिक्त साखरेचे प्रमाण खूप कमी राहू शकते. अशा वेळी निर्यात, आयात, साठा आणि इथेनॉल धोरण यांचा साखरेच्या दरांवर मोठा परिणाम होणार आहे. साखर उत्पादनाचे गणित केवळ उसाच्या उपलब्धतेवर अवलंबून नसते. ऊस लागवडीखालील क्षेत्र, प्रतिहेक्टर उत्पादन, उसातील साखरेचे प्रमाण, हवामान, पाणीपुरवठा आणि कारखान्यांची कार्यक्षमता या घटकांचा एकत्रित परिणाम साखर उत्पादनावर होतो.भारतासारख्या मोठ्या देशात साखरेचे उत्पादन, देशांतर्गत वापर, निर्यात, साठा आणि इथेनॉलसाठी वळवण्यात येणारा ऊस यांचे एकत्रित नियोजन करणे आवश्यक आहे. उसाची खरेदी महाग होत असताना साखरेचा विक्रीदर त्याच प्रमाणात वाढला नाही, तर कारखान्यांच्या नफ्यावर दबाव येतो. त्यामुळे किमान विक्रीदराचा फेरविचार उद्योगासाठी महत्त्वाचा आहे. कारखान्यांकडून ४६ ते ४८ रुपये किलोने साखर घेऊन ती ६० ते ६५ रुपये दराने विकणाऱ्या व्यापाऱ्यांची सध्या चांदी झाली आहे. आपल्या देशात हे नेहमीचे आहे. मधल्यांना जास्त नफा मिळवून देणारी ही व्यवस्था वर्षानुवर्षे शेतकरी व उत्पादकांचे, तसेच ग्राहकांचे आर्थिक गणित बिघडवत आहे. तिच्यावर अंकुश लावण्याचा गंभीर प्रयत्न सरकारांकडून होत नाही, ही आर्थिक धोरणातील मोठी त्रुटी आहे. ती दूर झाली, तरी बाजारातील साखरेच्या दरावर नियंत्रण राखणे सरकारला शक्य होणार आहे. साखरेच्या दराच्या संकटात आता 'एल निनो'मुळे पावसाची मोठी तूट,गाळप हंगामाआधी साखर कारखान्यांकडे असलेला सुरुवातीचा कमी साठा आणि इथेनॉल धोरणातील बदल यांची भर पडली आहे. सरकारने साखरेचा देशांतर्गत वापर, सणासुदीची मागणी, अन्नप्रक्रिया उद्योग आणि पुढील हंगामातील संभाव्य उत्पादन यांचा विचार करून इथेनॉलसाठी वळवता येणाऱ्या उसाचे प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे. इथेनॉल उत्पादनासाठी केवळ ऊस किंवा साखर उद्योगावर अवलंबून न राहता मका आणि इतर योग्य धान्याधारित पर्यायांचा विचार करता येईल; पण इथेनॉलसाठी धान्याचा वापर करताना अन्नसुरक्षा, पशुखाद्याची गरज, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि पाण्याचा वापर यांचाही विचार आवश्यक आहे. इथेनॉलबाबतचा निर्णय केवळ पेट्रोलमधील मिश्रणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी, परकीय चलन वाचवण्यासाठी व कार्बन फूट प्रिंट कमी करण्यासाठी घेता कामा नये. तो देशातील अन्नपुरवठा, ऊर्जा सुरक्षा, शेतीचे अर्थकारण आणि पर्यावरण या सर्वांचा समतोल साधणारा असला पाहिजे.

# 'कॅग'च्या तपासणीत जलयुक्त शिवार फेल

**कॅगच्या कार्यप्रदर्शन तपासणीने जलयुक्त शिवार अभियानाच्या परिणामात्मक निकषांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. जलयुक्त शिवार अभियानाद्वारे जलसंधारणाची कामे झाल्यानंतरही काही गावांमध्ये मूलभूत पाणीपुरवठ्याची समस्या कायम राहिली. भूजलावरही या कामांचा अपेक्षेप्रमाणे परिणाम दिसून आला नाही.**



## पूर्वार्ध

महाराष्ट्रातील दुष्काळ हा केवळ पावसाच्या कमतरतेचा प्रश्न नाही; तो पावसाच्या पाण्याचे नियोजन, भूजलाचे व्यवस्थापन, पिकांची निवड, जलसंधारणाच्या कामांची गुणवत्ता आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर यांच्याशी जोडलेला प्रश्न आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहू असून, ५२ टक्के क्षेत्र दुष्काळप्रवण असल्याचे भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी (कॅग) नमूद केले आहे. ऑक्टोबर २०१४ मध्ये राज्यातील १८८ तालुक्यांतील २,२३४ गावांमध्ये तीव्र पाणीटंचाईची शक्यता व्यक्त करण्यात आली होती, तर नोव्हेंबर २०१४ मध्ये २२ जिल्ह्यांतील १९,०५९ गावे दुष्काळसदृश परिस्थितीत असल्याचे शासनाने जाहीर केले होते. याच पार्श्वभूमीवर डिसेंबर २०१४ मध्ये महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. २०१५ ते २०१९ या काळात दरवर्षी ५,००० गावे या प्रमाणे एकूण २५,००० गावे जलपरिपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. जलयुक्त शिवार योजनेची संकल्पना मूलतः महत्त्वाची होती. गावाच्या परिसरात पडणारे पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणे, भूजलपातळी वाढवणे, सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे आणि पाण्याच्या वापराची कार्यक्षमता वाढवणे हा या अभियानाचा हेतू होता. त्यासाठी सिमेंट नाला बांध, सलग समतल चर, शेततळी, नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे, जलसाठ्यांची दुरुस्ती, भूजल पुनर्भरण यांसारखी विविध कामे करण्यात आली. त्यामुळे योजना कागदावर किंवा केवळ घोषणेपुरती मर्यादित नव्हती; राज्यभर मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष कामे झाली, हे नाकारता येत नाही.

या अभियानाची आर्थिक व्याप्तीही मोठी होती. कॅगच्या तपासणीनुसार २०१५ ते २०१९ या कालावधीत २२,५८६ गावांमध्ये ६.४१ लाख कामे हाती घेण्यात आली आणि त्यापैकी सुमारे ६.३० लाख कामे म्हणजे ९८ टक्के कामे पूर्ण झाल्याचे नोंदविण्यात आले. डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण किंवा प्रगतिपथावरील कामांवर ९,६३३.७५ कोटी खर्च झाला होता. महाराष्ट्र शासनाच्या अलीकडील आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२४ पर्यंत जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील २२,५८६ गावांपैकी २२,५८१ सूक्ष्म पाणलोट पूर्ण झाल्याचे आणि खर्च सुमारे ९,७३१.३२ कोटी झाल्याचे नमूद आहे.मात्र येथेच या योजनेच्या यशाचे आणि अपयशाचे मूल्यमापन करताना एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यावा लागतो. कामांची संख्या आणि खर्च ही योजना किती मोठ्या प्रमाणावर राबवली याची मोजमापे आहेत; परंतु ती योजना किती यशस्वी झाली याची अंतिम मोजमापे नाहीत. अंतिम प्रश्न असा आहे, की या खर्चातून गावाला प्रत्यक्ष किती पाणी मिळाले, भूजलपातळी किती वाढली, सिंचनक्षेत्र किती वाढले आणि पुढील उन्हाळ्यात गावाला टँकरची गरज पडली का? कॅगच्या कार्यप्रदर्शन तपासणीने याच परिणामात्मक निकषांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

कॅगने सहा जिल्ह्यांतील १२ तालुक्यांमधील १२० गावांची आणि १,१२८ कामांची प्रत्यक्ष तपासणी केली. या नमुन्यातील ८३ गावांमध्ये निर्माण झालेला जलसाठा त्या गावांच्या पिण्याच्या व शेतीच्या पाण्याच्या गरजेपेक्षा कमी असल्याचे आढळले. या ८३ गावांमध्ये एकूण ६१,०४५ टीएमसी पाण्याची कमतरता होती. त्यातील ३७ गावांमध्ये नियोजित साठ्यापेक्षाही कमी साठा निर्माण झाला होता आणि २५ गावांमध्ये नियोजित साठ्याच्या तुलनेत ही कमतरता २० टक्क्यांपेक्षा जास्त होती. आणखी गंभीर बाब म्हणजे या ८३ पैकी १७ गावांना पाणीपुरवठ्यासाठी टँकर लावावे लागले. म्हणजेच जलसंधारणाची कामे झाल्यानंतरही काही गावांमध्ये मूलभूत पाणीपुरवठ्याची समस्या कायम राहिली. जलयुक्त शिवारच्या कामांचा परिणाम भूजलावरही अपेक्षेप्रमाणे दिसून आला नाही. कॅगने ज्या ५८ गावांमध्ये अभियानापूर्वी आणि अभियानानंतरच्या भूजलपातळीची तुलना करता येत होती, त्यांचा अभ्यास केला. त्यामध्ये ३५ गावांमध्ये म्हणजे सुमारे ५८ टक्के गावांमध्ये भूजलपातळी घटली, एका गावात कोणताही बदल झाला नाही आणि उर्वरित २२ गावांमध्ये वाढ झाली. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक गावात जलयुक्त शिवारमुळे भूजल घटले; परंतु या नमुन्यात मोठ्या संख्येने गावांमध्ये अपेक्षित सुधारणा झाली नाही, हे कॅगच्या निरीक्षणातून स्पष्ट होते.

### टँकरची वाढली संख्या

यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'जलपरिपूर्ण' किंवा 'वॉटर न्यूट्रल' गावाची व्याख्या आणि प्रत्यक्ष परिस्थिती यातील अंतर. तपासलेल्या १२० गावांपैकी ११२ गावांनी वॉटर न्यूट्रल रिपोर्ट तयार केली होती. त्यापैकी ७४ गावे म्हणजे ६६ टक्के गावे प्रत्यक्षात जलतटस्थ झाली नव्हती. आणखी ८० गावांना जलतटस्थ घोषित करण्यात आले होते; परंतु कॅगच्या तपासणीत त्यापैकी केवळ २९ गावे प्रत्यक्षात जलतटस्थ असल्याचे आढळले, तर ५१ गावांमध्ये उपलब्ध पाणीसाठा पाण्याच्या गरजेपेक्षा कमी असूनही ती गावे जलतटस्थ घोषित करण्यात आली होती. पिकांच्या पाण्याच्या गरजेची चुकीची गणना केल्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली. ११२ गावांसाठी अहवालात पाण्याची गरज ३.०३ लाख टीएमसी दाखवण्यात आली होती; परंतु योग्य पिकांच्या पाणीवापराच्या निकषांनुसार ती गरज ७.५६ लाख टीएमसी इतकी असल्याचे कॅगने गणित केले. या सुधारित गणनेनुसार ११२ पैकी केवळ एक गाव जलतटस्थ ठरू शकले असते. पाणीटंचाईची प्रत्यक्ष परिस्थिती दाखवणारी आणखी एक आकडेवारी विशेष लक्षवेधी आहे. कॅगने तपासलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या टँकरची संख्या २०१७ मधील ३,३६८ वरून २०१९ मध्ये ६७,९४८ पर्यंत वाढली. म्हणजेच जलयुक्त शिवार अभियानाच्या काळातच या निवडक जिल्ह्यांमध्ये टँकरची गरज प्रचंड वाढली. ही आकडेवारी संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू करता येणार नाही; मात्र निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये योजना दुष्काळाची पुनरावृत्ती थांबविण्यात अपेक्षित परिणाम साधू शकली नाही, याचे ती महत्त्वाचे निदर्शक आहे.

या अपयशामागे केवळ जलसाठ्याची कमतरता नव्हती. पाण्याची मागणी किती आहे आणि उपलब्ध पाणी किती आहे, यामधील संतुलन साधणे हा जलयुक्त शिवारचा महत्त्वाचा भाग होता. परंतु कॅगच्या निरीक्षणानुसार तपासलेल्या ११२ गावांपैकी ६५६? येथे अहवालातील आकडेवारीनुसार ६५६ गावांच्या संदर्भात पिकांच्या नमुन्याचा अभ्यास करण्यात आला आणि पाणी जास्त लागणाऱ्या नगदी पिकांचे क्षेत्र १९,६६६ हेक्टरवरून २२,६१० हेक्टरपर्यंत म्हणजे १५ टक्क्यांनी वाढले. म्हणजेच एका बाजूला पाणी साठविण्याचा प्रयत्न होत असताना दुसऱ्या बाजूला पाण्याची मागणी वाढविणारी पीकपद्धती कायम राहिली. त्यामुळे केवळ पाणीसाठा वाढवून दुष्काळावर कायमस्वरूपी मात करता येत नाही, हे या अनुभवातून दिसते.

(लेखक सहज जलबोध अभियानाचे, राज्य समन्वयक आहेत.)

**मयूर बागूल**
९०९६२१०६६९

### विधान परिषद निवडणुका

# काँग्रेस, नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी तीन धडे

महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील २८ जागांसाठी नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुका, चिंतन करण्यासारखे तीन राजकीय धडे देतात.

**१. काँग्रेसला अजून खूप काम करायचे आहे.**

विधान परिषद निवडणुका म्हणजे जनमताचा कौल नसतो, तसेच त्यांचे निकाल विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकांच्या निकालांचा अंदाज लावण्यासाठी वापरले जाऊ शकत नाहीत. तरीही, प्रत्येक निवडणूक, मोठी असो वा छोटी, राजकीय पक्षांसाठी त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याची, कमकुवत बाजू ओळखण्याची आणि सुधारणात्मक उपाययोजना करण्याची एक संधी असते. या राज्यांमध्ये लढवलेल्या १२ जागांपैकी काँग्रेसला सुरुवातीला एकही जागा जिंकता आली नाही, पण अखेरीस त्यांनी नागपूर जिंकले. एका विजयाने मोठे आव्हान मिटत नाही. काँग्रेसला आत्मपरीक्षण करण्याची आणि अधिक मेहनत करण्याची गरज आहे, ज्यात सत्तेत असलेल्या कर्नाटकचाही समावेश आहे.

**२. नरेंद्र मोदींच्या ट्विटकडे अधिक बारकाईने पाहण्याची गरज.**



पंतप्रधानांनी मतपत्रिका वापरून निवडणुका घेण्यात आल्याचे अधोरेखित करत, काँग्रेसच्या निवडणूक कामगिरीवरून त्यांच्यावर टीका केली. मला एक प्रश्न पडला आहे. मतपत्रिका वापरून होणाऱ्या निवडणुका मुळातच निष्पक्ष असतात, असे ते सुचवत होते का? की ईव्हीएम वापरून होणाऱ्या निवडणुकांशी तुलना करण्यासाठी ते लोकांना आमंत्रित करत होते? खरं सांगायचं तर, ईव्हीएम निवडणुकांमध्ये फेरफार होतो, असा स्पष्ट आरोप त्यांनी केलेला नाही. पण ईव्हीएमबद्दल काँग्रेसने वारंवार उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी मतपत्रिकांचा केलेला उल्लेख हा मुद्दा तपासण्यासारखा बनवतो. अजून एक तपशील आहे ज्यावर त्यांनी विचार करायला हवा. वाराणसीमध्ये, संसदेत ते ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात, तिथे भाजपने पदवीधर आणि शिक्षक या दोन्ही विधान परिषद जागा समाजवादी पक्षाकडे गमावल्या. या वेगवेगळ्या निवडणुका आहेत, ज्यात वेगवेगळे मतदार आहेत आणि त्यांच्या निकालांची तुलना लोकसभेच्या निकालाशी करता येणार नाही. तरीही, काँग्रेस हरल्यावर जर निकाल साजरा करण्यासारखे असतील, तर भाजप हरल्यावर, विशेषतः पंतप्रधानांच्या स्वतःच्या मतदारसंघात, त्या निकालांची नक्कीच छाननी व्हायला हवी.

**३. वेळेआधीच जल्लोष करण्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांना एक लाजिरवाणा धडा मिळाला.**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी काँग्रेसला 'मोठे शून्य' मिळाल्याचेही जाहीर केले. पण नागपूरमध्ये मतमोजणी अजूनही सुरू होती. काँग्रेसचे उमेदवार अभिजित वांजारी यांनी भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांचा ३,२७१ मतांनी पराभव करून नागपूर विभागीय पदवीधर मतदारसंघ राखला. यातील विडंबना म्हणजे, नागपूर हे फडणवीस यांचे गृहशहर आहे आणि येथेच आरएसएसचे मुख्यालयही आहे. त्यानंतर फडणवीस यांनी आपले ट्विट हटवले. काहीही न जिंकल्याबद्दल काँग्रेसची खिल्ली उडवण्यासाठी केलेली एक पोस्ट प्रसिद्ध झाल्यानंतर काँग्रेसने एक जागा जिंकल्यामुळे लाजिरवाणी ठरली. अनुभवी राजकारण्यांना वेळेआधीच जल्लोष करणे कसे अंगलट येऊ शकते हे समजते. विजयाचे श्रेय घेणे योग्य आहे,परंतु अंतिम निकाल येण्यापूर्वीच आपल्या प्रतिस्पर्ध्याला हरल्याचे जाहीर केल्यास विजयाचे रूपांतर अपमानात होऊ शकते. एखादे बढाईखोर ट्विट हटवल्याने त्याने मागे सोडलेला ठसा पूर्णपणे पुसला जातोच असे नाही.आपल्या राजकीय कारकिर्दीच्या या टप्प्यावर आणि अनुभवाच्या आधारावर, फडणवीसांना हे अधिक चांगल्या प्रकारे समजायला हवे. राजकारण आत्मविश्वासाला दाद देते, पण ते संयमाचीही मागणी करते.काँग्रेसने आपल्या पराभवांमधून धडा घेतला पाहिजे. मोदींनी आपल्या पक्षाच्या विरोधात असलेल्या निकालांचे परीक्षण करण्याची तयारी ठेवली पाहिजे. आणि राजकीय क्षेत्रातील सर्व ज्येष्ठ नेत्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वेळेआधीच विजयाचा उन्माद केल्यास त्यांना खऱ्या अर्थाने मिळायला हवे असलेले श्रेयदेखील हिरावले जाऊ शकते.

इथं हे नमूद करायला हवे की, भाजप आत्मपरीक्षण करते आणि आपल्या जय-पराजयातून शिकते. काँग्रेसने तसे केले आहे का? घराणेशाहीला पराभूत होण्यापासून वाचवायचे असल्याने, त्यांना मत न दिल्याबद्दल ईव्हीएम, निवडणूक आयोग आणि मतदारांना दोष देणे सोपे जाते. मतदानाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, प्रियांका गांधींपासून ते खर्गे आणि इतर अनेक काँग्रेस नेते मतदानाचे समर्थन करत आहेत. काँग्रेससाठी एक जागा जिंकणे हे काँग्रेसचा 'विजय' आणि भाजपची नामुष्की मानली जाते. उत्तम समतोल. शेवटी, काँग्रेसवर टीका करायची असेल, तर भाजपवरही टीका करावीच लागते.

**- अजेय पुनर्वसु**

# अर्थव्यवस्थेकडे बघण्याच्या झापडबंद दृष्टिकोन

प्रस्थापित व्यवस्थेने प्रसृत केलेल्या सुट्या सुट्या आकडेवारीवर टीका न करता त्यांच्याच विविध प्रकारच्या आकडेवारीला समोरासमोर ठेवून शव विच्छेदन केले पाहिजे. तरच लोकांना राजकीय अर्थव्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे आकळू शकेल!त्यांनी सांगितलेल्या आकडेवारी समोर दुसरी आकडेवारी ठेवून त्या जोड्या एकत्र बघा.

पिक विमा कंपन्यांचा नफा,त्यांच्या मुख्याधिकारांना मिळालेला बोनस आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या; विम्यातून पूर्ण नुकसानभरपाई न मिळणे आणि त्यातून कर्जबाजारीपणा वाढणे.देशातील खाजगी वाहनांच्या विक्रीचे वार्षिक आकडे आणि रस्त्यावर अपघातात होणारे मृत्यू आणि जखमींची संख्या, अधिक वाहने,अधिक इंधन, इंधनाच्या आयातीवर अधिकाधिक डॉलर्स खर्च होणे, रुपया घसरणे, त्यातून वाढणारी महागाई.स्पर्धा परीक्षांमधील जागा फक्त यूपीएससी/ एमपीएससी नाही अगदी शिपाई भरती साठी घेतलेल्या परीक्षा आणि त्याला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या; अनेक वर्षे मेहनत घेऊन स्वप्नपूर्ती न होणे,त्यातून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या.

मायक्रो फायनान्स, गोल्ड लोन कंपन्या यांच्या बॅलन्स शीट चे वाढते आकडे आणि गरिबांमधील वाढता अति कर्जबाजारीपणा; कर्जवसुलीसाठी होणारे अत्याचार आणि इतर मानवी शोकांतिका.श्रीमंताच्या सेलिब्रिटींच्या लग्नावर होणारे खर्च आणि नियमित उत्पन्न नसल्याने लग्न देखील होत नसलेल्या तरुणांची संख्या देशाची जीडीपी आणि दरडोई जीडीपी, आणि दरडोई जीडीपी मध्ये गरीब विकसनशील देशांमध्ये आपण कोठे आहोत.देशाच्या जीडीपीचा जगात कितवा क्रमांक आणि भूक निर्देशांक, आर्थिक विषमता सांगणारा गिनी निर्देशांक, यात कितवा क्रमांक.

सेन्सेक्स वाढल्यामुळे देशातील वाढलेले बाजारमूल्य, मार्केट कॅपिटलायझेशन आणि किती लाख कोटी रुपयांच्या भांडवलाचा दरवर्षी नाश केला जातो.किती आयपीओ बाजारात आले, किती भांडवल उभारणी झाली.आणि किती आय पी ओ अंडर वॉटर म्हणजे इश्यू प्राईस पेक्षा कमी किमतीत विकले जात आहेत किंवा लिस्टेड झालेल्या किती कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी विक्री बंद आहे.शिक्षणातील मुलींचे वाढते प्रमाण, उद्योजक स्त्रिया, नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करणाऱ्या स्त्रिया आणि जगातील लिंग तफावत निर्देशांकात देश जगातील १४५ देशांमध्ये १३१ व्या क्रमांकावर असणे.

सर्व काही पब्लिक डोमेन मध्ये आहे. प्रॉब्लेम आहे आपल्या राजकीय अर्थव्यवस्थेकडे बघण्याच्या झापडबंद दृष्टिकोनात. त्यांनी आपल्या डोळ्यात आपल्या नकळत त्यांना पाहिजे ती भिंगे इम्प्लांट केली आहेत. वाचन, अभ्यास, आकडेवारी, विश्लेषण आणि मूल्यधारित भूमिका यांच्या तीक्ष्ण सुरीने ती भिंगे काढून टाकावी लागतील.तरच प्रस्थापित व्यवस्थेच्या नॅरेटिव्हला उघडे पाडता येईल. तरच पर्यायी आर्थिक प्रारूपावर चर्चा रुजू लागतील. तरच लोकांचे राजकीय शिक्षण होईल. तरच देशातील लोकशाहीला अर्थ प्राप्त होईल.

**संजीव चांदोरकर**

शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# दुष्काळाच्या छायेत दिवाळी होणार 'कशी

## कपाशीची पहिलीच वेचणी आणि रान झालं मोकळं

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले



**फुलसावंगी , दि. २९ :** परिसरात गेल्या अडीच महिन्यांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे संपूर्ण ग्रामीण जनजीवनावर भीषण दुष्काळाचे गडद सावट पसरले आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे सोयाबीनचे उत्पादन प्रचंड घटले असून, दुसरीकडे कापसाची पहिलीच वेचणी आणि उलंगवाडी एकाच वेळी करण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर ओढावली आहे. निसर्गाचा कोप आणि सरकारची उदासीनता यामुळे शेतकरी पूर्णतः आर्थिक कोंडीत सापडला असून, ऐन सणासुदीच्या काळात ग्रामीण भागात भयाण वास्तव पाहायला मिळत आहे.

'पांढऱ्या सोन्याचा जिल्हा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळमध्ये दरवर्षी कापूस वेचणीपूर्वी शेतकरी सीतादेवीची पूजा करून मोठ्या उत्साहात वेचणीला सुरुवात करतात. एरवी कापसाचे चार ते पाच वेचे सहज मिळतात; मात्र यंदा ही आशा पूर्णपणे धुळीस मिळाली आहे. पहिलीच वेचणी शेवटची ठरेल अशी बिकट स्थिती निर्माण झाली असून झाडे वाळल्याने थेट उलंगवाडीची वेळ आली आहे. सोयाबीनला बाजारभाव बरा असला, तरी एकरी अवघे दोन ते तीन क्विंटलच उत्पादन निघाल्याने लावणी, बियाणे आणि मशागतीचा झालेला खर्चही वसूल झालेला नाही. ऑक्टोबर महिना संपत आला तरी नदी-नाले आताच पूर्ण कोरडे पडले आहेत. विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्याची पातळी कमालीची खोल गेल्याने आगामी रब्बी हंगामातील हरभरा आणि गहू यांसारखी पिके घेणेही अशक्य झाले आहे. सिंचनाची सोय असलेल्या हाताच्या बोटावर मोजण्याइतके शेतकऱ्यांना काहीसा आधार असला, तरी कोरडवाहू शेतकऱ्यांसमोर संपूर्ण वर्षभराचा प्रपंच कसा चालवायचा, हा बिकट प्रश्न उभा राहिला आहे. एकीकडे वाढत्या महागाईने सामान्यांचे जगणे असह्य केले आहे, तर दुसरीकडे शासन मात्र विकासाच्या आणि मदतीच्या केवळ मोठ्या गप्पा मारताना दिसत आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसत त्यांच्या माथी ५,००० रुपये मारले जात आहेत. पण आजच्या महागाईच्या काळात ५,००० रुपयांत काय होणार?" असा उद्विग्न सवाल शेतकरी विचारत आहेत. विशेष म्हणजे, ही ५ हजारांची जुमलेबाजी आणि घोषणाबाजी सोडली, तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात अजून एक रुपयाही जमा झालेला नाही, असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत. गुरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने पशुधन कवडीमोल भावाने विकण्याची पाळी आली आहे. मुलांचे शिक्षण, वसतिगृहाची फी, शिकवणी आणि औषधोपचाराचा खर्च कसा भागवायचा, या चिंतेने पालक ग्रस्त आहेत. ऐन दिवाळीच्या तोंडावर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने स्थानिक मजूर वर्ग ऊस तोडीसाठी अथवा परराज्यात कामाच्या शोधात स्थलांतर करत आहे. परिणामी वाड्या, वस्त्या आणि तांडे ओस पडू लागले असून, फुलसावंगीच्या मुख्य बाजारपेठेत पूर्णपणे शुकशुकाट पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांचे व्यवहारही ठप्प झाले आहेत.

# श्रद्धास्थानही चोरट्यांच्या निशाण्यावर!

## संत खटेश्वर महाराज मंदिरातून चांदीचे सिंहासन,चरणपादुका लंपास सीसीटीव्हीत चोरटे कैद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या जोडमोहा येथील संत खटेश्वर महाराज मंदिरालाच चोरट्यांनी लक्ष्य केल्याची घटना उघडकीस आली आहे. मंदिरातील चांदीचे सिंहासन आणि चांदीच्या चरणपादुका चोरट्यांनी लंपास केल्या असून, चोरी झालेल्या ऐवजाची किंमत लाखो रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून चांदीच्या मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. मंदिरातील पवित्र वस्तूंची चोरी झाल्याने भाविकांमध्ये संताप आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, मंदिरात घडलेला हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, तपासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे ठरू शकते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांची ओळख पटवून त्यांना जेरबंद करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. चोरीला गेलेल्या चांदीच्या वस्तूंचा शोध घेण्याचेही पोलिसांसमोर आव्हान आहे. दरम्यान, श्रद्धास्थान असलेल्या मंदिरातच चोरी होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. मंदिरांमधील सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा आणि रात्रीच्या गस्तीबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन चोरीचा ऐवज हस्तगत करावा,अशी अपेक्षा भाविकांकडून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा जिल्हा दौरा

**यवतमाळ :** भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई हे शनिवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी १ वाजता पुसद जि. यवतमाळ येथे आगमन, दुपारी १.१५ वाजता पुसद येथे महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. आशिष देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट, दुपारी २ वाजता पुसद येथे राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट, दुपारी ३ वाजता जिल्हा न्यायालय, पुसद येथे प्रस्तावित वकील भवनाच्या कोनशिला समारंभाला उपस्थिती, त्यानंतर ४.३० वाजता नागपूरकडे रवाना होतील.

**पोहरादेवीत नगारा भवन व बंजारा विरासतला भेट देणार**

माजी सरन्यायाधीश भूषण गवई हे शनिवारी सकाळी १०.३० वाजता पोहरादेवी येथील नगारा भवन व बंजारा विरासतला भेट देतील. यावेळी त्यांच्यासोबत मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड हेही उपस्थित राहतील.

### पाणी जपून वापरा, काटकसरीने वापरा! दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीचा संदेश

**पांढरकवडा :** राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाणी ही जीवनाची मूलभूत गरज असून, आज पाण्याची बचत केली तरच उद्याचे जीवन सुरक्षित राहील, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांनी दैनंदिन जीवनात छोट्या-छोट्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. दात घासताना, भांडी धुताना तसेच हात धुताना नळ सुरू ठेवू नये. गाडी धुण्यासाठी पाइप ऐवजी बादलीचा वापर करावा. कपडे धुताना वॉशिंग मशीनचा योग्य वापर करावा. घरातील वापरलेले पाणी झाडांना देण्यासाठी पुनर्वापर करावा, तसेच झाडांना आवश्यक तेवढेच पाणी द्यावे, असेही सांगण्यात आले आहे. शेतीमध्ये ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करून पाण्याची बचत करता येते. त्याचबरोबर पावसाचे पाणी साठवणे, घरगुती पाण्याचा पुनर्वापर करणे आणि गळती होणारे नळ व पाइप तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. पाण्याची टंचाई ही केवळ शेतकऱ्यांची समस्या नसून तिचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावरही

### पत्रकार श्रीकांत किटकुले यांचे निधन



**वणी :** येथील लोकदूत वृत्तपत्राचे पत्रकार श्रीकांत किटकुले (वय ५८) यांचे गुरुवारी (२९ ऑक्टोबर) सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने वणीतील पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किटकुले हे गुरुवारी सकाळी सुमारे ८ वाजता नेहमीप्रमाणे जगन्नाथ बाबा मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शनानंतर जवळच्या नाश्त्याच्या दुकानात नाश्ता करत असताना त्यांना अचानक भोवळ आली. त्यांना तातडीने वणी येथील सुगम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. श्रीकांत किटकुले यांचा दिनक्रम नियमित होता. दररोज सकाळी मंदिरात दर्शन घेतल्यानंतर ते नाश्ता करून बसस्थानकावर जात असत. तेथून वृत्तपत्रांचे पार्सल आणून वितरण करण्याचे काम ते नियमितपणे करत होते. वृत्तपत्र क्षेत्राशी त्यांची घट्ट नाळ जोडली गेली होती. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी आणि लहान भाऊ असा परिवार आहे. गुरुवारी दुपारी ४ वाजता वणी येथील स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांच्या निधनाबद्दल पत्रकार बांधव, मित्रपरिवार आणि परिचितांनी दुःख व्यक्त केले.

### पुरोगामी विचारांच्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई तेलंगे यांचे निधन



**यवतमाळ :** फुले, शाहू, आंबेडकर, अण्णा भाऊ यांच्या समतावादी विचारांचा प्रसार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी तन-मन-धनाने कार्य करणाऱ्या ज्येष्ठ पुरोगामी सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई तेलंगे यांचे गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.१५ वाजता अल्पशा आजाराने वयाच्या ७९व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक चळवळीतील एक समर्पित व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले असून, मातंग समाजातील महिलांच्या सामाजिक कार्याची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पुष्पाताई यांनी आयुष्यभर सामाजिक कार्याला प्राधान्य देत निस्वार्थी भावनेने आणि तळमळीने समाजासाठी योगदान दिले. फुले, शाहू, आंबेडकर,अण्णा भाऊ यांच्या विचारांचा जागर करत सामाजिक समता, बंधुता आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विशेषतः मातंग समाजातील महिलांमध्ये त्या अग्रणी कार्यकर्त्या म्हणून परिचित होत्या. त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळाली. त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रातील एका निष्ठावान कार्यकर्तीला समाज मुकला आहे. त्यांनी केलेले सामाजिक कार्य आणि समाजाप्रती असलेली त्यांची आस्था कायम स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात पती मधुकर तेलंगे, दोन मुले, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# दिवाळीच्या मिठाईत भेसळीचा संशय,अन्न प्रशासनाच्या तपासणीचे काय?

## नामांकित स्वीट मार्टच्या तपासणीची मागणी,खवा,दूध आणि शिळ्या मिठाईच्या विक्रीवर नियंत्रण कोणाचे?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २९ :** दिवाळीचा सण जवळ येताच मिठाई, दुग्धजन्य पदार्थ आणि खाद्यपदार्थांच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. मात्र, या सणासुदीच्या काळात निकृष्ट, भेसळयुक्त आणि मुदत संपलेल्या मिठाईच्या विक्रीची शक्यता लक्षात घेता नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अशा परिस्थितीत पुसद शहरातील नामांकित स्वीट मार्ट, मिठाईची दुकाने आणि हॉटेल्सची तपासणी अन्न व औषध प्रशासनाकडून कधी होणार, असा सवाल उपस्थित होत आहे. कलाकंद, पेढे, बर्फी, गुलाबजामून, रसगुल्ला यांसह विविध दुग्धजन्य पदार्थांना दिवाळीत मोठी मागणी असते. मात्र, मिठाई तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा खवा व दूध दर्जेदार आहे का, पदार्थ किती दिवसांपूर्वी तयार केले आहेत आणि त्यांची साठवणूक नियमानुसार होते का, याची तपासणी आवश्यक आहे. काही व्यावसायिकांकडून शिळे अथवा मुदत संपलेले पदार्थ विकले जाण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दुधाचे वाढते दर पाहता कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर मिठाई तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बाहेरून आणल्या जाणाऱ्या खव्याची गुणवत्ता, संशयास्पद दुग्धजन्य पदार्थ आणि खाद्यपदार्थांतील संभाव्य भेसळ यांची प्रयोगशाळेत तपासणी होणे गरजेचे आहे. केवळ लहान दुकानदारांपुरती तपासणी मर्यादित न ठेवता नामांकित प्रतिष्ठानांमध्येही नियमित तपासणी व नमुने संकलित करण्याची मागणी होत आहे. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम राबवून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे. अन्यथा, सणाच्या आनंदात आरोग्याशी तडजोड होण्याची भीती कायम राहणार आहे.

# वाढदिवसानिमित्त अडेगाव शाळेला पंख्यांची भेट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**झरी, दि. २९ :** राजाऊ गायत्री केतन ठाकरे हिच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,अडेगाव येथील डिजिटल रूमसाठी पंखे भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सोयीचे वातावरण मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षांपासून वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून आनंद साजरा करण्याची परंपरा ठाकरे परिवाराने जपली आहे. यावेळी विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणून शाळेच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे कार्य पारखी सर करीत आहेत. त्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत 'माझी शाळा, माझी जबाबदारी' या भावनेतून माजी विद्यार्थी, पालक व नागरिकांनी शाळेच्या प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी, परिवारातील सदस्य व मित्रपरिवार उपस्थित होते.

# दुष्काळात शेतकरी हतबल,सोयाबीनच्या भावघसरल्याने आर्थिक कंबरडे मोडले!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** जिल्ह्यात कोरड्या दुष्काळामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता सोयाबीनच्या घसरत्या बाजारभावाचा मोठा फटका बसत आहे. हातात आलेल्या शेतमालाला योग्य दर मिळण्याऐवजी दोन दिवसांत क्विंटलमागे ५०० ते ६०० रुपयांची घसरण झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. दिवाळीच्या सणासुदीतच उत्पन्न घटल्याने शेतकऱ्यांनी सण साजरा करायचा तरी कसा, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे.

दोन दिवसांपूर्वी प्रतिक्विंटल ७१०० ते ७२०० रुपयांपर्यंत भाव मिळत असलेल्या सोयाबीनचे दर आता ६१०० ते ६८०० रुपयांपर्यंत घसरल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या अचानक झालेल्या भावघसरणीमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. व्यापाऱ्यांकडून एकजुटीने भाव पाडले जात असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. बाजार समिती प्रशासन आणि शासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. यंदा पावसाने दीर्घकाळ दडी मारल्यामुळे सोयाबीन आणि कापूस उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. उत्पादनात घट, वाढता लागवड खर्च आणि त्यातच बाजारभावातील घसरण, अशा दुहेरी संकटाने शेतकरी हवालदिल झाला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची पूर्ण भरपाई करणे शक्य नसले, तरी उत्पादित शेतमालाला तरी योग्य भाव मिळणे आवश्यक आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती किशोर इंगळे यांनी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली आहे. पाच हजार रुपयांची तुटपुंजी मदत देण्याऐवजी एकरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी त्यांनी केली. सोयाबीन व कापसाला योग्य हमीभाव मिळावा, बाजारातील भावघसरणीवर नियंत्रण ठेवावे आणि व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दुष्काळाने पीक हिरावले आणि भावघसरणीने उत्पन्नावर घाला घातला. अशा परिस्थितीत दिवाळी गोड करण्यासाठी शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस आर्थिक मदत आणि शेतमालाला योग्य दर देण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# बनावट सोन्याच्या देवशिक्क्यांनी सोनाराला १३ लाखांचा गंडा!

## ११ देवशिक्के तारण ठेवून तिघांची फसवणूक, उमरखेडमध्ये गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २९ :** सोन्याचे असल्याचे भासवून बनावट देवशिक्के तारण ठेवत एका सोनाराची तब्बल १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उमरखेड शहरातील सोनार लाईन परिसरात उघडकीस आला आहे. एका महिलेसह तिघांनी संगनमताने हा प्रकार केल्याचा आरोप असून, या घटनेमुळे सराफा व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, कैलास नर उदावंत (वय ५५, रा. टिळक वार्ड, उमरखेड) हे २८ ऑक्टोबर रोजी के.एन. ज्वेलर्स येथे असताना दुपारी एकच्या सुमारास शिवा नावाचा व्यक्ती दोन साथीदारांसह दुकानात आला. पैशांची गरज असल्याचे सांगत त्यांनी सोन्याचे देवशिक्के दाखविले. त्यांच्यावर विश्वास ठेवून उदावंत यांनी १३ तोळे वजनाचे ११ देवशिक्के तारण स्वीकारले आणि त्याबदल्यात १३ लाख रुपये रोख दिले. मात्र, काही वेळातच तारण ठेवलेल्या देवशिक्क्यांबाबत संशय निर्माण झाल्याने त्यांनी बुलढाणा अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेत मशीनद्वारे तपासणी केली. त्यावेळी देवशिक्के बनावट असल्याचे स्पष्ट झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संबंधितांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांनी दिलेला मोबाईल क्रमांक बंद आढळला. बनावट सोन्याच्या व्यवहारातून झालेल्या या फसवणुकी मुळे सराफा व्यावसायिकांनी तारण स्वीकारताना सोन्याची अधिकृत व तांत्रिक तपासणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. बनावट देवशिक्के खरे असल्याचे भासवून १३ लाख रुपये घेऊन आरोपी पसार झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात २८ ऑक्टोबर रोजी रात्री ९.३५ वाजता भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(१), ३१८(२), ३१८(४) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे पुढील तपास करीत आहेत.

# 'युवासेतू २.०'मध्ये ८५ विद्यार्थ्यांचा सहभाग

## स्त्री सक्षमीकरण, लोकशाही मूल्ये आणि चिकित्सक विचारांना व्यासपीठ.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** युवकांनी केवळ भविष्याची स्वप्ने पाहू नयेत, तर वर्तमानातील सामाजिक परिवर्तनाचे नेतृत्व करावे, या उद्देशाने आयोजित 'युवासेतू २.०' युवा संसदेने यवतमाळात लक्ष वेधले. या उपक्रमात ८५ हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेत स्त्री सक्षमीकरण, नेतृत्वगुण आणि लोकशाही मूल्यांवर विचारमंथन केले.

युवासेतूच्या संस्थापक हिरा राखी देशमुख यांच्या पुढाकारातून आयोजित या एकदिवसीय उपक्रमात इयत्ता सहावीपासून पदवीपूर्व स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांना विचार मांडण्याची आणि चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळाली. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता संसदीय कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, प्रश्न विचारण्याचे धाडस निर्माण करणे आणि सामाजिक समस्यांकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाला राजीव सायन्स कॉलेजचे कार्यवाहक प्राचार्य डॉ. राजराजेश्री देशमुख, यवतमाळ पब्लिक स्कूलच्या प्राचार्य अर्चना कडव, शिल्पा जाजू, क्रिमिनल सायकोलॉजिस्ट राही ठाकूर आणि शिक्षिका वसुंधरा केळापुरे उपस्थित होत्या. चर्चासत्रांच्या परीक्षक पॅनेलमध्ये कृष्णा केळापुरे आणि आफ्रा इक्बाल यांनी सहभाग घेतला, तर दिशा शर्मा यांनी सूत्रसंचालन केले. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रश्न विचारणारी, स्वतःचे मत निर्भीडपणे मांडणारी आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारी युवा पिढी घडणे आवश्यक आहे. त्या दिशेने 'युवासेतू २.०'ने विद्यार्थ्यांना विचार, संवाद आणि नेतृत्वाची संधी उपलब्ध करून दिली.

# काँग्रेस कमिटी ओबीसी सेलचे संघटन बैठक संपन्न!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २९ :** दि.२९ ऑक्टोंबर रोजी वाशीम रोड धनकेश्वर नगर पुसद येथे काँग्रेस कमिटी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष तथा माजी दुग्ध विकास आयुक्त पी. बी.आडे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. या वेळी ओबीसी सेल संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी त्यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनादरम्यान पी.बी. आडे यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात प्रगती साधण्यासाठी शिक्षण हेच मुख्य साधन असून प्रत्येक मुला-मुलीला उच्च शिक्षण देण्याचे आवाहन केले. माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांचे कार्य हरित क्रांतीचे प्रणेते यांच्या दूरदृष्टीपूर्ण कारकीर्दीचा आणि त्यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला.ओबीसी सेल संघटन ओबीसी समाजाच्या हक्क व अधिकारांसाठी संघटन कसे मजबूत करावे, यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

**प्रमुख उपस्थितीः**

पी.बी.आडे जिल्हाध्यक्ष, काँग्रेस कमिटी ओबीसी सेल तथा माजी दुग्ध विकास आयुक्त, विष्णू भि. राठोड विधानसभा अध्यक्ष, युवक काँग्रेस, निलेश आडे (युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष)यांची विशेष उपस्थिती होती तसेच या बैठकीस धनकेश्वर नगरवाशी आणि महिला मंडळाच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांचा व स्थानिक नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद या बैठकीचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

# जलसमाधी आंदोलनाने शासनाचे लक्ष वेधले!

## मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वातील संघर्षाला यश
## मंत्रालयातील बैठकीत अनुदान वितरणाबाबत सकारात्मक निर्णय



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

वरुड तालुक्यातील पाकनदी प्रकल्पासाठी सरळ खरेदीने जमीन दिलेल्या शेतकऱ्यांचे हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान मंजूर होऊनही गेल्या दोन वर्षांपासून रखडले होते. या अनुदानासाठी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने वारंवार शासनदरबारी पाठपुरावा केला. मात्र, अनुदान मिळत नसल्याने अखेर संस्थापक अध्यक्ष मनोज शामरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी पाकनदी प्रकल्पात जलसमाधी आंदोलनाचा इशारा देत आक्रमक भूमिका घेतली. या आंदोलनाची शासनाने दखल घेतल्याने प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाला आता दिशा मिळाली आहे.

आंदोलनस्थळी आमदार चंदुभाऊ यावलकर यांनी भेट देऊन प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा जाणून घेतल्या. त्यांच्या मागण्यांसाठी पुढाकार घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याशी चर्चा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून २८ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.या बैठकीत प्रलंबित सानुग्रह अनुदानाचे वितरण लवकरात लवकर करण्यासाठी निश्चित कार्यवाही करण्याचे ठरले. तसेच प्रकल्पग्रस्तांचे १५ टक्के समांतर आरक्षण आणि इतर प्रलंबित मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीमुळे प्रकल्पग्रस्तांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**अनुदान खात्यात जमा होण्याची प्रतीक्षा!**

आमदार चंदु यावलकर यांनी आंदोलनाची दखल घेऊन मंत्रालयीन बैठकीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. मात्र, केवळ बैठका आणि आश्वासनांवर प्रकल्पग्रस्तांचे समाधान होणार नाही. मंजूर अनुदानाची रक्कम प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली, तरच या संघर्षाला खऱ्या अर्थाने यश मिळेल, अशी संघटनेची ठाम भूमिका आहे. शासनाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत अनुदान वितरित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या बैठकीला आमदार प्रतापदादा अडसड, आमदार प्रवीणजी तायडे, आमदार गजाननजी लवटे, ज्येष्ठ नेत्या सुरेखाताई ठाकरे यांच्यासह मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील संघटनेचे शिष्टमंडळ उपस्थित होते. यामध्ये सचिव गौतमजी खंडारे, जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बोडखे, प्रकाशजी बोबडे, अरविंद फुले, यशवंत वाळीवे यांच्यासह जलसंपदा विभागाचे आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना हक्काचे अनुदान मिळावे, १५ टक्के समांतर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागावा आणि इतर प्रलंबित मागण्यांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी संघटनेचा लढा सुरूच राहणार आहे. जलसमाधी आंदोलनामुळे शासनाचे लक्ष वेधले गेले, तर मंत्रालयातील बैठकीमुळे प्रश्नाच्या सोडवणुकीला दिशा मिळाली. आता शासनाने दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाचे रूपांतर प्रत्यक्ष कृतीत करून प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# संक्षिप्त

## नवोदयचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

**अमरावती-** येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे शैक्षणिक सत्र २०२७ – २८ मधील इयत्ता सहावीच्या प्रवेश परीक्षेचे प्रवेश पत्र दि. २९ ऑक्टोबरपासून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.जवाहर नवोदयसाठी प्रवेश परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी ६१ केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. परीक्षार्थीचे प्रवेशपत्र मेंग्र्रे.म्त्.दन.ग्ह/हने/ या संकेतस्थळावरून नि:शुल्क डाऊनलोड करावे लागणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पारधी समाजाच्या सर्वेक्षणासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**अमरावती-** पारधी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अनुषंगाने समाजाची लोकसंख्या व गरजांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,धारणी यांच्या वतीने पात्र व अनुभवी नामांकित संस्था तसेच समाजकार्य पदव्युत्तर पदवीधारकांकडून (एमएसडब्ल्यू) प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. ५ नोव्हेंबर २०२६ ही अर्ज पाठविण्याची अंतिम तारखी आहे.सन २०२२-२३ अंतर्गत मंजूर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. संबंधित कामाचा अनुभव असलेल्या पात्र नामांकित संस्था व समाजकार्य पदव्युत्तर पदवीधारकांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणेचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी केले आहे.या योजनेच्या अटी व शर्तीसंदर्भातील सविस्तर माहिती कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धारणी येथून प्राप्त करून घ्यावा. ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्जप्रक्रिया सुरू राहणार असून, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा,असे सांगण्यात आले आहे.

## तक्षशिला महाविद्यालय येथे दंत तपासणी शिबीर



**अमरावती-** तक्षशिला महाविद्यालय येथे स्मृतीशेष श्री दादासाहेब गवई यांच्या जयंती महोत्सवानिमित्त आयोजित सामाजिक सेवा उपक्रमामध्ये सामाजिक शास्त्र विभाग ( समाजशास्त्र,अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र) अंतर्गत दंतरूग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराकरता दंत महाविद्यालय अमरावती येथील डॉक्टरांची टीम आली होती. यामध्ये डॉक्टर निशिता सोनी, डॉक्टर आकांक्षा बगे, डॉक्टर मृणाल करंगळे, डॉक्टर आकांक्षा मोरे, डॉक्टर अनुश्री आठवले, डॉक्टर तनया श्रीराव आणि सहाय्यक सुभाष दिघेकर, अशोक अवघड या सर्वांनी उत्कृष्ट सेवा दिलेली आहे, या दंतरुग तपासणी शिबिरामध्ये एकूण १९५ व्यक्तींची तपासणी करण्यात आली, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले मॅडम डॉक्टरांचे स्वागत केले, उपप्राचार्य डॉक्टर प्रितेश पाटील सर त्यांनी सुद्धा सर्व डॉक्टरांचे आभार मानले समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संदीप हाडोळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रितेश पाटील, प्रा. डॉ. प्रवीण वानखडे, राज्यशास्त्र विभाग, या सर्वांनी या दंतरोग तपासणी शिबिरा करिता कसोशीने प्रयत्न केलेत. तसेच महाविद्यालयातील ग्रंथालय प्रमुख डॉ. प्रणाली पेटे मॅडम यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# डॉ. मनीषा खंडारे यांना आचार्य पदवी प्रदान

**अमरावती/का.प्र.**



'भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीतील ग्रामीण जीवनदर्शन : एक अभ्यास 'या संशोधन विषयासाठी मनीषा रामेश्वर खंडारे- मोहोकर यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे पीएच.डी. (आचार्य) पदवी प्रदान करण्यात आली.

या संशोधनासाठी त्यांना स्वर्गीय छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काशिनाथ बऱ्हाटे सर यांचे मार्गदर्शन लाभले. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवन, ग्रामीण समाजव्यवस्था, लोकसंस्कृती, परंपरा, बोलीभाषा आणि ग्रामीण जीवनातील विविध सामाजिक वास्तवांचा अभ्यास या संशोधनातून करण्यात आला.या शैक्षणिक यशाबद्दल डॉ. मनीषा खंडारे यांनी आपल्या आई-वडिलांप्रती, बहीण-भावांप्रती, गुरूजनांप्रती तसेच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर साथ देणाऱ्या जीवनसाथीप्रती कृतज्ञता व्यक्त केलीआहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळे, सहकार्यामुळे आणि आशीर्वादामुळे संशोधनाचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करता आला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# धारणीतील वीजप्रश्न पेटण्याची शक्यता!

## शेतकऱ्यांचा चार दिवसांचा अल्टिमेटम; मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**मेळघाट/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यात शेतीसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तळई, टाकरखेडा, धारणमहू आणि ढाकरमाळ परिसरातील शेतकऱ्यांनी ढाकरमाळ फिडरअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये २४ तास वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ल यांच्याकडे निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले. येत्या चार दिवसांत प्रश्नावर ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, तालुक्यातील काही भागांत २४ तास वीजपुरवठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात असताना ढाकरमाळ फिडरअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये मात्र केवळ १२ तास वीज मिळत असल्याची तक्रार आहे. एकाच तालुक्यातील शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याबाबत वेगवेगळी वागणूक का दिली जात आहे, असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. शेतीसाठी समान सुविधा मिळणे आवश्यक असताना काही गावांतील शेतकऱ्यांना मर्यादित वीजपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने नाराजी वाढत आहे.

सिंचनाच्या नियोजनावर परिणाम होण्याची भीती. शेतीमध्ये पाण्याचे नियोजन आणि वेळेवर सिंचन यांना अत्यंत महत्त्व आहे. विशेषतः रब्बी हंगामात पिकांना गरजेनुसार पाणी देण्यासाठी नियमित वीजपुरवठा आवश्यक असतो. मात्र, वीज उपलब्ध होण्याचा कालावधी मर्यादित असल्यास शेतकऱ्यांना सिंचनाचे नियोजन करताना अडचणी येऊ शकतात. उपलब्ध वेळेत शेतीची सर्व कामे पूर्ण करण्याचा ताण शेतकऱ्यांवर पडत असल्याची परिस्थिती आहे.शेतीचा खर्च, हवामानातील बदल आणि पाण्याची उपलब्धता अशा अनेक आव्हानांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्यातील अनिश्चितता ही आणखी एक समस्या ठरत आहे. पिकांना योग्य वेळी पाणी देता आले नाही, तर त्याचा शेतीच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वीजपुरवठ्याच्या प्रश्नाकडे केवळ तांत्रिक अडचण म्हणून न पाहता शेतीशी संबंधित महत्त्वाचा विषय म्हणून पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

इतर भागांप्रमाणे वीज मिळावी, शेतकऱ्यांची ठाम भूमिका ढाकरमाळ फिडरअंतर्गत येणाऱ्या गावांनाही इतर भागांप्रमाणे २४ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, ही शेतकऱ्यांची प्रमुख मागणी आहे. वीज वितरण व्यवस्थेत भेदभाव असल्याची भावना निर्माण होऊ नये आणि सर्व संबंधित गावांतील शेतकऱ्यांना समान सुविधा मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या मागणीसाठी प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले असून संबंधित वीज विभागाने तातडीने परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. केवळ तात्पुरती आश्वासने देण्याऐवजी प्रत्यक्ष वीजपुरवठ्यात सुधारणा करून प्रश्न मार्गी लावावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. चार दिवसांची मुदत देत या कालावधीत ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. या मुदतीत २४ तास वीजपुरवठ्याबाबत सकारात्मक कार्यवाही झाली नाही, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# टीईटी फेरपरीक्षेचा मुहूर्त कधी? शिक्षक-उमेदवार संभ्रमात

## शासनाच्या धोरणाबाबत स्पष्टता नसल्याने शिक्षकांमध्ये नाराजी

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) रद्द होऊन चार महिने उलटले असतानाही फेरपरीक्षेच्या आयोजनाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे सेवेत असलेले शिक्षक तसेच शिक्षक होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. परीक्षेचे नवीन वेळापत्रक जाहीर करण्याबाबत शासनाकडून विलंब होत असल्याने परीक्षार्थीची प्रतीक्षा अधिकच वाढली आहे.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या परीक्षेनंतर अध्याप पात्रता परीक्षेचे आयोजन होऊ शकलेले नाही. परीक्षेची एक संधी वाया जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने टीईटी देऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. शिक्षकांच्या नोकरीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, सप्टेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सेवेत असलेल्या शिक्षकांना सेवेत कायम राहण्यासाठी दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण होण्याची अट घातली आहे. पदोन्नतीसाठीही टीईटी उत्तीर्ण होण्याची अट लागू असल्याने या परीक्षेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.सेवेत असलेल्या अनेक शिक्षकांची पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बाकी आहे. अशा शिक्षकांनाही टीईटी उत्तीर्ण होण्याची आवश्यकता असल्याने त्यांच्यासमोर परीक्षेचे आव्हान उभे आहे. दुसरीकडे, शिक्षक भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांनाही परीक्षेच्या पुढील तारखेची प्रतीक्षा आहे. त्यामुळे फेरपरीक्षेबाबत अनिश्चितता कायम राहिल्यास शिक्षक भरती आणि पदोन्नतीच्या प्रक्रियेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

टीईटी परीक्षेच्या आयोजनाबाबत शासनाने तातडीने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी शिक्षकवर्गातून होत आहे. परीक्षेची संभाव्य तारीख, पुढील वेळापत्रक आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता मिळाल्यास शिक्षक व उमेदवारांना नियोजन करणे शक्य होईल. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन फेरपरीक्षेबाबत लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मोझरी बस स्थानकातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## महिला प्रवाशांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे



**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पावन कर्मभूमीमुळे विशेष धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या गुरुकुंज मोझरी येथील बस स्थानक हे हजारो प्रवाशांच्या दैनंदिन दळणवळणाचे प्रमुख केंद्र आहे. दररोज विविध गावांमधून येणारे भाविक, ज्येष्ठ नागरिक, कष्टकरी, नोकरदार आणि शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची येथे मोठी वर्दळ असते. मात्र, अशा गजबजलेल्या आणि संवेदनशील सार्वजनिक ठिकाणी सुरक्षेची पुरेशी व्यवस्था नसल्याने सामाजिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

याची गांभीर्याने दखल घेत, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी एसटी प्रशासनाकडे मोझरी बस स्थानक परिसरात तात्काळ आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची आग्रही मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मोझरी बस स्थानक व्यवस्थापकांच्या मार्फत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागाच्या विभाग नियंत्रकांना अधिकृत निवेदन सादर केले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण आणि प्रवाशांची सुरक्षितता ही समाजातील प्रत्येक घटकाशी जोडलेली बाब आहे. निवेदनात प्रशांत कांबळे यांनी स्पष्ट केले आहे की, बस स्थानक परिसरात योग्य देखरेख आणि सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे चोऱ्या, अनुचित प्रकार, टवाळखोरी आणि अनावश्यक वादविवाद घडण्याची भीती सतत कायम असते. अशा घटनांमुळे विशेषतः प्रवास करणाऱ्या महिला, तरुणी आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.

प्रवाशांची सतत ये-जा आणि रांगा असणाऱ्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने नजर ठेवणे आवश्यक आहे, लांब पल्ल्याच्या किंवा स्थानिक गाड्यांची वाट पाहणाऱ्या महिला, रुग्ण व ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, दुकाने, हॉटेल्स आणि बस उभ्या राहण्याच्या मोकळ्या जागेत अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही असणे अत्यंत गरजेचे आहे. यावेळी मनोज दिगांबरे, राजेंद्र तायवाडे, तुळशीदास खोंडे, सुभाष काळे, शिशुपाल तूरकाने, मंगेश हगवणे, मोहित खारकर, बाळू भडके, किशोर खवले, ज्ञानेश्वर भिवगडे यांच्यासह विद्यार्थी नागरिकांची उपस्थिती होती.

# राष्ट्र विकासासाठी सामुदायिक प्रार्थनेची गरज- डॉ.पिंजरकर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ५८ वा पुण्यतिथी महोत्सव

**गुरुकुंज मोझरी/वार्ताहर**



मानवाचा विकास साधणारी ही प्रार्थना प्रणाली व्यक्तीविकासातून समुदाय विकास, समुदाय विकासातून राष्ट्रीय विकास आणि राष्ट्रविकासातून विश्वशांतीकडे नेणारी आहे असे प्रतिपादन राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवामध्ये सामुदायिक प्रार्थनेवर चिंतन व्यक्त करतांना योगिता पिंजरकर यांनी प्रतिपादन केले.

त्या पुढे म्हणाले की, राष्ट्रसंतांना मानवी जीवनातील उच्चतम पातळी अपेक्षित होती. त्यांच्यामते सामुदायिक प्रार्थनेमध्ये येणारा उपासक हा अन्यायाचा प्रतिकार करणारा असावा. त्याच्यामध्ये विरता, शौर्य व धैर्य याबाबी बिंबवल्या जाव्या. त्याला अन्यायाची चिड असावी. त्याच्यामध्ये सहकार्याची भावना निर्माण व्हावी आणि सुबुद्ध विचारांनी प्रबुद्ध व्हावा आणि या सगळ्यामूळे त्याचा प्रवास विश्वमयतेकडून ईशमयतेकडे व्हावा आणि त्याने स्वतःचा आत्मविकास स्वतःच घडवून आणावा. आत्मविकास घडविण्यासाठी कोणालाही रानावनात जाण्याची गरज नाही. जपज्याप व उपास-तापास, नवसाया करण्याची गरज नाही. कारण राष्ट्रसंतांनी खात्रि दिली. 'छोडे नही घरबार। पर मस्त रहे गुरुचरणार में।' कारण यापूर्वीच्या आध्यात्मिक ग्रंथांनी सांगितले की, सन्यस्थ जीवन जगा तरच तुमचा आत्म उद्धार होईल व तुम्हाला मोक्ष प्राप्ती होईल. या भूमीवरच स्वर्ग स्थापन करायचा आहे. या उद्देशाने त्यांनी सामुदायिक प्रार्थना जन्माला घातली. सर्वसंत महात्म्यांचा विचारांचा गौरव व्हावा खऱ्या ईश्वर तत्वाचे ज्ञान सर्व समाजाला व्हावे अशी त्या मागची त्यांची भूमिका होती. काही वर्षापूर्वी ईश्वराला एका देवळामध्ये बंदीस्त केल्या गेले. सोहळ्याओवळ्यामध्ये पूजाविधी होऊ लागला. अस्पृश्याची सावली देखील वर्ज मानली जाऊ लागली. संत चोखामेळा यांनी याबाबत आपली खंत व्यक्त केली. ते सांगतात की, चोखा-डोंगा परीभाव नव्हे डोंगा पण राष्ट्रसंतांनी बंदीस्त असलेल्या ईश्वराला खुल्या मैदानात आणलं. सर्वभेद भिंतीविरहीत एक जनमंदिर सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून जे आज आपल्याला सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त ठरते आहे. भारता सारख्या धर्मनिरपेक्ष देशासाठी त्यांची ही सामुदायिक प्रार्थना म्हणजे त्यांच्याठायी असलेली राष्ट्रनिष्ठा होती याचा प्रत्यय येतो.

# डफळे हॉस्पिटल अमरावती तर्फे शिबिराचे आयोजन

**कुऱ्हा -** डफळे हॉस्पिटल, अमरावती यांच्या वतीने कुऱ्हा व परिसरातील नागरिकांसाठी रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी मोफत पोट, लिव्हर व पचनविकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत कुऱ्हा येथील पोलीस स्टेशनच्या बाजूला असलेल्या सांस्कृतिक भवन येथे होणार आहे.या शिबिरात पोट, लिव्हर व पचनविकार तज्ज्ञ डॉ. अमित डफळे (गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट) नागरिकांना तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. प्रगत पचनविकार निदान व उपचार सुविधांमध्ये एंडोस्कोपी, कोलोनोस्कोपी, यांचा समावेश आहे. ॲसिडिटी,छातीत जळजळ,पोटदुखी,गॅस,पोट फुगणे,अपचन, बद्धकोष्ठता, वारंवार जुलाब, फॅटी लिव्हर, लिव्हरचे विकार, कावीळ, भूक न लागणे, वारंवार उलट्या होणे, मळमळ, गिळताना त्रास होणे तसेच आतड्यांचे व पचनसंस्थेचे विकार असलेल्या नागरिकांना या शिबिराचा लाभ घेता येणार आहे.शिबिरानिमित्त लिव्हर फंक्शन टेस्ट पूर्णपणे मोफत करण्यात येणार असून, या तपासणीची मूळ किंमत ६०० रुपये आहे.

# झाडे तोडून विकासाचा उत्सव?

## महाराष्ट्राच्या भवितव्याची किंमत कोण मोजणार?

महाराष्ट्रात विकासाच्या नावाखाली मोठमोठे प्रकल्प आणले जातात, हजारो कोटींच्या गुंतवणुकीचे आकडे सांगितले जातात, रोजगाराची स्वप्ने दाखवली जातात. सरकार जाहिराती करते, नेते भाषणे देतात आणि कंपन्या आपल्या योजनांचे समर्थन करतात. पण या सगळ्या गदारोळात एक साधा प्रश्न विचारण्याचे धाडस कोण करणार? विकास कोणाचा होतोय आणि त्याची किंमत कोण मोजतंय? कर्जतच्या वृक्षतोडीच्या मुद्द्यावर राज ठाकरे यांनी उपस्थित केलेला प्रश्न केवळ झाडांचा नाही, तर सरकारच्या विकासाच्या दृष्टिकोनाचा, प्रशासनाच्या संवेदनशीलतेचा आणि निसर्गाबद्दलच्या आपल्या सामूहिक जबाबदारीचा आहे.

झाडे तोडण्याचा निर्णय घेताना कागदावर परवानग्या असतील, अहवाल असतील, नियमांची पूर्तता झाल्याचे दावे असतील. पण निसर्गाची हानी केवळ कागदावरील सहीने भरून निघत नाही. एका बाजूला पर्यावरण वाचवा, झाडे लावा, प्रदूषण कमी करा असे संदेश दिले जातात; दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रकल्पांसाठी जंगलावर कुऱ्हाड चालवण्याची वेळ येते. मग पर्यावरण संरक्षण हे सरकारचे धोरण आहे की केवळ पर्यावरण दिनापुरते भाषण? झाड लावण्याचा फोटो काढायला पाच मिनिटे पुरतात; पण त्या झाडाला मोठे व्हायला वर्षे लागतात. हे गणित सत्ताधाऱ्यांना समजत नाही, की समजूनही दुर्लक्षित केले जाते?

सरकार म्हणेल, नियम पाळले आहेत. कंपनी म्हणेल, आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत. अधिकारी म्हणतील, प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पण जनतेचा प्रश्न वेगळा आहे.प्रक्रिया पूर्ण झाली म्हणजे पर्यावरणीय नुकसान स्वीकारार्ह ठरते का? कायद्याचे पालन होणे आवश्यकच आहे. मात्र कायद्याच्या किमान अटी पूर्ण करणे आणि जनहिताचा सर्वोत्तम निर्णय घेणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एखाद्या प्रकल्पामुळे अपरिवर्तनीय पर्यावरणीय नुकसान होण्याची शक्यता असेल, तर पर्यायी जागा, पर्यायी आराखडा आणि नुकसान कमी करण्याचे मार्ग



तपासणे हीच जबाबदार प्रशासनाची कसोटी आहे. परवानगी दाखवणे सोपे आहे; पण पुढच्या पिढीला या निर्णयाचे समर्थन कसे करणार, याचे उत्तर देणे कठीण आहे.

वीज हवी, उद्योग हवेत, रोजगार हवा हे सगळे मान्य. पण विकासाच्या प्रत्येक प्रस्तावापुढे पर्यावरणानेच माघार घ्यायची का? निसर्ग आपल्याला पाणी देतो, हवा देतो आणि जैवविविधतेचे संरक्षण करतो. त्याची आर्थिक किंमत ठरवणेही कठीण आहे. एखाद्या झाडाची भरपाई म्हणून दुसरीकडे रोप लावले, एवढ्याने संपूर्ण जंगलाची परिसंस्था पुन्हा उभी राहत नाही. मग प्रकल्पाच्या फायद्यांची गणना करताना कंपनीचा खर्च मोजला जातो; परंतु पर्यावरणीय नुकसान, स्थानिक समुदायांवरील परिणाम आणि भविष्यातील पिढ्यांची किंमत कोण मोजणार? नफा आज मोजला जातो; निसर्गाच्या विनाशाचे बिल मात्र उद्याच्या पिढीच्या हातात दिले जाते!

ज्या गावाजवळ प्रकल्प उभा राहणार, ज्या परिसरातील जंगल बदलणार आणि ज्या लोकांच्या जीवनावर परिणाम होणार, त्यांचाच आवाज सर्वांत महत्त्वाचा असायला हवा. गावकऱ्यांना फक्त माहिती देणे पुरेसे नाही. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे, त्यांचे म्हणणे ऐकणे आणि कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सल्लामसलत प्रक्रियेत त्यांचा प्रभावी सहभाग सुनिश्चित करणे गरजेचे आहे. लोकशाहीत जनतेला मतदानाचा अधिकार असतोच; पण आपल्या गावाच्या भवितव्याबाबत प्रश्न विचारण्याचाही अधिकार असतो. जनतेच्या जमिनीवर निर्णय घ्यायचे, जनतेच्या निसर्गावर परिणाम करायचा आणि जनतेने फक्त टाळ्या वाजवायच्या ही लोकशाही नाही!

राज ठाकरे यांनी कर्जतच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले, ही बाब चर्चेला दिशा देणारी ठरू शकते. पण प्रश्न उपस्थित करणे ही सुरुवात आहे; उत्तरे मिळवणे आणि निर्णयात आवश्यक बदल घडवून आणणे ही खरी कसोटी आहे. आज विरोधी पक्ष प्रश्न विचारतो, उद्या सत्ताधारी त्याचे उत्तर देतात आणि राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरू राहतात. पण जंगल मात्र राजकीय पक्षांच्या पुढच्या पत्रकार परिषदेची वाट पाहत नाही. या प्रश्नावर सर्व पक्षांनी राजकीय सोयीपेक्षा पर्यावरणीय तथ्यांना प्राधान्य द्यायला हवे. प्रकल्पाच्या मंजुरीची कागदपत्रे, पर्यावरणीय परिणामांचे मूल्यमापन, वृक्षतोडीचे नेमके प्रमाण आणि पर्यायी उपाय यांची सार्वजनिक तपासणी व्हायला हवी. राज ठाकरे यांच्या भूमिकेचीही खरी परीक्षा याच ठिकाणी होईल या प्रश्नाचा पाठपुरावा किती सातत्याने केला जातो आणि त्यातून प्रत्यक्षात काय साध्य होते?

महाराष्ट्राला वीज हवी, गुंतवणूक हवी आणि रोजगार हवा. पण हे साध्य करण्यासाठी प्रत्येक पर्यावरणीय प्रश्नाला दुय्यम मानणे चुकीचे आहे. विकासाचा आराखडा तयार करताना निसर्गाचे संरक्षण हा शेवटचा विचार नसून पहिली अट असायला हवी. पर्यावरणीय नुकसान टाळण्याचे पर्याय शोधले पाहिजेत. अपरिहार्य नुकसान असेल, तर त्याचे वैज्ञानिक मूल्यमापन आणि कायदेशीर अटींची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. सरकारने स्पष्ट उत्तरे द्यावीत, कंपनीने तथ्ये सार्वजनिक करावीत, प्रशासनाने स्वतंत्र आणि पारदर्शक तपासणी सुनिश्चित करावी आणि स्थानिक नागरिकांना केवळ आश्वासनांऐवजी ठोस कृती दिसली पाहिजे.

उद्या या जंगलातील पक्षी दुसरीकडे गेले, झाडांच्या जागी काँक्रीट उभे राहिले आणि निसर्गाचा समतोल बिघडला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? उद्या एखाद्या गावाला पाण्याची समस्या भेडसावली, पर्यावरणीय परिणाम जाणवले किंवा स्थानिक जीवनमान बदलले, तर आज दिलेली आश्वासने कोण पूर्ण करणार? या प्रश्नांची उत्तरे आजच मिळाली पाहिजेत. कारण निसर्गाचा ऱ्हास झाल्यानंतर चौकशी समित्या नेमणे सोपे असते; पण नष्ट झालेली परिसंस्था पुन्हा उभी करणे अत्यंत कठीण असते.

सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवावे जनतेला विकासाचे फलक नकोत, विकासाचे फायदे हवेत. कंपन्यांना गुंतवणुकीचा नफा हवा असेल, तर समाजाला सुरक्षित भविष्याचा अधिकार आहे. आणि निसर्ग हा कोणत्याही सरकारची खासगी मालमत्ता नाही की सत्तेच्या सोयीने त्याचा हिशेब लावावा!कारण झाडे तोडून विकास दाखवता येईल; पण निसर्ग गमावून प्रगती सिद्ध करता येणार नाही. आजचा प्रश्न केवळ कर्जतमधील झाडांचा नाही, तर उद्याच्या महाराष्ट्राचा आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी देण्यापूर्वी प्रत्येक सत्ताधाऱ्याने स्वतःला एकच प्रश्न विचारावा.आपण पुढच्या पिढीसाठी समृद्ध महाराष्ट्र उभारत आहोत, की त्यांच्या वाट्याला उध्वस्त निसर्गाचा वारसा देत आहोत?

**ॲड.धनजंय देशमुख**
**मो.९२८४३८२१०२**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज:समाज प्रबोधनाचा दीपस्तंभ

महाराष्ट्रातील संत व समाजसुधारकांच्या मालिकेत ज्या मोजक्या विभूतींनी अध्यात्माला लोकजीवनाशी जोडून अमुलाग्र परिवर्तनाचा वसा घेतला, त्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्थान अत्यंत अनन्यसाधारण आहे.समाज प्रबोधन करून मानवतावादी विचारांना आधुनिक काळामध्ये समाजात रुजविण्याचे महान कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी अन स्वातंत्र्यानंतर देशोन्नतीसाठी स्वतःला आजन्म वाहून घेतलेले ते एक महान लोकसंत होते. त्यांनी आपल्या खंजीरी भजनाने व प्रबोधनाने लोकोध्दाराचे, लोकशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य करून एक दीपस्तंभ बनून संपूर्ण मानवजातीला मानवतेचा व उन्नतीचा मार्ग दाखविला. त्यांच्या जन्मापासून ते राष्ट्रसंत पदापर्यंतचा प्रवास हा खडतर संघर्षातून एका महामानवात रूपांतरित होण्याचा प्रेरणादायी प्रवास आहे. आज त्यांची पुण्यतिथी.

समाजात विभिन्न जाती, धर्म, पंथ यांच्यामुळे निर्माण झालेले भेदभाव नष्ट होऊन एकच मानवता धर्म रुजावा यासाठी राष्ट्रसंतांनी आपल्या प्रबोधनातून समाजाला मानवतेचा व विश्वधर्माचा उपदेश दिला. वेगवेगळ्या धर्म, जाती बंधनात विखुरलेल्या मानव समाजाला मानवधर्माच्या एका छताखाली आणण्याचे काम राष्ट्रसंतांनी केले. खंजिरी भजन व ग्रामगीतेतून त्यांनी मानवता हाच खरा धर्म आहे व त्यानुसारच मानवाने वागले पाहिजे असा उपदेश दिला. ग्रामगीतेतून विविध धर्मभिन्नता व जातीभिन्नतेमुळे मानवा-मानवात निर्माण झालेले भेदभाव व विषमता मानवाच्या व समाजाच्या प्रगतीला घातक असून राष्ट्राचा नाश करणारे आहे असा उपदेश त्यांनी दिला. प्रत्येक धर्म आणि जात वेगवेगळी असली तरी सर्वांचा परमेश्वर एकच आहे आणि खरा धर्म हा मानवताधर्मच आहे असे ते म्हणतात,

**सर्व विश्वाचा एकचि देव,**
**त्याची मुले सर्वचि जीव**
**जरी वेगवेगळे दिले नाव,**
**तरी भाव हाचि त्यांचा**

जगात असलेल्या विविध धर्माच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी धर्मप्रवर्तकांनी विश्वाची उत्तमव्यवस्था होण्यासाठी या धर्मांची निर्मिती केली आहे. परंतु मानवाने धर्माच्या नावावर श्रेष्ठ - कनिष्ठता ठरवून आपसात भेदभाव निर्माण केले आहे. हे सकल मानवजातीसाठी हानिकारक आहे. याविषयी राष्ट्रसंत सांगतात,

**जगी दिसती विभिन्न धर्म,**
**परि सर्वांचे एकचि वर्म**
**विश्वधारणेचा मार्ग उत्तम,**
**सदधर्म तोचि**

राष्ट्रसंतांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजप्रबोधनाचे जे अथांग योगदान दिले, त्याचे विश्लेषण करताना त्यांच्या विचारांची व्याप्ती अचंबित करणारी ठरते. त्यांनी आपल्या कार्यातून प्रामुख्याने तीन गोष्टींवर सर्वाधिक भर दिला: ग्रामविकास, अंधश्रद्धा निर्मूलन आणि राष्ट्रीय एकात्मता. त्यांनी 'ग्रामगीता' या महान ग्रंथाच्या माध्यमातून खेड्यांचा विकास हाच देशाचा



विकास आहे, हा मूलमंत्र दिला. देव दगडात नसून तो राबणाऱ्या शेतात आणि कष्टाळू माणसाच्या घामात आहे, हा विचार त्यांनी जनमानसात रुजवला. केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत, तर सर्वधर्म समभाव आणि समाजसुधारणा प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी 'श्री गुरुदेव सेवा मंडळाची' स्थापना केली. या माध्यमातून भजनी मंडळे आणि तरुण संघटनांच्या साहाय्याने त्यांनी गावोगावी संस्कारांची रुजवणूक केली. स्वातंत्र्यलढ्यापासून ते भूदान चळवळीपर्यंत प्रत्येक राष्ट्रीय कार्यात ते अग्रेसर राहिले आणि भारताचा संदेश सातासमुद्रापार जपानमधील जागतिक धर्म परिषदेपर्यंत पोहोचवला.

आज समाजात आपल्याला विविध मनाला हेलावून टाकणाऱ्या घटना पाहून मानवपण हरवलेले दिसते. एकमेकांच्या सहकार्यासाठी निर्माण झालेल्या धर्माची व्याख्या विसरून लोक मानवपण विसरलेले दिसते. म्हणून लोकांनी मानवता धर्माकरीता पुढाकार घेणे आवश्यक आहे. मानवतेसाठी प्रत्येकाने धावून जाणे गरजेचे आहे आणि ते मानवता धर्माचे तत्व प्रत्येकाने पाळावे असा संदेश त्यांनी दिला आहे.

**धर्माची आखणी मानवता,**
**मानवतेसाठी करावी**
**व्यवस्था**
**कुठेही होता अव्यवस्था,**
**धावोनि जावे**
**गावोगावी धर्मसमभाव, मग**
**आपैसेचि सुखावे विश्व**
**पृथ्वीशी लाभेल स्वर्ग-**
**गौरव, तुकड्या म्हणे**

गावोगावी धर्म समभाव रुजला तर निश्चितच पृथ्वीला स्वर्गाचा गौरव प्राप्त होईल आणि प्रत्येक मानव मानवासाठी धावून जाईल. यातून मानवताधर्माची रुजवणूक होईल हा संदेश राष्ट्रसंतांनी समग्र मानवजातीला दिलेला आहे. या संदेशानुसार आपण प्रत्येकाने वागून मानवतेसाठी झटावे तरच आपण पृथ्वीवर सर्व निर्माण करू शकू. त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा वसा पुढे चालवणे म्हणजेच खऱ्या अर्थाने राष्ट्राची सेवा करणे होय. ते विचार व कार्य समाजमनात पुन्हा प्रेरित करण्याची आज गरज आहे. त्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाने सहभाग घेऊन योगदान दिले पाहिजे. मानवतेसाठी सर्वस्व अर्पण करून समाज प्रबोधनाचा दीपस्तंभ ठरलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना विनम्र अभिवादन !

**डॉ. निलेशकुमार इंगोले**
शिरजगाव कसबा,
जि.अमरावती
९३७११४५१९५

# अभिजात मतदारांची अभिजित पसंती

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ७८ जागांपैकी एक जागा असलेल्या नागपूर पदवीधर निवडणूकीचा निकाल लागला असून कॉंग्रेसच्या अभिजित वंजारी यांनी भाजपच्या सुधाकर कोहळे यांचा पराभव केला आहे. अत्यंत चुरशीच्या या लढतीत अखेर दुसऱ्या फेरीतील मतांनी कमाल करत अभिजित वंजारींना विजयाचा कौल दिला आहे. केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्रचा जलवा असतानाही वंजारी यांनी २०२० पाठोपाठ २०२६ ला भाजपाच्या बालेकिल्ल्यात मुसंडी मारली आहे. आत्मविश्वास आणि अती आत्मविश्वास यांत पुसटशी रेषा असते आणि याच अती आत्मविश्वासाने या निवडणुकीत भाजपचा बट्याबोळ झाला आहे.

झाले काय तर निवडणूक म्हटले की जय पराजय होणारच. मात्र याकरिता जरूरी रणनिती आखणे, व्यूहरचना करणे आणि त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे असते. केंद्र आणि राज्यातले चलनी नाणे प्रत्येक गल्लाबोळात चालेलच याची शाश्वती नसते. नेमके इथेच भाजपचे गणित चुकले. याबाबतीत कॉंग्रेसचे 'पक्ष दक्ष, विजयाकडे लक्ष' होते. त्यांचा उमेदवार पण ठरला होता, प्रचाराला प्रारंभ ही झाला होता. तर दुसरीकडे भाजपने २०२० सारखा उमेदवारीचा घोळ केला. भाजपच्या दोन उमेदवारांनी घोळ ची भाजी केल्याने शेवटी भाजपचा या निवडणुकीत खेला झाला.

मतमोजणी सुरू झाली तशी भाजप कॉंग्रेसची धडधड



वाढली होती. दोन्ही उमेदवार सापशिडीच्या खेळाप्रमाणे वरखाली होत राहिले. पहिल्या फेरीत सुधाकर कोहळे यांनी बाजी मारली होती परंतु मतांचा जरूरी कोटा ते पूर्ण करू शकले नव्हते. त्यामुळे दुसऱ्या पसंतीच्या मतांची मागणी वाढली होती आणि इथे एंट्री झाली, बे पोट्टेहो म्हणत माहौल तयार करणाऱ्या कराळे गुरूजींची! तसेही कराळे गुरूजींनी अनपेक्षितपणे जवळपास पंचवीस हजार मतांची मजल गाठल्याने त्यांची दुसऱ्या क्रमांकाची मते भाजप कॉंग्रेस साठी जीवन मरणाचा प्रश्न बनली होती.

भलेही कराळे गुरुजींनी बंडखोरी केली होती पण त्यांची विचारसरणी आणि रोख कॉंग्रेस पुरक होता. वंजारींच्या दृष्टीने कराळे गुरुजी म्हणजे 'तुम्ही ने दर्द दिया, तुम्ही दवां देना' सारखे होते आणि झाले ही तसेच. कराळे गुरुजींनी या निवडणुकीत कॉंग्रेस साठी खलनायक ते नायक असा प्रवास केला. पहिल्या फेरीत अव्वल असणारे सुधाकर कोहळे दुसऱ्या क्रमांकाच्या पसंती मतांनी रिंगणातून बाहेर फेकले गेले. कराळे फॅक्टर भाजपसाठी बॅकफायर करेल असे कोणालाही स्वप्नात देखील वाटले नव्हते. भाजपसाठी हा जोर का झटका धीरे से होता.एक जागा हरल्याने त्यांच्यावर आभाळ कोसळणार नाही पण बुंद से गयी वो हौद से नही आती हे सुद्धा त्यांना लक्षात ठेवावे लागेल. आपल्या तंबूचे कळस वारंवार का कापले जात आहे याचा विचार त्यांनी नक्कीच करावा. उमेदवारीच्या घोळात पराभवाची बीजे रोवली गेली होती हे विसरून चालणार नाही. विजयाला अनेक बाप असतात तर पराभव हा अनाथ असतो. निवडणूक जिंकण्याचा कोणताही हमखास फॉर्म्युला नाही, मतदारांना बस समझ लिए असे करून चालणार नसते.

राहिली बाब कॉंग्रेसची तर त्यांनी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि बिहारमध्ये या निवडणुकीत बहुतेक एकच जागा जिंकली आहे आणि एका पिसाने मोर होता येत नाही. एरवी ईव्हीएम ला दोष देत असतांनाच बॅलेट पेपरवर पण कॉंग्रेसने होलसेल भावात या निवडणुकीत अंडे दिले आहेत. त्यामुळे त्यांनी 'एक ही मारा सॉलीड मारा' या मानसिकतेतून बाहेर येणे गरजेचे आहे. नागपूर चा गड का आणि कसा सर केला हा त्यांच्यासाठी आदर्श पाठ आहे. अब की बार चार सौ पार चा नारा देणाऱ्या भाजपला त्यांनी लोकसभेत २४० जागा गाठतांना फेस आणला होता. त्यामुळे 'अब की बारी, ॲड. अभिजित वंजारी' हे कॉंग्रेस साठी प्राणवायुचे काम करेल यात शंका नाही.

थोडक्यात काय तर ही निवडणूक जरी पदवीधरांची असली तरी जवळपास सात आठ हजार मते रद्द ठरली ही एक शोकांतिका आहे. मतदारांना पुरेसे ज्ञान नसल्याने किंवा राजकीय पक्षांनी ही बाब गांभीर्याने न घेणे जय पराजयाचे कारण ठरू शकते. तसेच मतांचे हस्तांतरण आणि दुसऱ्या क्रमांकाच्या मतांचे नियोजन किती महत्त्वाचे आहे हे या निवडणुकीत दिसून आले आहे. तर मतदानाचा टक्का सुशिक्षित मतदारांमध्ये पण साठ सत्तरीच्या आतच होता. महाराष्ट्रात या निवडणुकीत महाविकास आघाडीला ३/२ अशी बढत मिळाली असली तरी प्रमुख दोन्ही राजकीय पक्षांची कहीं खुशी कहीं गम अशी परिस्थिती आहे.

**डॉ अनिल पावशेकर**
**मो. ९८२२९३९२८७**

## ऐसा निराळा संत



ऐसा व्हावा भारतदेशी
एक निराळा तो संत
खंजिरीच्या नादावरती
घडविला त्यांनी विदर्भप्रांत

अखंड कीर्तन, भजनातही
जपला राष्ट्रभक्तीचा मंत्र
स्वातंत्र्यलढ्यात पुढाकार
घेऊन ठरले ते देशभक्त

ग्राम, देश, राष्ट्र उन्नतीस
त्यांनी केले शब्दची शस्त्र
म्हणूनच खऱ्या अर्थानि
उपाधी सार्थ त्यांना राष्ट्रसंत

**राजश्री शेषरावजी खाजोने**
चांदूरबाजार, जि.अमरावती
मोब. ९६६५६८०६३९

# मुलांनी वाचायलाच हवे, असे काही

**'श्यामची आई' या पुस्तकापलीकडील लेखक साने गुरुजी पुढील पिढीला माहीत व्हावेत यासाठी मी आज यातील काही पुस्तकांचा परिचय करून देणार आहे. त्यांची भाषा अतिशय साधी, ओघवती आणि हृदयाला भिडणारी आहे.**

साने गुरुजी आणि त्यांनी लिहिलेली श्यामची आई ही आत्मचरित्रपर कादंबरी सर्वांनाच माहिती असते. पाठ्यपुस्तकात किंवा शाळेत असताना आपण ह्यातला काही भाग वाचलेला असतो किंवा निदान श्यामची आई हा सिनेमा तरी बघितला असतो. श्यामची आई हे पुस्तक 'वाचायलाच हवे' अशा मराठीतील पुस्तकांच्या यादीत मोडते. पण साने गुरुजींनी श्यामची आई व्यतिरिक्त कथा, कादंबऱ्या, लहान मुलांच्या गोष्टी, ललित निबंध, गाणी, कविता असे विपुल लेखन केले आहे. मिरी, रामाचा शेला, नवजीवन, स्वर्गीय ठेवा, तीन मुले ही त्यांनी किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेली पुस्तके बहुधा प्रत्येक सार्वजनिक वाचनालयात असतात. आजच्या मुलांना देखील ती वाचायला द्यायला हवीत.

**मिरी**

साने गुरुजीच्या पुस्तकांमध्ये विशेष दुष्ट लोक नसतात. यातील दुष्ट पात्रे देखील चांगल्या माणसांच्या संगतीत येऊन अनेकदा बदलतात. माणसं वाईट नसतात तर वाईट परिस्थितीमुळे माणसे चुका करतात. माणसांना जर चुका सुधारण्याची संधी आणि चांगली संगत मिळाली तर ती चांगली होतात, असे त्यांच्या अनेक कथा कादंबऱ्यांतून मांडले आहे. मिरी या कादंबरीत मिरी नावाच्या एका अनाथ मुलीची कथा सांगितली आहे. कोणाचाच आधार असल्याने मिरी अतिशय लहान वयात एका खानावळीत काम करत असते. काही चूक झाली म्हणून तेथील मालकीण मिरीला हाकलून देते. रस्त्यावरून हिंडत असताना एक रस्त्यावर दिवाबत्ती करणारा माणूस मिरीला भेटतो. तो मिरीला मुलीसमान मानतो आणि



मनापासून सांभाळतो. पुढे मिरीला सुमित्राताई भेटतात. त्या तिची काळजी घेतात. तिला शिक्षण देतात. मिरी मोठी होते. तिचे एका मुलावर प्रेम बसते. त्यांच्या प्रेमामध्ये अनेक अडचणी येतात. या कादंबरीतून हळूहळू मिरीच्या प्रेमाचे भविष्य आणि सुमित्राताईंच्या प्रेमाचा भूतकाळ उलगडत जातो.

**रामाचा शेला**

या कादंबरीत सरला नावाची नायिका आहे. आईचा मृत्यू, भावा-बहिणींचा मृत्यू यामुळे सरलेचे वडील तिला विषवल्ली ठरवतात. लहानपणापासून प्रेम न मिळालेल्या सरलेला उदय भेटतो. ते दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. काही कारणाने त्यांची ताटातूट होते. सरलेवर कुमारी माता होण्याचा प्रसंग येतो. उदयचा शोध घेताना काही माणसे तिला फसवून शरीर विक्रयाचा धंदा करण्यास भाग पाडू पाहतात. अशा कठीण प्रसंगी सुद्धा तिची रामावरची भक्ती, संयम आणि निर्भयता ढळत नाही. घडलेल्या दुर्घटनांसाठी दाम्भिकतेने वागत असतो, हे या कादंबरीतून साने निष्पाप स्त्रियांना जबाबदार धरून समाज किती गुरुजी अधोरेखित करतात.

**तीन मुले**

ही कादंबरी एका इंग्रजी पुस्तकावर आधारलेली आहे.मुंगा,बुधा व माधुरी यांचा मैत्री, त्यांच्यातील प्रेमाचा त्रिकोण, त्यांच्यावर आलेली अगणित संकटे व त्यांनी त्यातून काढलेले मार्ग याची गोष्ट सदर कादंबरीत वाचायला मिळते. साने गुरुजींच्या लेखनातून सातत्याने प्रेम,करुणा, त्याग, समता, बंधुभाव, ध्येयवाद, सहनशीलता आणि त्याग ही मूल्ये व्यक्त होतात. समाजातील अन्याय, विषमता, अस्पृश्यता, स्त्रियांची दुःखे इत्यादीचे चित्रण त्यांच्या लेखनात आढळते. आयुष्यात कितीही दुःख वाट्याला आले, संकटे आली तरी माणसाने सद्भाव व माणुसकी सोडू नये. योग्य वर्तनच करत राहावे. समाजाच्या जास्तीत जास्त उपयोगी पडावे हे विचार हा त्यांच्या पुस्तकांचा गाभा असतो. साने गुरुजींच्या पुस्तकातली पात्रे अतिशय दुःखी आणि रडकी वाटू शकतात. पण माझ्या मते ती तशी नाहीत. विशेषतः आपल्यावर अन्याय झाला असताना योग्य मार्गावर चालत राहणे खूप कठीण असते, साने गुरुजींच्या पुस्तकातील पात्रे अनेकदा ते करून दाखवतात.

साने गुरुजींची भाषा अतिशय साधी, ओघवती आणि हृदयाला भिडणारी आहे. 'मिरी' च्या प्रस्तावनेत गुरुजी म्हणतात, की गोष्टीत कृत्रिमता येऊ नये यासाठी मी आधी दोन-तीन ठिकाणी तरी मुलांना गोष्ट सांगतो आणि मग जशी सांगतो जवळ जवळ तशीच लिहून काढतो. त्यांच्या गोष्टीतून तत्कालीन मराठी समाजाचे चित्रण दिसून येते. अस्पृश्यता,स्त्रियांवरील अन्याय,गरिबी यांचे दाहक वास्तव समोर येते. त्याचबरोबर समताधिष्ठित आणि प्रेमपूर्ण समाज निर्माण करण्याची त्यांची तळमळही दिसून येते.

(लेखिका अंधश्रध्दा निर्मूलन, पंचायत राज प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.)

**मुक्ता दाभोळकर**

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# हिवरखेडच्या जय भोले किराणा दुकानावर अन्न प्रशासनाचा छापा!

## भेसळीच्या संशयावरून ३,६०० किलो तेल जप्त; ५.५० लाखांचा साठा ताब्यात, परवाना निलंबित

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

खाद्यतेलाच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने अन्न व औषध प्रशासनाने हिवरखेड येथील मे. जय भोले किराणा शॉपवर कारवाईचा बडगा उगारला. तपासणीदरम्यान रिफाइंड सोयाबीन तेलाचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला, तर भेसळीचा संशय असल्याने तब्बल ३ हजार ६०० किलो तेलाचा साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत ५ लाख ५० हजार ८०० रुपये असून, नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दुकानाचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला.



२८ ऑक्टोबर रोजी तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड येथील या दुकानाची तपासणी करण्यात आली. यावेळी खाद्यतेलाच्या नमुन्यासह दुकानातील साठवणूक आणि स्वच्छतेच्या व्यवस्थेचीही पाहणी करण्यात आली. तेलात भेसळ असल्याचा संशय आल्याने उपलब्ध साठा पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी जप्त करण्यात आला. मात्र, तेलात प्रत्यक्ष भेसळ असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नसून, त्याबाबतचा निष्कर्ष प्रयोगशाळेच्या अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.तपासणीदरम्यान दुकानात अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन होत नसल्याचे आढळले. प्रथम आलेला माल प्रथम विक्रीसाठी वापरण्याची (इघ्इध) नोंद, साफसफाईचा अभिलेख, कच्च्या अन्नपदार्थांचा अभिलेख आणि साठा नोंदवही उपलब्ध नव्हती. कच्चे व तयार अन्नपदार्थ पॅलेटवर ठेवण्याऐवजी थेट जमिनीवर ठेवण्यात आले होते. खिडक्यांनाही बारीक जाळी नसल्याचे निदर्शनास आले. अन्नसुरक्षा नियमांतील अनुसूची चारच्या विविध तरतुदींचे उल्लंघन झाल्याने प्रशासनाने दुकानाचा परवाना निलंबित केला. खाद्यतेलासारख्या रोजच्या वापरातील वस्तूंच्या साठवणुकीतच आवश्यक नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे या तपासणीतून समोर आले आहे.आयुक्त तुकाराम मुंढे आणि सचिन केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त (अन्न) देवानंद वीर यांच्या समवेत अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बोरचाटे यांनी ही कारवाई केली.जप्त केलेल्या तेलाच्या नमुन्याचा प्रयोगशाळेतील अहवाल काय येतो, याकडे आता लक्ष लागले आहे. अहवालानंतर भेसळीबाबतचे चित्र स्पष्ट होणार असून, त्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.

# हॉकर्स झोनमध्येच व्यवसाय करा; वाहतूक कोंडी टाळा!

## महापौर खेडकर, सभापती विजय अग्रवाल यांचे पथविक्रेत्यांना आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

सणासुदीच्या काळात शहरातील बाजारपेठा आणि मुख्य रस्त्यांवर खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी पथविक्रेत्यांनी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या हॉकर्स झोनमध्येच व्यवसाय करावा, असे आवाहन महापौर शारदा खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी केले आहे.

सध्या शहरातील काही किरकोळ व्यावसायिक हॉकर्स झोन वगळता अन्य रस्त्यांवर आणि मुख्य बाजारपेठेत व्यवसाय करीत असल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांसह पथविक्रेत्यांचीही गैरसोय होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी विक्रेत्यांनी रस्त्यांवर अतिक्रमण न करता निर्धारित हॉकर्स झोनमध्येच व्यवसाय करावा आणि मनपा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### २०२७ मध्ये पथविक्रेत्यांचे फेरसर्वेक्षण

अकोला महानगरपालिकेने शहरातील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण चार वर्षांपूर्वी केले होते. नियमानुसार दर पाच वर्षांनी सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याने २०२७ मध्ये पथविक्रेत्यांचे नव्याने फेरसर्वेक्षण करण्यात येणार आहे. यापूर्वी सर्वेक्षण झालेल्या ४ हजार ३३ पथविक्रेत्यांना शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र वितरित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### नवीन हॉकर्स झोनमध्ये सुविधांसाठी हालचाली

महानगरपालिकेने निर्माण केलेल्या नवीन हॉकर्स झोनमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे पथविक्रेत्यांना व्यवसायासाठी नियोजित जागा उपलब्ध करून देतानाच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे आव्हान मनपा प्रशासनासमोर आहे.

# लसीकरणापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये!

## उच्च जोखीम क्षेत्रांसह स्थलांतरित व वंचित घटकांवर विशेष लक्ष देण्याचे आयुक्तांचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील लसीकरण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवून शंभर टक्के उद्दिष्टपूर्तीसाठी सूक्ष्म नियोजन, जनजागृती आणि विविध विभागांतील समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. लसीकरणापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी दिले. महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील लसीकरण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी २७ ऑक्टोबर रोजी आयुक्तांच्या दालनात सिटी टास्क फोर्सची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी



आयुक्त डॉ. सुनील लहाने होते. यावेळी गरोदर मातांचे लसीकरण, बालकांचे नियमित लसीकरण आणि राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शहरातील लसीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी उच्च जोखीम असलेली क्षेत्रे, स्थलांतरित नागरिक आणि वंचित घटकांपर्यंत आरोग्य यंत्रणेने प्रभावीपणे पोहोचण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली. पात्र लाभार्थ्यांची निश्चिती करून त्यांच्यापर्यंत लसीकरणाची सुविधा पोहोचविण्यासाठी क्षेत्रस्तरावर नियमित देखरेख ठेवणे, जनजागृती करणे आणि सूक्ष्म नियोजनानुसार काम करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

लसीकरण मोहिमेचे उद्दिष्ट निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आरोग्य विभागासह एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस), शिक्षण विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा महिला रुग्णालय आणि खासगी डॉक्टर संघटनेने परस्पर समन्वयातून काम करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त समेध अलोने, उपायुक्त गणेश शहाणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश सोनोने, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विजय चव्हाण, शहर कार्यक्रम व्यवस्थापक पंकज गायकवाड, शहर लेखा व्यवस्थापक प्रतीक गाडगे, सार्वजनिक आरोग्य परिचारिका सविता गवारगुरू व शिरीन मनवर, लसीकरण क्षेत्र संनियंत्रक राहुल उपरवट, औषध निर्माता फैझाण पटेल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, वैद्यकीय प्रतिनिधी आणि खासगी डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.

**Change In Name**

I have change my name
From
**'ARSHAD AHMAD KHAN'**
(As per Old Passport Name/ Wrong Name)
-TO-
**ARSHAD AHMAD MUJAHID AHMAD KHAN**
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar)
NAAL SAHEB CHOWK BAIDPURA AKOLA"
Passport No. J0201169
FILE NO.
"NGPM00125810"

# खदान पोलिसांची अटक बेकायदेशीर; आरोपीच्या सुटकेचे आदेश

## साडेपाच लाखांच्या फसवणूक प्रकरणात न्यायालयाचा निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

टी-शर्ट व हुडीज पुरविण्याच्या बहाण्याने ५ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याच्या प्रकरणात मुंबईतून अटक करण्यात आलेल्या मनीष सतीश मोरे याची अटक अकोला न्यायालयाने बेकायदेशीर ठरवली. तृतीय न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग नितेश शर्मा यांनी आरोपीच्या तत्काळ सुटकेचे आदेश देत खदान पोलिसांची दोन दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी फेटाळली. तसेच आदेशाची प्रत जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे पाठविण्याचे निर्देश दिले.

### आदेशाची प्रत एसपींकडे पाठविण्याचे निर्देश



अकोला एमआयडीसीतील 'विवेक एंटरप्राईजेस'चे संचालक आनंद मनवानी यांच्या तक्रारीनुसार, टी-शर्ट व हुडीज तयार करून देण्याच्या नावाखाली आरोपींनी ऑनलाइन पद्धतीने ५.५० लाख रुपये स्वीकारले; मात्र माल पुरविला नाही. याप्रकरणी खदान पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.२७ ऑक्टोबर रोजी मनीष मोरे याला मुंबईतून अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान आरोपीचे वकील ॲड. शिवम शर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अटकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले नसल्याचा युक्तिवाद केला. रात्री साडेआठ वाजेपर्यंत चाललेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने अटक बेकायदेशीर ठरवत सुटकेचे आदेश दिले. या निर्णयामुळे खदान पोलिसांच्या अटक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६२७/२०२६ प्रोसेस नं.१२३१५/२०२६
चौ.ता. १६/११/२०२६ दिनांक : २४/०९/२०२६

**अर्जदार :** १. अभिजीतसिंह राजकुमार ठाकूर २. रोहितसिंह राजकुमार ठाकूर ३. शकुंतला भारतसिंह चंदेल सर्व रा. माळीपूरा, लकडगंज, महाराष्ट्र सॉ मील जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भारतसिंह गणेशसिंह चंदेल
**पत्ता :-** रा. माळीपूरा, लकडगंज, महाराष्ट्र सॉ मील जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भारतसिंह गणेशसिंह चंदेल यांचे दि. २०/०१/१९९९ रोजी माळीपूरा, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६९८/२०२६ प्रोसेस नं.१३२३०/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ दिनांक : १६/१०/२०२६

**अर्जदार :** निर्मला वासुदेव घोगरे
रा. टाकळी कुरेशी, पो. खिरपुरी, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुलोचना देविदास मुरूमकार
**पत्ता :-** रा. टाकळी कुरेशी, पो. खिरपुरी, ता. बाळापूर, जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुलोचना देविदास मुरूमकार यांचे दि. ०७/०८/२०१० रोजी राहते घरी मौजे शिवर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०८वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५ )
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

वि. दि. दा. नं. १३७/२०२६ प्रोसेस नं.१३३७२/२०२६
चौ.ता. १७/११/२०२६ दिनांक : १९/१०/२०२६
दावा रु. /-

**श्याम ...विरुध्द... मधुकर**

**बनामः-** २. राहुल मधुकरराव मगर, रा. भगीरथ वाडी, वाशिम बायपास, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला व रा. पोस्ट शिवणी, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR DECLARATION, DAMAGES, CORRECTION OF REVENUE, PERMANENT INJUNCTION AND PERPETUAL INJUNCTION.' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पृष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६४३/२०२६ प्रोसेस नं.१२५५६/२०२६
चौ.ता. २३/११/२०२६ दिनांक : ०१/१०/२०२६

**अर्जदार :** १. राजपाल जनार्धन इंगळे २. संगपाल जनार्धन इंगळे ३. हिम्मत जनार्धन इंगळे सर्व रा. कळंबेश्वर, पो. निंबी मालोकार, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. जनार्धन सदाशिव इंगळे २. भागीरथाबाई जनार्धन इंगळे
**पत्ता :-** रा. कळंबेश्वर, पो. निंबी मालोकार. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जनार्धन सदाशिव इंगळे यांचे दि. ०३/१०/१९९८ रोजी व मयत भागीरथाबाई जनार्धन इंगळे यांचे दि. २९/०६/ २०२३ रोजी कळंबेश्वर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७१५/२०२६ प्रोसेस नं.१३१२३/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ दिनांक : १४/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीपाद मधुकर सराफ रा. आश्रय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९८५०३६७०५८ २. सौ. माधुरी अशोक सोलेगावकर रा. मंगल कलश अपार्टमेंट, कल्याण रोड, ठाकुरली इस्ट, डोंबिवली, ठाणे. मो. क्र. ९८१९८४२१९७ ३. श्रीमती. प्रेमा प्रदीप मते रा. बी विंग, बालाजी बिल्डिंग, बालाजी नगर, ठाकुरली ईस्ट, डोंबिवली, ठाणे. मो. क्र. ९१६७००४५९७ ४. नरेश मधुकर सराफ रा. १०२, मयुरेश अपार्टमेंट, शेलार नाक्याजवळ, डोंबिवली, ठाणे. मो. क्र. ८६८९८९७१११

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मधुकर देविदास सराफ २. दमयंती मधुकर सराफ
**पत्ता :-** रा. आश्रय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर देविदास सराफ यांचे दि. १५/१२/२००७ रोजी कॉटन सिटी हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे तसेच मयत दमयंती मधुकर सराफ यांचे दि. ०९/१०/२००२ रोजी आश्रय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. . आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश - २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

Guardian Wards No. 714 / 2026 प्रोसेस नं.३९२४/२०२६
Fix for: 14/12/2026 दिनांक : २७/१०/२०२६

1) Pooja Vikas Amode, 2) Jayesh Vikas Amode (Minor), 3) Sanvi Vikas Amode (Minor), Appl. No. 2 & 3 Through his natural guardian mother applicant no. 1 All R/o Harihar Peth, Old City, Akola Tq. and Dist. Akola

--Vrs--
Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'AN APPLICATION U/S 29 OF GUARDIAN AND WARDS ACT FOR GRANT PERMISSION TO SALE MINORS PROPERTY' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १४/१२/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १४/१२/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक २७ माहे ऑक्टोंबर सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१२/२०२६ प्रोसेस नं.११९१/२०२६
चौ.ता. १९/११/२०२६ दिनांक : ३०/०९/२०२६

**अर्जदार :** १. कौशल्या काशिनाथ जाधव, वय ६५ वर्ष, धंदा-गृहीणी २. सुरेंद्र काशिनाथ जाधव, वय ४५ वर्ष, धंदा -शेती ३. नरेंद्र काशिनाथ जाधव, वय ३५ वर्ष, धंदा- शेती क्र. १ ते ३ रा. टिटवा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला ४. आशा संदीप बगल, वय ३८ वर्ष, धंदा. गृहीणी रा. हनुमान मंदीर जवळ, हिरा नगर, खामगांव, जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : काशिनाथ केशवराव जाधव
**पत्ता :-** रा. टिटवा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत काशिनाथ केशवराव जाधव यांचा दिनांक २७/०५/२०२५ रोजी केअर हॉस्पीटल, जठारपेठ, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क-स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८१८/२०२६ प्रोसेस नं.१३७६२/२०२६
चौ.ता. ०५/१२/२०२६ दिनांक : २७/१०/२०२६

**अर्जदार :** १. सुनिल संपतराव हुसे रा. शिव मंदिराजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९४२२८८१२४१, २. गजानन संपतराव हुसे रा. ठाकरे 'चक्की जवळ, पेंन्शन पुरा, पोलीस लाइन टाकळी, कात्रोळ रोड, नागपूर, ता. जि. नागपूर. ३. सुनंदा हरिश्चंद्र शेगोकार रा. ज्ञानदीप कॉन्व्हेंट जवळ, अवस्थी लेआउट, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ४. मंगला भास्कर लहाने रा. मलकापूर रोड, दुर्गा नगर, वार्ड नं. २, नांदूरा, ता. नांदूरा, जि. बुलढाणा. ५. सुरेखा सुरेशभाई बेलसरे रा के - ७०, शिव बंगलो, वाघोडिया रोड, खातंबा बस स्टॅण्ड, वडोदरा, जि. वडोदरा गुजरात.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अरूणा संपतराव हुसे
**पत्ता :-** रा. शिव मंदिराजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरूणा संपतराव हुसे यांचे दि. २७/०४/२०२४ रोजी मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०८वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
'कारणे दाखवा नोटीस'

वि. दि. दा. नं. १३७/२०२६ प्रोसेस नं.१३३७३/२०२६
चौ.ता. १७/११/२०२६ दिनांक : १९/१०/२०२६
दावा रु. /-

**श्याम ...विरुध्द... मधुकर**

**बनामः-** २. राहुल मधुकरराव मगर, रा. भगीरथ वाडी, वाशिम बायपास, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला व रा. पोस्ट शिवणी, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी, उपरिनामित अर्जदार यांनी या न्यायालयाकडे 'APPLICATION UNDER ORDER XXXIX RULES 1 & 2 READ WITH SECTION 151 OF THE CODE OF CIVIL PROCEDURE FOR GRANT OF TEMPORARY INJUNCTION.' केला आहे. त्याअर्थी, याव्दारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखवण्याकरीता दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होउन निकाल दिला जाईल. तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही, निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८१७/२०२६ प्रोसेस नं.१३५३२/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ दिनांक : २२/१०/२०२६

**अर्जदार :** १. अंबादास नाजुकराव घावट रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. शिवदास नाजुकराव घावट ३. प्रदिप नाजुकराव घावट रा. घुसरवाडी, ता. जि. अकोला. ४. चंद्रकला बाळकृष्णा चिपडे रा. आखतवाडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. नाजुकराव काशिराम घावट २. मनोरमा नाजुकराव घावट
**पत्ता :-** रा. घुसरवाडी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नाजुकराव काशिराम घावट यांचे दि. १५/०५/२०२३ रोजी व मयत मनोरमा नाजुकराव घावट यांचे दि. ०६/०१/२०२१ रोजी घुसरवाडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नागपूरच्या बालेकिल्ल्यात फडणवीसांना धक्का

## पदवीधर मतदारसंघात अभिजीत वंजारी विजयी



**नागपूर-** नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांनी विजय मिळविला. त्यांना प्रथम व द्वितीय पसंतीक्रमाची एकूण ६७ हजार २३१ मते मिळाली. तर त्यांचे नजिकचे प्रतिस्पर्धी भारतीय जनता पार्टीचे सुधाकर कोहळे यांना ६३ हजार ९६० मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिजित वंजारी यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान केले.

नागपूरच्या मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता ८४ टेबलवरून मतमोजणीला सुरुवात झाली. ४१ पेक्षा जास्त तासांपासून ही मतमोजणी सुरू होती. यावेळी निवडणूक निरीक्षक डॉ.हर्षदीप कांबळे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, विभागातील सर्व जिल्ह्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक ७५ हजार ४३८ मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेनुसार द्वितीय पसंतीक्रमाची बाद फेरी घेण्यात आली. पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये १ लाख ६५ हजार ९०६ मतांपैकी १५ हजार ३२ मते अवैध ठरली. तर १ लाख ५० हजार ८७४ मते वैध ठरली.

द्वितीय पसंतीच्या बाद फेऱ्यामध्येही कुठल्याही उमेदवाराला निर्धारित कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे पहिल्या व द्वितीय पसंतीक्रमाच्या बाद फेरी मिळून सर्वाधिक ६७ हजार २३१ मते घेणाऱ्या अभिजित वंजारी यांना विजयी घोषीत करण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाने नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम २२ सप्टेंबर रोजी जाहीर केला होता. त्यानुसार २९ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान झाले. या निवडणुकीची मतमोजणी २७ ऑक्टोबर सकाळी ८ वाजता सुरू झाली. ४१ तासांनंतर मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली. निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे वेळापत्रक आयोगाने निश्चित केले आहे.

## सुधाकर कोहळेंना जिंकवण्याची जबाबदारीही आली अंगावर; दुसऱ्या पसंतीने काँग्रेसचा डाव यशस्वी मुख्यमंत्र्यांच्या प्रतिष्ठेची लढाई ठरली चर्चेचा विषय

**वर्धा/ रवींद्र लाखे**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी भाजपचे सुधाकर कोहळे यांचा पराभव करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय प्रतिष्ठेला धक्का दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या गृहक्षेत्रातच भाजपला हा पराभव स्वीकारावा लागल्याने राजकीय वर्तुळात निकालाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. भाजपने मोठी ताकद पणाला लावली, प्रचारयंत्रणा कामाला लावली; मात्र अखेर विजयाचा गुलाल काँग्रेसने उधळला.

सुधाकर कोहळे हे फडणवीस यांच्या निकटवर्तीयांपैकी मानले जातात. त्यांना उमेदवारी मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतल्याची चर्चा होती. त्यामुळे ही निवडणूक केवळ एका जागेपुरती मर्यादित न राहता मुख्यमंत्र्यांच्या प्रतिष्ठेची लढाई बनली होती. मात्र निकालाने भाजपच्या अपेक्षांना धक्का दिला.

**पहिल्या पसंतीत आघाडी, अंतिम निकालात पराभव**

मतमोजणीच्या पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये सुधाकर कोहळे यांनी ६० हजार ९२४ मते मिळवत अभिजित वंजारी यांच्यावर ४ हजार २९४ मतांची आघाडी घेतली होती. वंजारी यांना ५६ हजार ६३० मते मिळाली. त्यामुळे भाजपच्या गोटात विजयाच्या आशा उंचावल्या होत्या. मात्र, विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा कोणत्याही उमेदवाराला गाठता आला नाही. त्यानंतर दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी सुरू झाली आणि निकालाचे गणितच बदलले.



अखेर अभिजित वंजारी यांना ६७ हजार २३१, तर सुधाकर कोहळे यांना ६३ हजार ९६० मते मिळाली. वंजारी यांनी ३ हजार २७१ मतांनी विजय मिळवला. पहिल्या पसंतीच्या मतांतील आघाडी अंतिम विजयात रूपांतरित करण्यात कोहळे यांना अपयश आले.

**गडकरींच्या प्रभावक्षेत्रातही भाजपला यश नाही**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रभावक्षेत्रातील या मतदारसंघात भाजपला विजय मिळवता आला नाही. कोहळे यांच्या उमेदवारीवरून पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या पसंतीबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, उमेदवारीच्या गणितापासून प्रचाराच्या ताकदीपर्यंत सर्व प्रयत्नांनंतरही भाजपला जागा राखता आली नाही.

मुख्यमंत्र्यांच्या गृहक्षेत्रात झालेला हा पराभव भाजपसाठी आत्मपरीक्षणाचा विषय ठरला आहे. पहिल्या पसंतीच्या मतांत आघाडी मिळूनही दुसऱ्या पसंतीच्या मतांनी निकाल फिरवला. त्यामुळे केवळ उमेदवाराची निवड किंवा प्रचाराची ताकद पुरेशी नसते, तर मतदारांशी असलेला संपर्क आणि निवडणुकीतील मतांचे गणितही निर्णायक ठरते, हे या निकालाने दाखवून दिले.

## भाजप-काँग्रेसने कमी लेखलेला उमेदवार ठरला 'किंगमेकर'

### नागपूर पदवीधर निवडणुकीत अपक्ष नितेश कराळेची निर्णायक भूमिका

**वर्धा/ जनमाध्यम**

निवडणुकीच्या मैदानात मोठ्या पक्षांची ताकद चालते की जनतेशी जोडलेली लोकप्रियता, याची प्रचिती नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निकालातून आली. वर्ध्यातील प्रसिद्ध 'खदखद मास्तर' नितेश कराळे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून तब्बल २४ हजारांहून अधिक मते मिळवत भाजप आणि काँग्रेसच्या राजकीय गणिताला धक्का दिला. स्वतः विजय मिळवता आला नसला, तरी निकालाच्या समीकरणात त्यांची



भूमिका महत्त्वाची ठरली.

भाजप आणि काँग्रेस या दोन्ही प्रमुख पक्षांनी कराळे यांच्या उमेदवारीकडे फारसे गांभीर्याने पाहिले नसल्याची चर्चा होती. अपक्ष उमेदवार म्हणून ते किती मते घेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र, मतमोजणीने त्यांच्या ताकदीची दखल घेण्यास भाग पाडले.

पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये काँग्रेसचे अभिजित वंजारी आणि भाजपचे सुधाकर कोहळे यांच्यात चुरस होती. कराळे यांनी मिळवलेल्या मतांमुळे प्रमुख उमेदवारांच्या विजयाचे गणित अधिक गुंतागुंतीचे झाले. अखेर दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या मोजणीत अभिजित वंजारी यांनी बाजी मारली.

निवडणूक जिंकता आली नाही, पण निकालाच्या चर्चेत कराळे केंद्रस्थानी आले! मोठ्या पक्षांच्या उमेदवारांना आव्हान देत त्यांनी मिळवलेली मते आगामी राजकीय समीकरणांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरू शकतात. त्यामुळे नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत नितेश कराळे यांची उमेदवारी केवळ अपक्षांची लढत न राहता निकालावर प्रभाव टाकणारी ठरली.

## चार वर्षांपासून पाण्यासाठी वणवण, शेतकऱ्याचा आत्महत्येचा इशारा

### घोराडच्या गुणवंत राऊत यांची व्यथा

**सेलू /जनमाध्यम**

शेतीला पाणी मिळावे म्हणून चार वर्षांपासून संघर्ष, वारंवार तक्रारी आणि शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवूनही पदरी निराशाच! अखेर हतबल झालेल्या सेलू तालुक्यातील घोराड येथील शेतकरी गुणवंत कवडूजी राऊत यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे. 'आजच पाण्याची व्यवस्था करा, अन्यथा कार्यालयातच आत्महत्या करेन,' अशी भूमिका त्यांनी घेतल्याने खळबळ उडाली आहे.



राऊत यांच्या आरोपानुसार, त्यांच्या शेताकडे जाणारे सिंचनाचे पाणी शेजारील शंकर राऊत आणि आशा रोकडे यांनी अडवले आहे. पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील मुख्य कॅनल आणि नाली बुजविल्यामुळे पाण्याचा प्रवाह बंद झाल्याचा त्यांचा दावा आहे. परिणामी, चार वर्षांपासून शेताला पाणी मिळत नसल्याने शेती करणे कठीण झाल्याचे त्यांनी सांगितले. शेताच्या पाण्यासाठी राऊत यांनी वारंवार अर्ज केले.

तहसिलदार कार्यालयात चकरा मारल्या, तसेच पोलीस ठाण्यात तक्रारही दिली. मात्र, केवळ अदखलपात्र नोंद होऊनही प्रश्न सुटला नसल्याची त्यांची तक्रार आहे. त्यांच्यावर हृदयशस्त्रक्रियाही झाली असून, शारीरिक आणि आर्थिक अडचणींमध्ये त्यांचा संघर्ष सुरू आहे.

**प्रशासन आता तरी जागे होणार का?**

शेतकऱ्याला सिंचनाच्या पाण्यासाठी चार वर्षे प्रतीक्षा करावी लागणे आणि अखेर आत्महत्येचा इशारा देण्याची वेळ येणे, ही चिंतेची बाब आहे. पाटबंधारे विभागाने तातडीने कॅनलची पाहणी करून पाण्याचा मार्ग मोकळा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच शेतकऱ्याच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वादातून वृद्धाच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला

**आष्टी -** किराणा दुकानासमोर बसलेल्या वृद्धाच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार करून त्यांना गंभीर जखमी केल्याची घटना बोटोना येथे घडली. अनिल सदाशिव ठाकरे याने मारहाण केल्याचा आरोप जखमीच्या मुलाने तक्रारीत केला आहे. या प्रकरणी आष्टी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादी समीर राजेंद्र भांगे यांच्या तक्रारीनुसार, बोटोना येथील त्यांच्या घराजवळ किराणा दुकान आहे. घटनेच्या वेळी त्यांचे वडील दुकानासमोर बसले होते, तर समीर घराशेजारील गोठ्यात काम करीत होते. दरम्यान, त्यांच्या पत्नीने धावत येऊन वडिलांना कोणीतरी मारहाण करीत असल्याचे सांगितले. समीर यांनी दुकानासमोर जाऊन पाहिले असता वडिलांच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव होत असल्याचे दिसले. विचारणा केली असता अनिल सदाशिव ठाकरे याने डोक्यावर लोखंडी रॉड मारल्याचे वडिलांनी सांगितले, असे तक्रारीत नमूद आहे.जखमेतून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने त्यांना तातडीने कारंजा येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले.मारहाणीमागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. तक्रार आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे आष्टी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

### पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर कृषि विभागाच्या सूचना

**वर्धा/ जनमाध्यम**

यावर्षी मान्सूनचा पाऊस अपुरा पडल्यामुळे जमिनीतील ओलावा आणि विहिरींच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पाण्याचा काटेकोर विचार करूनच पिकांची निवड करावी तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर यांनी केले आहे.

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दुष्काळ निवारण आराखडा बैठकीतील सूचनांनुसार आगामी रब्बी हंगामाच्या प्रभावी नियोजनासाठी कृषी विभागातर्फे सध्या मोहीम स्तरावर अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. पाण्याची मर्यादित उपलब्धता पाहता शेतकऱ्यांनी जास्त पाण्याची पिके न घेता मोहरी, जवस, तीळ, करडई, हरभरा व मसूर या कमी कालावधीत आणि कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची प्राधान्याने पेरणी करावी. जिल्ह्याभरातील बोर, पोथ्रा व निम्न वर्धा सिंचन प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी केवळ २ पाण्याच्या पाळ्या उपलब्ध होणार आहेत.

त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी उपलब्ध २ पाळ्यांनुसार पाण्याचे काटेकोर व अचूक नियोजन करणे गरजेचे आहे.

कृषी विभाग व आत्मा मार्फत ज्वारी, हरभरा, मसूर, करडई, सूर्यफूल, जवस व मोहरी या पिकांची प्रात्यक्षिके आयोजित केली जात आहेत. यामध्ये ज्वारीचे १ हजार मिनीकीट, मसूरचे ७०० मिनीकीट आणि हरभऱ्याचे ९०० मिनीकीट १०० टक्के अनुदानावर पुरवले जाणार आहेत. या प्रात्यक्षिके व बियाणे मिनीकीटचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी फार्मर पोर्टलवर तात्काळ ऑनलाईन नोंदणी व अर्ज सादर करावेत.

याशिवाय आगामी काळात पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भासू नये म्हणून १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच व्हीबीजी रामजी' योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानित चारा पीक लागवडीचा लाभ पात्र शेतकऱ्यांनी घ्यावा. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी तसेच नजीकच्या मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

## कत्तलीसाठी १७ गोवंशीय जनावरांची वाहतूक पोलिसांच्या नाकाबंदीत बोलेरो पकडली

**तळेगाव (शा.पं.) -** गोवंशीय जनावरांची दाटीवाटीने वाहतूक करणारी बोलेरो पिकअप गाडी पोलिसांनी पकडली. या वाहनात १७ गायी आढळून आल्या. पोलिसांनी जनावरे आणि वाहन असा एकूण तीन लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई तळेगाव पोलिसांनी आष्टी मार्गावरील निष्पुर फाट्याजवळ केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ ऑक्टोबर रोजी पहाटे गोरक्षक सचिन पाचघरे यांनी गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारी बोलेरो पिकअप नागपूरहून अमरावतीकडे जात असल्याची माहिती पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून आष्टी मार्गावर नाकाबंदी केली.

दरम्यान, संशयित बोलेरो पिकअप भरधाव वेगाने जाताना दिसली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला; मात्र चालकाने वाहन न थांबविता पुढे नेले. पोलिसांनी पाठलाग केला असता चालकाने निष्पुर फाट्याजवळ रस्त्याच्या खाली वाहन नेले. त्यानंतर चालक झाडीझुडपांचा आधार घेत पळून गेला.पंचांसमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात १७ गायी अत्यंत दाटीवाटीने भरलेल्या आढळल्या. जनावरांचे पाय दोरखंडाने बांधल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले. यात आठ लाल रंगाच्या, सात पांढऱ्या आणि दोन भुरकट-पांढऱ्या रंगाच्या गायींचा समावेश आहे. पोलिसांनी १७ गायींची किंमत एक लाख ६० हजार रुपये, तर बोलेरो पिकअपची किंमत एक लाख ५० हजार रुपये, असा एकूण तीन लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जनावरांना पुढील देखभालीसाठी अमरावती येथील गोसेवा संस्थेकडे पाठविण्यात आले.

## चुन्हाळा गावामध्ये लोकसहभागातून श्रमादानाने बांधला वनराई बंधारा

**वर्धा/ जनमाध्यम**

संभाव्य दुष्काळ व पाणीटंचाईच्या परिस्थितीची तीव्रता कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ओढे-नाळे यामधील वाहून जाणारे पाणी अडवून पिकांना संरक्षित पाणी देणे, जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणे तसेच लोकांना दैनंदिन वापरासाठी पाणी उपलब्ध होण्याकरिता लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्याची मोहीम कृषि विभागामार्फत हाती घेण्यात आली आहे. या मोहीमेअंतर्गत वर्धा तालुक्यातील चुन्हाळा गावात श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला.

सन २०२६-२७ मध्ये जिल्ह्यात सुमारे १२५० वनराई बंधारे बांधण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून याकरीता क्षेत्रीय स्तरावर प्रती कृषि सहाय्यक ८ प्रमाणे वनराई



बंधाऱ्याचे लक्षांक प्रत्येक तालुक?यांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत १२७ वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. प्रस्तावित वनराई बंधाऱ्यामुळे सरासरी २ हेक्टर प्रमाणे एकूण २५०० हेक्टर क्षेत्रास संरक्षित सिंचन उपलब्ध होईल, असे अपेक्षित आहे.

काही ठिकाणी अधिकचा पाणीसाठा होऊन सिंचन क्षेत्रात वाढ होऊ शकेल. वनराई बंधाऱ्याच्या आजूबाजूच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन दुष्काळी परिस्थितीमध्ये पाणी टंचाई कमी करण्यास मदत होईल. याशिवाय वनराई बंधाऱ्यातील पाण्याचा उपयोग पिण्याच्या पाण्याकरीता, गुरांना पाणी पिण्याकरीता करता येईल. एका वनराई बंधाऱ्याचे महत्त्व बहुमोल असल्याने नागरिकांनी लोकसहभागातून जास्तीत जास्त वनराई बंधारे बांधण्याकरीता आवश्यक त्या साहित्यासह कृषि यंत्रणेस सहकार्य करावे, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

## राष्ट्रीय दृष्टिहीन संघाचे जागृत दृष्टी साहित्य संमेलन

### कविसंमेलन,कथाकथन रंगले - गीतगायनाने संमेलनाची सांगता

**वर्धा/ जनमाध्यम**

कथाकथन,परिसंवाद,व्याख्यान, कविसंमेलन अशा वैविध्यपूर्ण व दर्जेदार उपक्रमांमुळे पूर्णत्व लाभलेल्या राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्या दोन दिवसीय जागृत दृष्टी साहित्य संमेलनाची सांगता सुरेल गीतगायन मैफलीने करण्यात आली.

स्थानिक अनेकांत स्वाध्याय मंदिर सभागृहात आयोजित या संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'तमाच्या तळाशी दिवे लागले' या नागपूरच्या विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. शिरीष देशपांडे यांच्यावरील चरित्रात्मक पुस्तकावर परिसंवाद घेण्यात आला. परिसंवादात डॉ. विनिता हिंगे यांनी मोजक्या व प्रभावी शब्दात या पुस्तकातील भावविश्व उलगडले. यावेळी प्रा.डॉ.शैला शिरीष देशपांडे आणि भावना खरे यांनीही मनोगत व्यक्त केले.द्वितीय सत्रात ज्येष्ठ हिंदी कथाकार घनश्याम आसुदानी (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बहुआयामी कथाकथनात रेवानंद मेश्राम (चंद्रपूर),अभिजित डाखोरे (हिंगणघाट), प्रा.डॉ. सुचिता ठाकरे, प्रा. मीनल रोहणकर व साधना उमाळकर यांनी ओघवत्या शैलीत कथा सादर केल्या.

सायंकालीन सत्रात ज्येष्ठ गझलकार व लेखक काशिनाथ महाजन (नाशिक) यांच्या अध्यक्षतेखाली बहुभाषिक कविसंमेलन घेण्यात आले. या



काव्यसत्राचे रंगतदार सूत्रसंचालन गझलकार विद्यानंद हाडके व प्रवीण कांबळे यांनी केले. कविसंमेलनात ज्ञानेश्वर वऱ्हाडे (वाशिम), गंगाधर मुटे (आर्वी छोटी), प्रीती तडस वाडीभस्मे, मंजुषा ठाकरे चौगावकर, कविता बेदरकर, वृषाली मरतोडे, राहुल राऊत, स्वाती सगरे (वर्धा) अॅड. इब्राहिम बक्श आझाद, नरेंद्र गंधारे (हिंगणघाट), सुरेश सुरजुसे (करंजी काजी), गझलकार अजीजखान पठाण,राजेंद्र कांबळे,छत्रपाल तामगाडगे, सुरेश वंजारी, सूर्यकांत मुनघाटे, चरणदास वैरागडे, नरेश पाटील,शरद कांबळे (नागपूर) यांनी दर्जेदार कविता व गझल सादर करीत रसिकांची दाद मिळवली. संमेलनाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर यांनीही यावेळी हिंदी काव्यरचना सादर केली.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी सिनेनाट्य दिग्दर्शक तथा नाम फाउंडेशनचे समन्वयक हरिष इथापे यांनी 'मन, मेंदूला अनलॉक करू या' या विषयावर प्रेरणादायी संवाद साधत नवोन्मेषशाली विचारांची मांडणी केली.संमेलनाच्या समारोप सत्रात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सहभागी साहित्यिक व आयोजन समितीतील कार्यकर्त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या संमेलनाची सांगता 'सूरसंगम गीतगुंजन' मैफलीने झाली. या कार्यक्रमात जियाउद्दीन शेख (नागपूर), पूजा शेंदरे (यवतमाळ), लीला लाकडे (चंद्रपूर), प्रशांत देऊळकर (वर्धमनेरी) यांच्यासह संगीता इंगळे, ज्योती भगत, मकरंद उमाळकर यांनी सुरेल गाणी सादर केली.

संमेलनाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्रचे अध्यक्ष भोजराज पाटील, महासचिव डी. पी. जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र देवरे, कोषाध्यक्ष डी. एन. मरडे, राष्ट्रीय सचिव जगदीप कवाळ, संमेलन समन्वयक नरेंद्र नरोटे यांनी परिश्रम घेतले. दृष्टीबाधित आणि दृष्टिवान अशा दोन्ही साहित्यिकांचा मेळ घालत वर्ध्यात आयोजित या पहिल्याच राज्यस्तरीय जागृत दृष्टी साहित्य संमेलनाने डोळस साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले.

## छातीत दुखू लागल्यान मृत्यू

**सेलू-** छातीत अचानक दुखू लागल्याने उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल केलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, संबंधित व्यक्ती आपल्या राहत्या घरी आराम करीत असताना अचानक छातीत दुखू लागले. त्यामुळे नातेवाइकांनी त्यांना उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना २६ ऑक्टोबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत्यूची माहिती लेखी स्वरूपात कळविल्यानंतर पोलिसांनी नोंद घेतली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# अंजनगाव सुर्जी येथे अन्न व औषध प्रशासनाचा छापा

## विनापरवाना आयुर्वेदिक औषध निर्मितीचा साठा जप्त

**अंजनगाव सुर्जी/वार्तार**

येथील शहरातील ब्राह्मणपूरा, सुर्जी येथील देवनाथ मठाजवळ सुरू असलेल्या 'मे. गणेश गृह उद्योग' या आस्थापनेवर अन्न व औषध प्रशासन (FDA), अमरावती विभागाने संध्याकाळी धडक कारवाई केली. कोणतीही वैध परवानगी किंवा परवाना नसताना या ठिकाणी आयुर्वेदिक औषधांचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईत 'नानाजी आयुर्वेदिक मालीश तेल' चा साठा, उत्पादन यंत्रसामग्री (मशिनरी) आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.





अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, अमरावतीचे सहाय्यक आयुक्त (औषधे) अनिल माणिकराव यांना तक्रार क्र. FDA-MH-2026-093211 (६ ऑक्टोबर २०२६) अन्वये या विनापरवाना उद्योगाची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे,२८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:०५ वाजता एफडीएच्या पथकाने अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांसह सदर ठिकाणी छापा टाकला.या धाडसी कारवाईत सहाय्यक आयुक्त अनिल माणिकराव यांच्यासह अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी संदीप एकनाथराव सूर्यवंशी, अ.ग.चौहान उपस्थित होते. तसेच अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई रवी राठोड (ब.नं. ५२७), अमित घाटे (ब.नं. २४५९) आणि महिला पोलीस शिपाई राधा गाताडे (ब.नं. १५७८) यांनी कारवाईत मोलाची मदत केली. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान विक्रम दामोदर सरोदे (वय ४१, रा. गणेश नगर) आणि अंकुश ओमप्रकाश जावरकर (वय ३५, रा. डी. पी. रोड, अंजनगाव सुर्जी) हे पंच म्हणून उपस्थित होते.

पथक घटनास्थळी पोहोचले असता,त्या ठिकाणी पेढीचा सर्व व्यवहार सांभाळणारे गणेश रुपराव वानखडे (वय ५२ वर्ष, रा. देवनाथ मठाजवळ, ब्राह्मणपूरा, सुर्जी) हे आढळून आले. ते या ठिकाणी 'नानाजी आयुर्वेदिक मालीश तेल' व इतर आयुर्वेदिक औषधांचे उत्पादन आणि विक्री करत असल्याचे स्पष्ट झाले. पथकाने त्यांच्याकडे औषध निर्मिती आणि विक्रीसाठी आवश्यक असणाऱ्या वैध परवान्याची (थ्महो) मागणी केली असता, त्यांच्याकडे कोणताही अधिकृत परवाना मिळून आला नाही. पंचांसमक्ष जागेची कसून तपासणी केली असता, हा व्यवसाय पूर्णपणे बेकायदेशीर आणि विनापरवाना सुरू असल्याची खात्री अधिकाऱ्यांना पटली.

गुन्हा सिद्ध झाल्यानंतर सहाय्यक आयुक्त अनिल माणिकराव यांनी पंचांसमक्ष 'नानाजी आयुर्वेदिक मालीश तेल'चा एक नमुना कायदेशीर प्रक्रियेनुसार 'Form 17' अन्वये ताब्यात घेतला आणि संबंधितांना 'Form 17 A' ची प्रत दिली.

याशिवाय घटनास्थळावर असलेला उर्वरित औषध साठा, ग्राइंडिंग मशीन (Grinding Machine) आणि इतर साहित्य 'Form 16' मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोरुगेटेड बॉक्सेस (Corrugated Boxes) मध्ये भरून सीलबंद करून जप्त करण्यात आले.

सायंकाळी ६:०५ वाजता सुरू झालेली ही कारवाई दीड तास चालून सायंकाळी ७:३४ वाजता संपली. संपूर्ण घटनेचा पंचनामा जागेवरच लॅपटॉपवर तयार करून पंचांना वाचून दाखवण्यात आला व त्यावर स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. अमरावती एफडीएच्या या अचानक झालेल्या धडक कारवाईमुळे अंजनगाव सुर्जी आणि परिसरात विनापरवाना, बनावट किंवा अनधिकृत औषध उत्पादन करणाऱ्या पुरवठादारांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन, अमरावती विभाग पुढील कायदेशीर तपास व कारवाई करत आहे.

# कालवा तोडफोडीने सिंचन धोक्यात

## कारवाई करून नुकसानभरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**कुऱ्हा/वार्ताहर**

अप्पर वर्धा कालवे विभागांतर्गत सिंचन शाखा कुऱ्हा क्रमांक ३ मधील लघुपाटावरील कालवा, गेट व वितरिकेची मोडतोड करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांचे सिंचन प्रभावित झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून, संबंधितांवर योग्य कारवाई करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कुऱ्हा क्रमांक ३ लघुपाटावरून आर.आर. १ वर अंजनवती-बोर्डा रस्त्यालगत पूल आहे. या पुलाशेजारी कालव्याच्या दक्षिण बाजूस असलेल्या गेटमधून पाणी पुढे वितरिकेद्वारे शेतापर्यंत पोहोचत होते. रस्त्यावर सिमेंट पाइप टाकून कुऱ्हा-अंजनसिंगी रस्त्यापर्यंत सुमारे २५.३० हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत होते. मात्र, सन २०२५ च्या उन्हाळ्यात संबंधित शेतमालकाने गेट, कालव्यालगतची झाडे, कालव्याचा बांध आणि वितरिकेची मोडतोड करून ही सिंचन व्यवस्था विस्कळीत केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.या प्रकाराबाबत संबंधित विभागाला यापूर्वीही माहिती देण्यात आली होती. त्यामुळे विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून वस्तुस्थितीची खातरजमा करावी. तसेच सिंचन व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. कालव्याच्या मोडतोडीमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या असून, त्यांच्या शेतीच्या उत्पादनावर आणि आर्थिक परिस्थितीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संबंधित विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर नियमानुसार कारवाई करावी आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.यावेळी श्रीधर भोयर, रामदास घावट, शोभाबाई पंडितराव वानखडे, संतोष राऊत, विवेक हुडे, जिजाबाई हुडे, रमेश भोयर, प्रफुल्ल भोयर, रामेश्वर राऊत, घनश्याम हुडे, सतीश हुडे आणि रामकृष्ण मानकर उपस्थित होते.

# शिवसेनेचे आज समृद्धी महामार्ग रोको आंदोलन

**अंजनगाव सुर्जी**-शेतकरी आणि शेतमजुरांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या वतीने शुक्रवार, ३० ऑक्टोबर वनोझा, ता. मंगरूळपीर येथे आ. गजानन लवटे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आक्रमक रोजी सकाळी ११ वाजता समृद्धी महामार्ग रोको आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी हजारोंच्या संख्येने सहभागी होणार आहे. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर शासनाचे लक्ष केंद्रित व्हावे आणि त्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय मिळावा, आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी व शेतमजुरांच्या हक्कांसाठी संघटितपणे आवाज उठवून त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेनेच्या वतीने आंदोलनाची भूमिका घेण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### 'मराठा फ्रेंडस् क्लब'च्या वतीने खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**अमरावती**-महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला, अस्सल मराठमोळा आणि अंगात वीज संचारणारा खेळ म्हणजेच 'खो-खो'. या पारंपरिक खेळाचा वेग, धडाडी आणि कौशल्याचा अद्भुत संगम घडवून आणण्यासाठी अमरावती नगरी सज्ज झाली आहे. 'मराठा फ्रेंडस् क्लब, रुक्मिणी नगर यांच्या सुसंस्कृत व प्रेरणादायी आयोजनातून 'विभागीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा - २०२६-२७' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २ ते ३ नोव्हेंबर २०२६ ला आयोजित केली आहे. यामध्ये १४ व १७ वर्षाखालील (मुले व मुली) भाग घेणार असून मराठा फ्रेंडस् क्लब, रुक्मिणी नगर, बस स्टँडच्या समोर, सकाळी ९:०० वाजता ही स्पर्धा होणार आहे. अमरावती विभागातील, तसेच सर्व विभागातील क्रीडाप्रेमींनी,शाळांनी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या वीरश्रीने भरलेल्या खेळाच्या उत्सवाला आणि आपल्या लाडक्या खेळाडूंना भरघोस पाठिंबा द्यावा, असे आवाहन 'मराठा फ्रेंडस् क्लब'च्या वतीने करण्यात आले आहे.





### कन्या शाळेत 'गोष्टरंग'चा नाट्यमय प्रयोग

**अंजनगाव बारी**-जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा अंजनगाव बारी येथे ैलू संस्थेमार्फत पालवी प्रकल्पांतर्गत 'गोष्टरंग' टीमच्या वतीने पुस्तकातील गोष्टींचा नाट्यमय प्रयोग सादर करण्यात आला. पालघर येथील ैलू संस्था २००७ पासून बालशिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, अमरावती जिल्ह्यात अंगणवाड्यांमध्ये पालवी प्रकल्प राबविला जात आहे. या उपक्रमातून पुस्तकातील गोष्टी नाट्यरूपात सादर करून विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण केली जाते.या नाट्यमय प्रयोगात पुष्पक भट,शर्वरी पांडे आणि शुभम कुंभार यांनी सादरीकरण केले. दिग्दर्शन केतन जाधव,गीते शिवप्रणव,आवाज श्रवण खोंडेकर आणि निर्मिती सहाय्य महेंद्र वाळूज यांचे होते. वैष्णवी तुरक यांच्या प्रयत्नांतून विद्यार्थिनींना या अभिनव उपक्रमाचा आनंद घेता आला.पुस्तकांचे अर्थपूर्ण वाचन,वाचलेल्या गोष्टींची टिप्पणी लिहिणे आणि वाचनातून आनंद मिळविणे यांचे महत्त्व या उपक्रमातून विद्यार्थिनींना समजले,असे मत मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी व्यक्त केले.शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा स्नेहा सुनील पोकळे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.कार्यक्रमाला शिक्षक रामेश्वर स्वर्गीय, किशोर मालोकार,संगीता मंडे,रेशमा वांगे,श्याम खुंटे,संगीता इंगळे आणि अर्चना कुऱ्हाडे यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी गोष्टरंग टीमचे आभार मानले.



### कायदेविषयक मार्गदर्शन विषयक शिबीर

**तिवसा**-स्थानिक कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय तिवसा येथे विधीसेवा समिती तिवसा द्वारे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी दिवाणी व फौजदारी न्यायालय तिवसा येथील न्यायाधीश रोहिणी मनोहरे, तीवसा पोलीस स्टेशनच्या पी.एस.आय. विद्या कळसे तसेच विवेक शिक्षण संस्थेच्या सदस्या छाया दंडाळे उपस्थित होत्या. कायदेविषयक मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे तिवसा पोलीस स्टेशनच्या पीएसआय विद्या कळसे यांनी विद्यार्थिनींना सोशल मीडियाचा वापर करत असताना घ्यावयाची काळजी व त्या संदर्भात घडणारे विविध गुन्हे याविषयी माहिती दिली.याप्रसंगी संस्थेच्या सदस्या छायाताई दंडाळे यांनी विद्यार्थिनींना शाळेपर्यंतचा प्रवास करत असताना रोजच्या जीवनामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय योजना याविषयी चर्चा केली.

# महाराष्ट्र मंदिर महासंघ जिल्ह्यात 'मंदिर जोडो अभियान' राबवणार!

## १२५ मंदिरांच्या विश्वस्तांचा मेळावा; देवस्थानांना दुष्काळी साहाय्य देण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

मंदिरांचे संघटन मजबूत करून मंदिरांच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अमरावती जिल्ह्यात 'मंदिर जोडो अभियान' राबवण्यात येणार आहे. श्री नागेश्वर मंदिर सभागृह, कोल्हटकर कॉलनी,गणेश कॉलनी, शिलांगण रोड येथे आयोजित मंदिर विश्वस्त मेळाव्यात ही घोषणा करण्यात आली. या मेळाव्याला १२५ मंदिरांचे विश्वस्त उपस्थित होते.

महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक तथा हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड समन्वयक सुनील घनवट यांनी मंदिर विश्वस्तांना मार्गदर्शन केले. मंदिरांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि मंदिर संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी सर्व मंदिर विश्वस्तांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. एका मंदिरावर संकट आले, तर अन्य मंदिरांच्या विश्वस्तांनी त्याच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. मंदिरांचे प्रभावी संघटन उभारून आपल्या समस्या शासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या कोअर कमिटीचे सदस्य अनुप जयस्वाल



यांनी देवस्थानांच्या जमिनींच्या संरक्षणासाठी सक्षम कायदा करण्याची गरज व्यक्त केली. तसेच तीर्थक्षेत्र विकास निधीशी संबंधित अडचणी शासनाने दूर कराव्यात, अशी मागणी केली. हिंदु जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर यांनी मंदिरांच्या शेतीचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई देताना भेदभाव करू नये, असे सांगितले. मंदिरांच्या शेतीला आणि सामान्य शेतकऱ्यांच्या शेतीला समान न्याय मिळावा, यासाठी मंदिर विश्वस्तांनी संघटितपणे शासनाकडे मागणी करावी, असे ते म्हणाले. शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहाय्य देण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र, देवस्थान इनाम सनदधारक म्हणून शेती करणाऱ्या अधिकृत शेतकऱ्यांना तसेच राज्यातील देवस्थानांना या साहाय्यापासून वंचित ठेवले जात असल्याचा मुद्दा मेळाव्यात उपस्थित करण्यात आला. संबंधित शेतकरी आणि देवस्थानांनाही दुष्काळी साहाय्य व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या मेळाव्याला हिंदु जनजागृती समितीचे प्रदीप गर्गे, सचिन वैद्य तसेच राधाकृष्ण मंदिराचे विश्वस्त व अधिवक्ता अभिजीत बजाज उपस्थित होते. यासह सावंगा विठोबा अवधूत संस्थांचे अध्यक्ष पुंजारामजी नेमाडे, सचिव अशोक सोनवाल, माता खिडकी संस्थानचे अध्यक्ष सुभाष पावडे, अंबादेवी संस्थानचे अधिवक्ता राजेंद्र पांडे, पिंगळादेवी संस्थानचे अध्यक्ष विनीत पाखोडे, कोंडेश्वर संस्थानचे रामकृष्ण लांडोरे, लक्ष्मीनारायण संस्थान, अचलपूरचे अशोक खंडेलवाल आणि रेणुकामाता संस्थानचे उत्तम ब्राम्हणवाडे यांच्यासह विविध मंदिरांचे विश्वस्त उपस्थित होते. मंदिरांचे संघटन मजबूत करणे, देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण करणे आणि मंदिरांच्या शेतीला न्याय्य नुकसानभरपाई मिळवून देणे, या प्रमुख विषयांवर या मेळाव्यात भर देण्यात आला.

# आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेमध्ये श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा विजय

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संघाने डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन (एच.व्ही.पी.एम) अमरावती, येथील संघावर दणदणीत विजय मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. २६ ऑक्टोबर पासून सुरू झालेल्या या आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्याल अमरावती येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण २६ महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदविला. त्यामधून अंतिम सामना २७ ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय विरुद्ध डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालय यांच्यात रंगला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या खेळाचे अतिशय उत्कृष्ट प्रदर्शन दाखवले या चुरशीच्या लढतीत श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या,अर्पिता वाघमारे,निधी मेश्राम,आचल डफले,सोनल चव्हाण खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक समन्वय,जिद्द, चिकाटी आणि कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करीत दणदणीत विजय संपादन केला. या उल्लेखनीय यशाबद्दल



श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन जी देशमुख कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले तसेच संस्थेच्या सर्व कार्यकारी सदस्यांनी विजयी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे आयक्यूएसी समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख सोबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही खेळाडूंचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. संघाने मिळविलेल्या या यशाकरता महाविद्यालयामध्ये कार्यरत प्रा. सौरभ काळमेघ यांनी अथक परिश्रम घेऊन महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत भर पाडली असून, आगामी स्पर्धांमध्येही संघाने अशीच उज्ज्वल कामगिरी करावी, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# प्रभावी नियोजनातून विद्यूत उपकेंद्रातील तांत्रिक अडचणी दूर

## मुख्य अभियंता दोडके यांनी घेतला आढावा

**अमरावती/का.प्र.**

सुरळीत आणि अखंड वीजपुरवठा राखण्यात विद्युत उपकेंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे उपकेंद्रांमध्ये उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींची कारणे शोधून त्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिले. मोर्शी विभागातील ३३ केव्ही मोर्शी, ३३ केव्ही हिवरखेड आणि १३२ केव्ही मोर्शी या विद्युत उपकेंद्रांना भेट देऊन वीज वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. आर्थिक सहाय्यातून उभारण्यात येणाऱ्या जिल्ह्यातील १४, तर मोर्शी विभागातील पाच उपकेंद्रांच्या कामकाजाची माहिती मुख्य अभियंता दोडके यांनी घेतली. यावेळी टाकरखेडा मोरे



आणि खारवाडी येथील प्रस्तावित उपकेंद्रांच्या जागेबाबतही चर्चा करण्यात आली. वीजबिल वसुलीचा आढावा घेताना ऑक्टोबर महिन्यातील वसुली अपेक्षित उद्दिष्टाच्या तुलनेत कमी असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. वीजग्राहकांना अचूक वीजबिल देणे ही महावितरणची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत मुख्य अभियंता दोडके यांनी सदोष मीटर,सरासरी बिलिंग आणि बिलिंग प्रक्रियेतील त्रुटींचा आढावा घेतला. बिलिंगमधील त्रुटी दूर करून बिल दुरुस्तीची (बिल रिव्हिजन) प्रकरणे शून्यावर आणावीत, तसेच बिलिंग कार्यक्षमता शंभर टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यावेळी कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट, अतिरिक्त कार्यकारी अभियंता काळे, उपकार्यकारी अभियंता वाघेला, दिनेश भागवत, टेकाडे यांच्यासह वित्त व लेखा आणि मानव संसाधन विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' देऊन सन्मानित करा

## प्रमोद पोकळे यांचे शासनाला निवेदन

**अमरावती/का.प्र.**

स्वच्छता, आरोग्य, ग्रामविकास, अध्यात्म, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रभक्ती व देशपातळीवर विविध विधायक उपक्रम राबवून देशावर आलेल्या संकटात धावून जाऊन खऱ्या अर्थाने राष्ट्रसेवेत अमूल्य योगदान देणाऱ्या व स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन अनेक तरुणांना मार्गदर्शन करून त्यांच्यात खंजरी भजनांच्या माध्यमातून ऊर्जा व स्फूर्ती भरणाऱ्या राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालाच पाहिजे, अशी मागणी कलावंत व साहित्यिक



आधार संघ, अमरावतीचे समन्वयक तथा दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे' अशी उदात्त कामना ठेवून व 'गाव हा विश्वाचा नकाशा' यांवर अढळ विश्वास ठेवून राष्ट्रनिर्माणाच्या कार्याची गावोगावी ज्योत प्रज्वलित करणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाजप्रबोधन, जातील सलोखा, श्रमप्रतिष्ठा, धर्मसमन्वय, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी-परंपरांचे उच्चाटन व सामाजिक एकतेसाठी दिलेल्या संदेशाची दखल घेत अखिल भारत साधुसमाज, भारत-चीन व भारत-पाक युद्ध तसेच कोयना भूकंपवेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राष्ट्रीय योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने अधिक वाट न पाहता 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करावा, अशी मागणी करतांनाच देशाचे माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळातही 'भारतरत्न' बाबत मागणी करण्यात आलेली होती.

त्यामुळे आज जवळपास २५ वर्षांपासूनच्या या मागणीला केंद्र सरकारने विनाविलंब होकार द्यावा, अशी मागणी या लेखी निवेदनातून कलावंत व साहित्यिक आधार संघ, अमरावतीचे समन्वयक प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केली आहे. सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना 'भारतरत्न' सन्मान मिळालाच पाहिजे, यासाठी गुरुकुंजात सुरू असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला पाठिंबाही दिला आहे. यावेळी रवींद्र बन,भोलेश्वर मुदगल, प्रकाश वानखडे, राजेंद्र इंगोले, योगीराज राघोर्ते, प्रदीप गवळीकर, मनोज विंचूरकर, सुभाष सुने, दिनकर कांडलकर, विजय दारोकर, शिवाजी उंबरकर, नंदू पाटील, दीपक कोष्टी, अनिल गवारे, सुभाष भारती व संघटनेचे अन्य सदस्य उपस्थित होते.

# सदस्यांच्या खाणींची चौकशी मागणाऱ्यांच्या उद्योगांचीही 'पोलखोल' करा!

## खाण-क्रशर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या खाणी तपासण्याची सदस्याची मागणी

## ब्लास्टिंग परवानग्या, ३० मीटर उत्खनन आणि कथित वसुलीच्या चर्चेने खळबळ

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते, पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही, अशीच काहीशी स्थिती खाण-क्रशर व्यवसायातील कथित अनियमिततेच्या मुद्द्यावरून निर्माण झाली आहे. सदस्यांच्या व्यवसायावर संशयाचे बोट ठेवणाऱ्या खाण-क्रशर असोसिएशनच्या आहे. 'दुसऱ्याच्या घरावर दगड फेकण्यापूर्वी स्वतःच्या घराची काच तपासावी,' या भूमिकेतून सदस्याने पदाधिकाऱ्यांच्या उद्योगांचीही चौकशी करण्यात यावी अशी भूमिका मांडली आहे. जिल्ह्यातील काही खाणी ३० मीटरपेक्षाही अधिक खोल गेल्याची माहिती असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या दाव्याची अधिकृत मोजणी होऊन वस्तुस्थिती समोर येणे आवश्यक आहे. नियमभंगाचा प्रश्न असेल, तर तो केवळ सदस्यांपुरता मर्यादित कसा राहू शकतो, हा खरा सवाल आहे.



### सहा मीटरची मर्यादा, उत्खनन ३० मीटरवर?

तात्पुरत्या परवान्याच्या आधारे सुरू असलेल्या खाणींसाठी सहा मीटर खोलीची अट असल्याचा मुद्दा असोसिएशननेच उपस्थित केला होता. दुसरीकडे, काही खाणी ३० मीटरपेक्षाही अधिक खोल गेल्याचा दावा केला जात आहे. हा दावा खरा असल्यास संबंधित खाणींच्या मंजूर परवानग्या, प्रत्यक्ष उत्खननाची खोली आणि नियमांच्या अंमलबजावणीची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. मात्र, ही तपासणी करताना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या खाणींना वेगळे निकष लावले जाणार आहेत का? सदस्यांच्या व्यवसायाची चौकशी मागणाऱ्यांनी स्वतःच्या उद्योगांची तपासणी करून घेण्यास हरकत नसावी. 'नियम सर्वांसाठी समान, तर तपासणीही सर्वांची समान!' अन्यथा, कारवाईची मागणी ही नियमांच्या अंमलबजावणीसाठी आहे की अंतर्गत व्यावसायिक संघर्षातून, असा संशय बळावू शकतो.

पदाधिकाऱ्यांच्याच खाणी आणि क्रशर उद्योगांची तपासणी का नको, असा थेट सवाल आता संघटनेतील एका सदस्याने उपस्थित केला आहे. केवळ सदस्यांच्या उद्योगांची चौकशी मागून चालणार नाही; पदाधिकाऱ्यांच्या व्यवसायाचीही तपासणी करा आणि त्याचा अहवाल जनतेसमोर मांडा, अशी मागणी नाव न छापण्याच्या अटीवर करण्यात आली आहे. त्यामुळे खाण-क्रशर व्यवसायातील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर येऊ लागला आहे.

खाण-क्रशर असोसिएशनने दिलेल्या निवेदनातून जिल्ह्यातील खाणींच्या नियमपालनाबाबत प्रश्न उपस्थित झाले. त्यानंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले

### परवानगीविना खाणी सुरू? 'महिन्याच्या वसुली'ची चर्चा

परवानग्यांच्या मुद्द्याबरोबरच आणखी एक गंभीर आरोप चर्चेत आला आहे. आवश्यक परवानग्या नसतानाही सुरू असल्याचा आरोप असलेल्या काही खाणींकडून महसूल यंत्रणेतील संबंधितांकडून कथित मासिक वसुली होत असल्याची चर्चा व्यावसायिक वर्तुळात रंगत असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने त्यांना सिद्ध तथ्य मानता येणार नाही. तरीही या चर्चेची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. जर परवानगीविना खाणी सुरू असल्याचे आढळले, तर त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित विभागांची आहे. कारवाई झाली नसेल, तर त्यामागचे कारण काय? तपासणी झाली असल्यास तिचा अहवाल कुठे आहे? आणि कथित वसुलीच्या आरोपांत तथ्य आहे की नाही, हे स्पष्ट करण्यासाठी कोणती यंत्रणा पुढाकार घेणार? या प्रश्नांची उत्तरे मिळणे गरजेचे आहे. 'कुंपणानेच शेत खाल्ले' अशी परिस्थिती आहे की केवळ संशयाचे धुके, हे तपासातूनच स्पष्ट होईल. त्यामुळे कोणावरही पुराव्याविना आरोप निश्चित करण्याऐवजी संबंधित नोंदी, परवानग्या, तपासणी अहवाल आणि आर्थिक व्यवहारांची नियमानुसार पडताळणी व्हावी, अशी अपेक्षा आहे.

### ब्लास्टिंग परवानग्यांचे गौडबंगाल!

खाणींमध्ये दगड फोडण्यासाठी होणाऱ्या ब्लास्टिंगच्या परवानग्यांचा मुद्दाही गंभीर बनला आहे. अकोला जिल्ह्यात किती खाणधारकांकडे अधिकृत ब्लास्टिंग परवानगी आहे? ज्यांच्याकडे आवश्यक परवानगी नाही, अशा खाणींवर खनिकर्म आणि महसूल विभागाने आजवर काय कारवाई केली? परवानग्यांबाबत तक्रारी असताना प्रत्यक्ष तपासणीचे निष्कर्ष जाहीर का होत नाहीत? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील खाणी सुरक्षा महासंचालनालयाच्या (DGMS) कार्यालयाकडून अकोला जिल्हाधिकाऱ्यांना काही खाणींच्या परवानग्यांसंदर्भात पत्रे देण्यात आली असून, आवश्यक परवानगी नसलेल्या खाणी बंद करण्याबाबतही निर्देश दिल्याची चर्चा आहे. मात्र, या पत्रांचा अधिकृत तपशील आणि त्यावर झालेली कार्यवाही अद्याप स्पष्ट झालेली नाही. जर असे पत्रव्यवहार झाले असतील, तर संबंधित पत्रे कोणत्या खाणींबाबत होती, त्यानंतर अधिकाऱ्यांनी काय पावले उचलली आणि प्रत्यक्षात किती खाणींची तपासणी झाली, याची माहिती प्रशासनाने द्यावी. 'आदेश कागदावर आणि खाणी मैदानात सुरूच,' अशी परिस्थिती असल्याचा संशय निर्माण होत असेल, तर तो दूर करण्याची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांचे पुढे काय?

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना खाणींची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याचे यापूर्वी समोर आले होते. या आदेशानंतर दोन महिने उलटूनही तपासणीचा निष्कर्ष आणि त्यानुसार झालेल्या कारवाईचा तपशील स्पष्ट झालेला नाही. आता असोसिएशनच्या सदस्यानेच पदाधिकाऱ्यांच्या खाणींच्या तपासणीची मागणी केल्याने चौकशीची व्याप्ती काय असणार, हा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. प्रशासनाने सदस्य आणि पदाधिकारी असा भेद न करता सर्व संबंधित खाणींची समान निकषांवर तपासणी करावी. उत्खननाची खोली, ब्लास्टिंग परवानग्या, गौणखनिज वाहतुकीचे पास आणि स्वामित्वधनाच्या नोंदी तपासून निष्कर्ष सार्वजनिक करावेत. 'दूध का दूध, पाणी का पाणी' होऊ द्या! नियमभंग झाला असेल, तर संबंधितांवर कारवाई व्हावी; आरोप निराधार असतील, तर तेही स्पष्ट व्हावे. चौकशीचे आदेश काढून प्रकरण थंड बस्त्यात टाकल्याचा संशय निर्माण होणार नाही, याची खबरदारी प्रशासनाने घ्यायला हवी. खाण-क्रशर व्यवसायातील कथित अनियमिततेचा प्रश्न आता केवळ सदस्यांच्या उद्योगांपुरता राहिलेला नाही. पदाधिकाऱ्यांच्या उद्योगांचीही तपासणी करण्याची मागणी पुढे आली आहे. त्यामुळे आता चौकशी केवळ कागदोपत्री होणार की प्रत्यक्ष खाणींची मोजणी, परवानग्यांची पडताळणी आणि कारवाईचा तपशील जनतेसमोर येणार? याची कसोटी प्रशासनासमोर उभी ठाकली आहे.

दुसऱ्याला नियम शिकवताना स्वतःही नियमांच्या चौकटीत असणे आवश्यक आहे. खाण कोणाचीही असो, नियमभंगाला अभय नको आणि चौकशीमध्ये दुजाभावही नको! अशी भावना एका खाण व क्रशर व्यावसायिकाने व्यक्त केली आहे.

# अमरावतीतून बेपत्ता दोन विद्यार्थिनी मध्य प्रदेशात सुखरूप!

## -शहर गुन्हे शाखेच्या तपासाला यश, -सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणातून तपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातून बेपत्ता झालेल्या दोन शालेय विद्यार्थिनींचा शोध घेण्यात शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. २३ ऑक्टोबरपासून बेपत्ता असलेल्या १८ आणि १६ वर्षीय विद्यार्थिनी मध्य प्रदेशात सुखरूप आढळून आल्या. त्यांना अमरावतीत आणण्यासाठी गुन्हे शाखेचे पथक रवाना झाले असून, गुरुवारी रात्री उशिरापर्यंत त्यांचे शहरात आगमन होण्याची शक्यता आहे. दोन्ही विद्यार्थिनी सुखरूप मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून या दोन्ही विद्यार्थिनी बेपत्ता झाल्या होत्या.

वेगवेगळ्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थिनी २३ ऑक्टोबर रोजी शाळेतून बाहेर पडल्यानंतर घरी परतल्या नव्हत्या. कुटुंबीयांनी




पोलिसांकडे धाव घेतल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. एकाच दिवशी दोन विद्यार्थिनी बेपत्ता झाल्याने शहरात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी शहर गुन्हे शाखेने विविध भागांतील सीसीटीव्ही फुटेज तपासले. ☞(पान २ वर)

# महावितरणच्या पाहणीत उघड झाला माथेफिरूचा प्रताप

## मुख्य एबी स्वीचच बंद केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** सध्या रब्बी पिकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असल्याने ग्रामीण भागात वीजेची मागणी प्रचंड वाढली आहे. एकाच वेळी शेतकऱ्यांच्या मोटारी सुरू होत असल्याने कमी दाबाचा (लो व्होल्टेज) प्रश्न निर्माण होत असून अनेक ठिकाणी मोटारी बंद पडत आहेत. रात्रभर शेतकरी मोठ्या कष्टाने पिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि पाणी देण्यासाठी शेतात जागरण करीत आहेत. अशातच सातेगाव येथे एका शेतकऱ्याने इतर शेतकऱ्यांना पाणी मिळू नये आणि आपल्या शेतातील मोटर पंप सुरळीत चालावा यासाठी महावितरणच्या मुख्य ए.बी. स्वीचच बंद केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



या प्रकरणी महावितरणच्या कर्मचाऱ्याने विचारणा केली असता धमकी दिल्याप्रकरणी रहिमापूर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची (N.C.R.) नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सुशिल माधवराव सोनटक्के (रा. सातेगाव, ता. रहिमापूर) हे ग्राम सातेगाव येथील महावितरण (एम.एस.ई.बी.) कार्यालयात नोकरीला असून त्यांच्याकडे विद्युत वाहिनी देखरेखीचा चार्ज आहे.

दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास ते विद्युत वाहिनीची पाहणी करीत असताना अचानक विद्युत पुरवठा बंद झाला. त्यांनी अमन जिनिंग मेन रोड, सातेगाव येथील मुख्य ए.बी. स्वीचची तपासणी केली असता, श्रीकांत विलास उर्फ गुरुदेव देशमुख (वय ३५, रा. सातेगाव) याने मुख्य वाहिनीचा ए.बी. स्वीच बंद केल्याचे निदर्शनास आले.

याबाबत सोनटक्के यांनी देशमुख यास विचारणा केली असता, त्याने 'तुम्हाला काय करायचे ते ☞(पान २ वर)

# अखेर कालव्यात वाहून गेलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह ३६ तासानंतर आढळला

**तिवसा/प्रतिनिधीः-**



कालव्याजवळ पाय धुण्यासाठी गेलेला ५३ वर्षीय शेतकरी तिवसा जवळील आनंदवाडी येथील कालव्यात काल २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास वाहून गेला होता. आज २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजताचे दरम्यान त्याचा मृतदेह धामणगाव रेल्वे तालुक्यातील अशोकनगरजवळ कॅनॉलच्या पाण्यात ३६ तासानंतर आढळून आला.रेस्क्यू टीमच्या मदतीने त्यांचे प्रेत बाहेर काढण्यात आले.

दिवाकर सुखदेव माहुरे असे कालव्यात वाहून गेलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.काल २८ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतातून परत आल्यानंतर मातीने भरलेले पाय धुण्यासाठी ते आनंदवाडी(तिवसा) जवळ असलेल्या कालव्याजवळ आले मात्र तेथे अचानक त्यांचा पाय घसरून ते पाण्यात पडले होते.त्यांनी आरडाओरडा केल्याने ही घटना तेथून शाळेत जाणाऱ्या काही विद्यार्थ्यांना ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी येथे श्री संत शिरोमणी रूपलालजी महाराजांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## -८० कोटी २६ लाख रुपयांच्या विकास आराखड्याला गती

**मुंबई/प्रतिनिधीः-**

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथे श्री संत शिरोमणी रूपलालजी महाराज यांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येणार असून, सुमारे ८० कोटी २६ लाख रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामुळे वारकरी संप्रदायाची परंपरा, भक्ती चळवळीचा वारसा आणि संत



रूपलालजी महाराजांचे समाजप्रबोधनाचे विचार जतन होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्षा निवासस्थान येथे अमरावती मधील अंजनगाव सुर्जी येथे श्री संत शिरोमणी रुपलालजी महाराज राष्ट्रीय स्मारक विकास आराखडा संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या बैठकीत विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली. यावेळी आमदार संजय कुटे,आमदार गजानन लवटे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव वित्त विकासचंद्र रस्तोगी, अपर मुख्य☞(पान २ वर)

# अमरावतीत ३ नोव्हेंबर रोजी रोजगार मेळावा

## 'व्होरा टेक्नॉलॉजीज' कंपनीत १२० पेक्षा जास्त जागांसाठी भरती

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात 'व्होरा टेक्नॉलॉजीज लि. नागपूर' या ☞(पान २ वर)

# डिजिटल अरेस्टचा धाक, शेतकऱ्याची ८.५० लाखांनी फसवणुक

## -अश्लील व्हिडिओ, सीबीआय चौकशी आणि मनी लॉन्ड्रिंगची भीती

**अमरावती/प्रतिनिधीः-**

डिजिटल अरेस्ट आणि सीबीआय चौकशीच्या नावाखाली कायदेशीर कारवाईचा धाक दाखवून सायबर भामट्यांनी वरुड तालुक्यातील एका शेतकऱ्याला




तब्बल ८ लाख ५० हजार रुपयांचा गंडा घातला. अश्लील व्हिडिओ आणि संदेश पाठविल्याच्या तक्रारींसह आधारकार्डचा वापर मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणात☞(पान २ वर)

# आज गुरुकुंज आश्रमात लाखो भाविक अर्पण करणार राष्ट्रसंतांना मौन श्रद्धांजली

## - विश्वशांतीसाठी गुरुदेव भक्त घेणार संकल्प

**गुरुकुंज मोझरी/प्रतिनिधीः-**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मराठी तिथीनुसार अश्विन वद्य पंचमी शके १८९० मध्ये याच दिवशी दुपारी ४ वाजून ५८


राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांची महासमाधी

मिनिटांनी गुरुकुंज आश्रमात महानिर्वाण झाले होते. आज त्यांच्या महापरिनिर्वाणाला ५८ वर्ष पूर्ण होत आहे. शुक्रवार दि.३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रमच्या☞(पान २ वर)

# ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांची शिरखेड येथे भेट



## -दूध उत्पादक संस्थेची पाहणी, पशुसंवर्धना संदर्भात निर्देश

**मोर्शी/प्रतिनिधीः-**

कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन चे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील (राज्यमंत्री दर्जा) यांनी आज दि.२९ ऑक्टोबर रोजी मोर्शी तालुक्यातील शिरखेड गावातील मराठवर्हाड दूध उत्पादक संस्था शिरखेड येथे भेट दिली.यावेळी त्यांच्या सोबत विनोद वानखडे तहसीलदार मोर्शी, प्रथमेश माने तालुका कृषी अधिकारी मोर्शी, डॉ.प्रविण सारडे तालुका पशुसंवर्धन☞(पान २ वर)

# थकबाकीदार मालमत्तांवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार, पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर हद्दीत ५ ते ६ वर्षांपासून मालमत्ता कराचा भरणा न करणाऱ्या दोन मालमत्तांवर दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सील लावण्याची कारवाई करण्यात आली.



या कारवाईदरम्यान वार्ड क्रमांक C-७ मधील धारक प्रकाश त्र्यंबकराव बल्हाळ यांच्या मालमत्ता क्रमांक २७०२ वर २ लाख ५७ हजार ५७६ रुपये, तर धारक किशोर बागडे यांच्या मालमत्ता क्रमांक ११३१ वर १ लाख ९ हजार ८९१ रुपये इतका मालमत्ता कर थकीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या दोन्ही मालमत्तांवरील☞(पान २ वर)

# वाघाडी प्रकल्पग्रस्तांना जमिन मोबदला तात्काळ द्या

## आमदारांचे पालकमंत्र्याना निवेदन

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील सामदा व कळाशी येथिल वाघाडी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रलंबित जमिन मोबदला व अनुदानाची रक्कम तात्काळ देण्यात यावी



अशी मागणी दर्यापूरचे आमदार गजानन लवटे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ☞(पान २ वर)

# आकांक्षा शेळके यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील प्रतिथयश कादंबरीकार 'धग' कादंबरी चे निर्माता सुप्रसिद्ध कथाकार उद्धव ज.शेळके यांच्या जेष्ठ कन्या आकांक्षा उर्फ हेमा उद्धव शेळके यांचे आज (दि.२९) दुपारी ११.३० वाजता भूमिपुत्र कॉलनी येथील 'शिळान' या निवासस्थानी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्या ६० वर्षाच्या होत्या.



कादंबरीकार उद्धव ज. शेळके यांच्या अनेक कादंबऱ्यांचे हस्तलिखित आकांक्षा उर्फ हेमा उद्धव शेळके यांनी तयार केले होते. उद्धव शेळके यांच्या सुविद्य पत्नी माई शेळके यांच्या समवेत त्या भूमिपुत्र कॉलनीतील शिळान या निवासस्थानी राहत होत्या. त्या अविवाहित होत्या. आकांक्षा उर्फ हेमा उद्धव शेळके यांच्या दुःखद निधनाबद्दल साहित्य क्षेत्रात हळहळ व्यक्त केल्या जात आहे. त्यांची अंत्ययात्रा दिनांक ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता भूमिपुत्र कॉलनी येथून निघणार असून हिंदु स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील.